


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

▪ अमरावती, गुरुवार २३ आक्टोबर २०२५ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठ १०




# नौदलामुळे भारतीयांचा आत्मविश्वास बळकट -पंतप्रधान

## आयएनएस विक्रांतवर नौदलासोबत दिवाळी



**पणजी /वृत्तसंस्था-** भारताच्या तिन्ही सैन्य दलात असलेल्या असाधारण समन्वयामुळे पाकिस्तानला विक्रमी वेळेत गुडघे टेकायला भाग पाडले. काही महिन्यांपूर्वी तर आयएनएस विक्रांत या नुसत्या नावानेच पाकिस्तानची झोप उडाली. आपल्या सशस्त्र दलांनी जमिनीवर, समुद्रात आणि हवेत, प्रत्येक परिस्थितीत अत्यंत संवेदनशीलतेने सेवा दिली आहे. त्यात भारतीय नौदलाने परदेशात अडकलेल्या लोकांना परत आणण्यासाठी मोहिमा राबविल्या. मुळात तुमच्या शौर्य आणि धाडसामुळेच जगभरातील भारतीयांचा आत्मविश्वास बळकट झाला आहे, असे गौरवोद्‌गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गोव्यात आयएनएस विक्रांतवरील नौसैनिकांसोबत दिवाळी साजरी केली. पंतप्रधानांनी सैनिकांसोबत दिवाळी साजरी करण्याची ही १२ वी वेळ आहे. मी कालपासून तुमच्यामध्ये आहे. तुमच्या प्रत्येकाकडून मी काही तरी शिकलो आहे. मला काही तरी कळले आहे. खोल समुद्रातील रात्र आणि सूर्योदयाने माझी दिवाळी अनेक प्रकारे खास बनवली आहे. जहाज लोखंडाचे आहे, पण तुम्ही जेव्हा त्यात उतरता तेव्हा त्यात शौर्य उतरते, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी नौदलाचे कौतुक केले.

ऑपरेशन सिंदूरमध्ये तिन्ही दलांमधील प्रचंड समन्वयामुळे पाकिस्तानला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. आज आयएनएस विक्रांतच्या शौर्यस्थळावरून मी पुन्हा एकदा तिन्ही दलांच्या सैनिकांना सलाम करतो. जेव्हा शत्रू उपस्थित असतो, तेव्हा ज्या देशाकडे स्वतःहून युद्ध लढण्याची ताकद असते, तोच देश वरचढ ठरतो. सशस्त्र दलांना बळकटी देण्यासाठी, स्वावलंबी असणे आवश्यक आहे, असे सांगतानाच ज्या दिवशी देशाला स्वदेशी आयएनएस विक्रांत मिळाली, त्या दिवशी नौदलाने गुलामगिरीचे एक प्रमुख प्रतीक सोडून दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने नौदलाने एक नवीन ध्वज स्वीकारला. आज, आपली युद्धनौका विक्रांत स्वावलंबी भारत आणि मेड इन इंडियाचे एक प्रमुख प्रतीक आहे. समुद्रातून जाणारी स्वदेशी आयएनएस विक्रांत भारताच्या लष्करी क्षमतेचे प्रतिबिंब आहे. विक्रांतने अलीकडेच पाकिस्तानची रात्रीची झोप उडवली, असे मोदी म्हणाले.

गेल्या वर्षी पंतप्रधानांनी गुजरातमधील कच्छला भेट दिली होती. तिथे त्यांनी बीएसएफ, लष्कर, नौदल आणि हवाई दलातील सैनिकांना मिठाई वाटली होती. गेल्या ११ ⇨(पान २ वर)

# महामार्गावर उभ्या चौघांना अज्ञात वाहनाने चिरडले; तिघांचा मृत्यू

**अकोला/प्रतिनिधी :** मोटार बिघडल्याने महामार्गावर उभे असलेल्या चार जणांना अज्ञात भरधाव वाहनाने चिरडल्याची धक्कादायक घटना अकोला जिल्ह्यात घडली आहे. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला. या दुर्दैवी घटनेमुळे ऐन दिवाळीच्या दिवशी परिसरात शोककळा पसरली आहे.दिवाळीच्या रात्री अकोला जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात घडला. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर काटेपूर्णा ते पैलपाडा गावादरम्यान एका अज्ञात वाहनाने मोटारीच्या बाजूला उभ्या असलेल्या चार जणांना चिरडले. या अपघातात पती-पत्नीसह तीन जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी आहे.

बोरगाव मंजू येथील धीरज शिरसाट आणि अश्वीनी शिरसाट हे दाम्पत्य खेर्डी येथील आपला व्यवसाय आटोपून एका प्रवासी मोटारीने बोरगाव मंजू गावाकडे घरी निघाले होते. मात्र, रस्त्यात त्यांची मोटार बिघडल्यामुळे एका मालवाहू वाहनाद्वारे वाहन नेण्यात येत होते. यावेळी हे चौघेही मोटारीच्या खाली उतरलेले होते. अमरावतीकडे भरधाव वेगाने जाणा-या एका अज्ञात वाहनाने खाली उतरलेल्या या चारही जणांना जबरदस्त धडक दिली. या भीषण अपघातात दोन पुरुष आणि एका महिलेचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

मृतांमध्ये धीरज शिरसाट, अश्विनी शिरसाट आणि आरिफ खान (चालक) यांचा समावेश आहे. हे तिघेही बोरगाव मंजू येथील रहिवासी होते. एक जण गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने अकोला जिल्हा रुग्णालयात




उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. अपघात करून पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा पोलीस शोध घेत आहेत. घटनास्थळावर वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी भेट देउन पाहणी केली. या भीषण अपघातामुळे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. सुमारे दोन तासांपर्यंत वाहतूक एकाच बाजूने वळविण्यात आली होती. पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. रात्रीच्या सुमारास बचाव पथकाने तत्काळ घटनास्थळ गाठून मदत कार्य राबवले. थरारक घटनेमुळे खळबळ हिट अन्ड रनच्या या थरारक घटनेमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. भीषण अपघातात तीन जणांना आपले प्राण गमवावे लागले. आता अपघात करणा-या त्या अज्ञात वाहनांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे निर्माण झाले आहे.

# सोने विक्रमी उच्चांकावरून 5,677 ने घसरले

**नवी दिल्ली-** दिवाळीपासून सोने आणि चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. सोन्याचा भाव त्याच्या सर्वकालीन उच्चांकावरून ५,६७७ ने कमी झाला आहे आणि चांदीचा भाव त्याच्या विक्रमी उच्चांकावरून २५,५९९ ने कमी झाला



आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, आज म्हणजेच २२ ऑक्टोबर रोजी २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ३,७२६ रुपयांनी कमी होउन १,२३,९०७ रुपये झाली आहे. यापूर्वी, २० ऑक्टोबर रोजी ते १,२७,६३३ रुपये होते. १७ ऑक्टोबर रोजी ⇨(पान २ वर)

# बोगस नोंदणी विरोधात सत्ताधारी आमदाराची कोर्टात धाव

## ● एकाच पत्त्यावर हजारो मतदारांची नावे ●

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मागील काही दिवसांपासून राज्यात बोगस मतदार नोंदणीवरून विरोधकांनी निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. मात्र यावरून भाजपा नेते विरोधकांवर फेक नॅरेटिव्ह तयार करत असल्याचा आरोप केला. परंतु आता सत्ताधारी पक्षातील आमदार सतीश चव्हाण यांनी धक्कादायक आरोप करत बोगस नोंदणीविरोधात कोर्टाकडे धाव घेतली आहे.



याबाबत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, गंगापूर मतदारसंघात साडे तीन लाख मतदार विधानसभेवेळी होती. निवडणूक आयोगाने हीच यादी जिल्हा परिषद, नगरपालिकांना वापरायची असा निर्णय घेतला. या यादीबाबत जेव्हा कार्यकर्त्यांनी तपासणी केली तेव्हा त्यात दुबार नावे आढळली, एकाच पत्त्यावर हजारो मतदारांची नोंद आहे. जी घरे अस्तित्वात नाहीत त्यावरही शेकडो मतदारांची नोंद आहे. ही पूर्ण यादी आम्ही तपासली तेव्हा त्यात अनेक त्रुटी आढळल्या. एकाच घरात १७०० मतदार आहेत. साडे तीन लाख मतदार तपासले. काही घरांचा शोध घेतला, तिथे पत्तेच अस्तित्वात नाही. चुकीच्या पद्धतीने ही मतदार यादी जाहीर झाली. जर हीच यादी जिल्हा परिषद, नगरपालिका निवडणुकीत वापरली तर ख-या काम करणा-या कार्यकर्त्यांवर अन्याय होईल असा आरोप त्यांनी केला.

तसेच आम्ही निवडणूक आयोगाकडे ही यादी पुन्हा तपासावी असा अर्ज दिला आहे. चुकीच्या पद्धतीने ज्या मतदारांची नोंदणी केली आहे त्या मतदारांना यादीतून वगळावे अन्यथा आम्हाला न्यायालयाचा दरवाजा ठोठवल्याशिवाय पर्याय राहणार नाही. निवडणूक आयोगाचं काम निवडणूक पारदर्शक घेणे आहे. गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यातील मतदारसंघात मतदार याद्या तपासणी करावी. ज्या मतदारांची नावे दुबार, तिबार आहेत त्यांचे मतदान कार्ड नंबरही वेगवेगळे आहेत. एकाच व्यक्तीच्या नावाने ३ वेगवेगळी कार्ड आहेत. संघटित गुन्हेगारीसारखे हे सर्व काम केले आहे. महसूल प्रशासन, पोलीस खाते यांची मदत घेउन शोध घेतला पाहिजे. हजारो बोगस मतदान कार्ड तयार करण्यात आली आहेत असा आरोप आमदार सतीश चव्हाण यांनी केला. दरम्यान, एकाच व्यक्तीच्या नावे वेगवेगळ्या नंबरने कार्ड दिले आहेत. काही मतदार सापडतही नाही. काल्पनिक मतदार यादीत भरलेत. आमचे कार्यकर्ते या याद्या तपासत आहेत. ३६ हजार दुबार नावे यादीत समाविष्ट आहेत. प्रशासनाने त्यांचे काम सुरळीत पार पाडावे. निवडणूक आयोगाने त्यावर बोलले पाहिजे. निवडणूक आयोग यांच्याकडून न्याय मिळाला नाही तर कोर्टात जावे लागेल. बोगस मतदारांमुळे चांगले उमेदवार मागे पडणार असतील तर त्याविरोधात बोलले पाहिजे असंही आमदार सतीश चव्हाण यांनी म्हटले.

## पहिला टेलीकॉम सॅटेलाइट उभारणारे

# इस्त्रोचे शास्त्रज्ञ डॉ. एकनाथ चिटणीस यांचे निधन

**पुणे/प्रतिनिधी :** ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ, पद्मभूषण डॉ. एकनाथ वसंत चिटणीस (वय १००) यांचे बुधवारी सकाळी पुण्यात निधन झाले. भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्त्रोच्या जडणघडणीत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. २५ जुलै २०२५ रोजी त्यांनी वयाची शंभर वर्षे पूर्ण केली होती.कोल्हापूर येथे जन्म झालेले चिटणीस यांचे शालेय शिक्षण पुणे येथे झाले. रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयांत त्यांनी पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी रेडिओ संपर्कशास्त्र विषयात पदविका अभ्यासक्रम पूर्ण केला. १९६० ते १९७० च्या दशकात त्यांनी क्ष-किरण आणि अवकाश संशोधन विषयांवर संशोधन केले. भारताच्या अंतराळ संशोधन कार्यक्रमात त्यांनी विक्रम साराभाईंसह १९६१पासून काम केले. अवकाश उपयोजन केंद्राचे संचालक म्हणूनही त्यांनी जबाबदारी निभावली.उपग्रह प्रक्षेपणासाठी थुम्बा हे स्थळ त्यांनी शोधले होते.१९६२मध्ये ते इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्चचे (इन्कोस्पार) सदस्य सचिव झाले. या संस्थेचेच पुढे भारतीय




अवकाश संशोधन संस्थेत (इस्त्रो) रूपांतर झाले. डॉ. चिटणीस यांचा भारताच्या अवकाश क्षेत्रातील इन्सॅट मालिकेतील उपग्रहांच्या आखणीत महत्त्वाचा सहभाग होता. अवकाश तंत्रज्ञानाचा शैक्षणिक आणि अन्य क्षेत्रांत वापर करण्यासाठी त्यांनी भरपूर काम केले. १९७० च्या दशकात शेती, हवामान, आरोग्य, शिक्षण, दूरसंपर्क, मनोरंजन अशा क्षेत्रांत अवकाश संशोधन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी नासाच्या सहकार्याने सॅटेलाइट इन्स्ट्रक्शनल टेलिव्हिजन एज्युकेशनचा प्रकल्प अंमलबजावणी करण्यात प्रा. यशपाल यांच्यासह डॉ. चिटणीस यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यामुळे कालांतराने दूरचित्रवाणी संच देशभरात पोहोचले. विज्ञान क्षेत्रातील डॉ. चिटणीस यांच्या योगदानासाठी त्यांना केंद्र सरकारने पद्मभूषण पुरस्काराने गौरवले होते.

# सुनेला अपघात प्रकरणातून वाचवण्यासाठी मोदींची स्तुती, किशोरी पेडणेकर यांचा दावा









**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी सिनेक्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेते महेश कोठारे यांनी काही दिवसांपूर्वी मी भाजपचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मोठा भक्त आहे, असे विधान केले होते. यावरून आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी मोठा दावा केला आहे. अभिनेते महेश कोठारे यांनी आपल्या सुनेला अपघात प्रकरणातून वाचवण्यासाठी भाजप तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्तुती करत आहेत, असा दावा त्यांनी यावेळी केला आहे. त्यामुळे आता विविध चर्चांना उधाण आले आहे. अभिनेते महेश कोठारे यांच्या विधानावर मंगळवारी (२१ ऑक्टोबर) शिवसेना उबाठा खासदार खासदार संजय राउत यांनी तात्या विंचू रात्री तुमचा गळा आवळेल असा टोला लगावल होता. त्यानंतर आता, अभिनेते महेश कोठारे यांची सून उर्मिला कोठारे ही एका अपघात प्रकरणात अडकली आहे. तिला त्या प्रकरणातून बाहेर काढण्यासाठीच महेश कोठारे यांनी भाजपची स्तुती केली आहे. असे शिवसेना उबाठा नेत्या किशोरी पेडणेकर म्हणाल्या. महेश कोठारे एक कलाकार आहेत. ही खरी गोष्ट आहे. पण त्यांच्या सुनबाई एका अपघात प्रकरणात अडकल्या आहेत. तिला कसे वाचवायचे? हा प्रश्न त्यांच्यापुढे आहे. भाजपवर अशी मुक्ताफळे उधळल्याशिवाय ही गोष्ट साध्य होणार नाही हे त्यांना माहित आहे. महाराष्ट्रात एक वेगळीच संस्कृती तयार होत आहे. मी या प्रकरणी नाव घेउन कोणत्याही जातीचा अपमान करणार नाही. पण छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून ज्या संस्कृतीने संपूर्ण महाराष्ट्रावर शौर्य दाखवले, त्यासोबतच क्रौर्यही दाखवले, ⇨(पान २ वर)

# 'लाडकी'योजनेत 12,431 लाडक्या भावांची घुसखोरी

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. १२ हजारांपेक्षा जास्त पुरूषांनी खोटी कागदपत्रे देउन या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली आहे. फडणवीस सरकारच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेचे १२ हजार पुरूषांनी प्रत्येक महिन्याला १५०० रूपये लाटले आहे. ही माहिती समोर आल्यानंतर ही तर लाडके भाउ योजना असल्याची टीकी केली जातेय.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सूरू झाल्यापासूनच चर्चेत आहे. लाभार्थ्यांची आकडेवारी, सरकारी कर्मचा-यांनी लाटलेले पैसे तर कधी केवायसी योजना कोणत्या ना कोणत्या कारणासाठी चर्चेत असतेच. आता यामधील मोठा स्कॅम समोर आला आहे. माहिती अधिकात १२ हजार ४३१ पुरूषांनी वर्षभरापासून या योजनेचा लाभ घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यांच्याकडून या पैशांची वसूल केली नसल्याचेही समोर आले आहे. इंडियन एक्स्प्रेसनं याबाबतचे वृत्त दिले आहे. लाडकी बहीण योजनासंदर्भात माहिती अधिकारात



## वर्षभर घेतले 1500; वसुली कधी होणार?

सरकारला प्रश्न विचारण्यात आला होता. त्याबाबत सरकारकडून काही माहिती दिली आहे. त्यानुसार, मागील वर्षभरात १२४३१ पुरूषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला आहे. पुरूषांनी लाभ घेतल्याचे याआधी फक्त दावे केले जात होते. पण आता याबाबत सरकारकडूनच अधिकृत माहिती ⇨(पान २ वर)

# महाराष्ट्रात विजेच्या गडगडाटासह पावसाचा अंदाज; हवामान खात्याचा इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशभरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरा केली जात आहे. आकाश कंदील, रांगोळी व रोषणाईचा झगमगाट अशा वातावरणात दिवाळी साजरा होत असतानाच मंगळवारी राज्यातील अनेक ठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे लक्ष्मीपूजनाच्या दिवशी खरेदीसाठी बाहेर पडलेल्यांची पावसामुळे तारांबळ उडाल्याचं पाहायला मिळालं. त्यानंतर आज (२२ ऑक्टोबर) पुन्हा संपूर्ण महाराष्ट्रत विजेच्या गडगडाटासह पाउस पडणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD)



महाराष्ट्राच्या अनेक भागांसाठी येलो अलर्ट जारी केला आहे. त्या ठिकाणी विजांसह वादळ आणि हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा देत ताशी ३० ते ४० किमी वेगाने वारे वाहण्याचा इशारा दिला आहे. यामध्ये कोकण-गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्याचा ⇨(पान २ वर)

# एका मतदाराचे नाव हटवण्यासाठी मोजले 80 रूपये!

## राहुल गांधींच्या 'वोट चोरी'च्या आरोपांबाबत SIT चा मोठा खुलासा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** गेल्या काही दिवसांपासून विरोधी पक्षांकडून निवडणूक आयोग आणि मतदार याद्या यासंबंधी वेगवेगळे आरोप केले जात आहेत. यादरम्यान कर्नाटकच्या अलंद येथे मतचोरी झाल्याच्या आरोपाची चौकशी करणा-या पोलिसांच्या एसआयटीने महत्त्वाची माहिती दिली आहे. २०२३ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीपूर्वी अलंद मतदारसंघात निवडणूक आयोगाकडे मतदारांची नावे वगळण्यासाठी केलेल्या प्रत्येक बनावट अर्जासाठी डेटा सेंटर ऑपरेटरला ८० रुपये दिले जात होते,




अशी माहिती कर्नाटक पोलिसांच्या एसआयटीने दिली आहे. डिसेंबर २०२२ ते फेब्रुवारी २०२३ दरम्यान या मतदारसंघात अशा एकूण ६०१८ अर्ज करण्यात आले होते. म्हणजेच एकूण ४.८ लाख रुपये देण्यात आले.कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी करत असलेल्या वोट चोरीच्या आरोपात अलंद येथील मतदार यादीतील घोळाचा मुद्दा देखील उपस्थित करण्यात आला होता. गेल्या आठवड्यात या प्रकरणात एसआयटीने भाजपा नेते सुभाष गुत्तेदार यांच्याशी संबंधीत ⇨(पान २ वर)




# मंदिरात दर्शनासाठी जातांना राष्ट्रपतीचे हेलिकॉप्टर खड्ड्यात अडकले



**तिरु वनंतपुरम/वृत्तसंस्था :** केरळमध्ये पोहोचलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे हेलिकॉप्टर लँडिंगनंतर एका खड्ड्यात अडकले. त्यानंतर घटनास्थळी असलेल्या पोलिस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी भारतीय हवाई दलाच्या एमआय-१७ हेलिकॉप्टरला खड्ड्यातून बाहेर काढले. केरळमधील पथनमथिट्टा येथील राजीव गांधी स्टेडियममध्ये ही घटना घडली. तेथील हेलिपॅड घाईघाईने बांधण्यात आले होते. घटनास्थळी असलेल्या अधिका-यांनी सांगितले की, 'कॉंक्रीट पूर्णपणे बसले नव्हते, म्हणून जेव्हा हेलिकॉप्टर उतरले तेव्हा ते त्याचे वजन सहन करू शकले नाही आणि चाके जमिनीला स्पर्श करतात तिथे खड्डे तयार झाले.' अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, मूळत? पंबाजवळील निलक्कल येथे लँडिंगची योजना होती, परंतु खराब हवामानामुळे ते प्रमदम येथे बदलण्यात आले. तथापि, राष्ट्रपती मुर्मू यांनी कोणताही विलंब न करता रस्त्याने आपला प्रवास सुरू ठेवला.



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# कंवर नगर मार्गावर हिट अँड रन; बोलेरोने दोन मुलींना उडवले

## एकीची प्रकृती गंभीर; आरोपी चालक फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील कंवर नगर मार्गावर मंगळवारी रात्री एक धक्कादायक अपघात घडला. गझल बार अ?ण्ड रेस्टॉरंटसमोर एका भरधाव पांढऱ्या बोलेरोने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवर असलेल्या दोन तरुणी रस्त्यावर फरफटत गेल्या. त्यापैकी एकीची प्रकृती गंभीर आहे. आरोपी चालक नशेत होता. अपघातांनतर तो घटनास्थळावरून वाहनासह फरार झाला. पोलिसांनी अज्ञात बोलेरो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला असून, शोधमोहीम सुरू आहे. पायल राजेंद्र बुंदिले (वय २२, सबनीस प्लॉट ) व वैष्णवी विष्णू थोरात (वय २१,जेवड नगर) असे अपघात जखमी झालेल्या मुलींची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पायल आणि वैष्णवी दोघी महाकाली मंदिरात दर्शनासाठी एक्टिवा (एमएच २७ सीआर ४०८८) या दुचाकीने जात होत्या. रात्री १०.१५ च्या सुमारास त्या कंवर नगर मार्गावरून जात असताना गझल बार समोर पाठीमागून भरधाव बोलेरोने त्यांची दुचाकी उडवली.



या धडकेत पायल गाडीजवळ रस्त्यावरच पडली, तर वैष्णवी काही अंतरावर फेकली गेली. यानंतर बोलेरो चालकाने वैष्णवीवरून गाडी चालवत नेल्याने ती गंभीर जखमी झाली. नागरिकांनी तातडीने दोघींनाही रुग्णालयात दाखल केले. वैष्णवीवर सध्या सनशाईन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

या घटनेनंतर पायल बुंदिले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात बोलेरो चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आरोपीचा माग काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.

अपघातानंतर बोलेरो चालकाने पुढे जाऊन आणखी एका दुचाकीला धडक दिल्याची चर्चा आहे. मात्र, संबंधित दुचाकीस्वाराने अद्याप पोलिसांत तक्रार दाखल केलेली नाही.

**सीसीटीव्ही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल-**
दरम्यान अपघाताचा सीसीटीव्ही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. अपघात होताच अनेकांनी घटनास्थळी धाव घेतली, परंतु बोलेरो चालक वाहनासह पसार झाला होता.

# आयआयएमसी २०२७ चे शैक्षणिक सत्र बडनेराच्या नवीन इमारतीत सुरू करण्याचे निर्देश

## केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** जनसंचार आणि पत्रकारिता क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे भारतीय जनसंचार संस्थान, -आयआयएमसी अमरावतीची बडनेरा येथील प्रस्तावित इमारत २०२७ पर्यंत पूर्ण करा, असे निर्देश केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी आज दिले. अमरावती महानगर पालिका आयुक्तांच्या निवास स्थानी उच्चस्तरीय आढावा बैठक आज आयोजित करण्यात आली होती.

यावेळी महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, केंद्रीय लोक निर्माण विभागाचे मुख्य अभियंता डी. रायचौधरी,आय.आय.एम.सी. स्पेशल प्रोजेक्ट डायरेक्टर रश्मी रोजा , भारतीय जनसंचार संस्थेचे क्षेत्रीय निदेशक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, विशेष कार्य अधिकारी डॉ . मनोज कुमार सोनोने संजय बसेडिया, अभिजीत कावरे, विष्णू राठोड यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.



भारतीय जनसंचार संस्थान, अमरावतीचे प्रस्तावित इमारतीचे बांधकाम करताना प्रत्येक टप्प्याची आखणी करा. पहिला टप्पा दर्जेदाररित्या पूर्ण झाल्यानंतरच दुसऱ्या टप्प्याची निर्मिती करा. बदलत्या हवामानात बांधकाम बंद असतांना इमारतीला लागणारे दरवाजे, खिडक्या व इतर फर्निचरची गुणवत्ता तपासण्याचे काम करून निश्चित वेळेचा सदुपयोग करा, असे निर्देश देत २०२७ चे शैक्षणिक सत्र बडनेराच्या प्रस्तावित नवीन व अत्याधुनिक इमारतीत सुरू करा, असे जाजू यावेळी म्हणाले.

केंद्र शासनाच्या वतीने आयआयएमसीच्या नवीन इमारती करिता बडनेरा येथे देण्यात आलेल्या १५ एकर जागेची पाहणी यावेळी सचिव संजय जाजू यांनी केली. या १५ एकर जागेवर शैक्षणिक वर्ग, प्रशासकीय इमारत, क्रीडा संकुल, विद्यार्थी व कर्मचारी निवासस्थानाची आखणी व त्या संबंधित तांत्रिक बाबींची माहिती त्यांनी घेतली. या बैठकीला आयआयएमसी अमरावतीचे कर्मचारीही उपस्थित होते . दरम्यान अमरावती दौऱ्यापूर्वी सचिव संजय जाजू यांनी आज नागपूरच्या आकाशवाणी केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी नागपूरच्या आकाशवाणी, दूरदर्शनच्या तसंच पत्र सूचना कार्यालय आणि केंद्रीय संचार ब्युरोच्या कार्यालयांच्या कामकाजाचा आढावा घेतला. आकाशवाणीच्या माध्यमातून जाहिरात संकलनाच्या कार्याला गती देण्याचे निर्देश त्यांनी सबंधित अधिकाऱ्यांना दिले . याप्रसंगी आकाशवाणी नागपूरच्या अभियांत्रिकी कार्यक्रम तसेच वृत्त विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच पत्र सूचना कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते.

# ऑटोचालकावर चायना चाकूने हल्ला

## -अल्पवयीनासह चौघे ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हनुमान नगर परिसरात फटाके फोडण्याच्या किरकोळ वादातून ऑटोचालकावर चायना चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणात पोलिसांनी एका अल्पवयीनासह चौघांना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फरजिन खान फिरोज खान (वय २०, रा. हैदरपुरा) हा जेवणा साठी आपल्या घरी जात असताना रस्त्यावर काही युवक फटाके फोडत होते. त्याचवेळी एक फटाका फरजिनच्या कपड्यांवर येऊन पडल्याने त्याचे कपडे जळाले.



या किरकोळ प्रकारावरून वाद वाढला. दरम्यान फटाके फोडणाऱ्या युवकांनी आपल्या आणखी काही मित्रांना बोलावले आणि क्षणातच हा वाद चाकू हल्ल्यात परिवर्तित झाला. युवकांनी फरजिनवर चायना चाकूने हल्ला करून त्याला जखमी केले व घटनास्थळावरून पसार झाले. उपस्थित नागरिकांनी तात्काळ फरजिनला इर्विन रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती मिळताच खोलापुरी गेट पोलिसांनी तत्परता दाखवत एका अल्पवयीना सह चार जणांना ताब्यात घेतले असून, त्यांच्याविरुद्ध विविध कलमांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळ असलेल्या हनुमान नगर परिसरात तणावाची स्थिती लक्षात घेता पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे.

# रिवेणी कॉलनीमध्ये घरातून १०४ ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या त्रिवेणी कॉलनीतील एका घरामधून १०४.७३६ ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. यामुळे खळबळ उडाली आहे. या दागिन्याची किंमत ७ लाख ३३ हजार २५० रुपये आहे. माहितीनुसार त्रिवेणी कॉलनी मध्ये राहणा-या एका महिलेने धनतेरस च्या दिवशी ५ ग्रॅमची अंगठी व कानातील टॉप्स घेतले होते. या दागिन्यांची पूजा केल्यानंतर सोमवारी सायंकाळी त्या हे दागिने आपल्या कपाटा मध्ये ठेवायला गेल्या. त्यांनी जेव्हा कपाट उघडले तर त्यांना त्यातील लॉकर उघडा दिसला आणि लॉकर मध्ये ठेवलेले त्यांचे दागिने नाही दिसले. त्यांनी तात्काळ पतीला फोन करून दागिने बद्दल विचारपूस केली. त्यांना ही काही माहीत नव्हती. पिडितेच्या मते अलमारी मधून २८ सप्टेंबर रोजी दुपारी ठेवलेले सोन्याचे टॉप्स, बाली ,अंगठी, डोरले, पोत ,कानातले ,चेन ,मनी, पेंडल ,पुगळी, एक लॉकेट ,डोरले असे एकूण १०४.७३६ ग्रॅम सोन्याचे दागिने ( किंमत ७ लाख ३३ हजार २५०) दागिने नाही दिसले. यामुळे महिला घाबरली आणि त्यांनी तत्काळ फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात घटनेची तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# पैलपाडा जवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत पती-पत्नीसह तिघे ठार

## दिवाळीच्या दिवशी बोरगाव मंजू मध्ये शोककळा

**अकोला/प्रतिनिधीः-**दिवाळीच्या रात्री बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर पैलपाडा गावाजवळ झालेल्या भीषण अपघातात दोन पुरुष आणि एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला. ही घटना मंगळवारी रात्री सुमारे ९:४५ वाजता घडली. मृतांमध्ये धिरज सिरसाठ (वय ३५) त्यांची पत्नी अश्विनी सिरसाठ (रा. भीमनगर, बोरगाव मंजू) आणि आरिफ खान (रा. बोरगाव मंजू) यांचा समावेश आहे. ते तिघेही चायनीज नाश्ता गाडीचा व्यवसाय करत होते. माहितीनुसार मृतक धीरज सिरसाठ, अश्विनी सिरसाठ व आरिफ खान नेहमीप्रमाणे मंगळवारच्या रात्री ही कारंजा तालुक्यातील खेर्डा येथे काम आटोपून आपल्या एमएच ३० एबी २००६ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने परत बोरगाव मंजूकडे येत होते. कुरणखेड परिसरात वाहन बंद पडल्याने त्यांनी बोरगाव मंजू येथील मालवाहतूक गाडीच्या मदतीने टोचन करून वाहन आणले. दोन्ही वाहने कुरणखेड आणि पैलपाडा गावाच्या दरम्यान महामार्गावर थांबली असताना चालक टायर तपासण्यासाठी खाली उतरल्यानंतर भरधाव वेगात आलेल्या अज्ञात वाहनाने चौघांना जोरदार धडक दिली. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला तर अन्वर खान हे किरकोळ जखमी झाले आहेत. अज्ञात भरधाव वाहन अमरावतीकडे जात होते, अशी माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, पोलीस निरीक्षक अनिल गोपाल, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर लांडे, धुळे, सचिन सोनटक्के आणि नारायण शिंदे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळी तपास केला.



मृतदेह आपत्कालीन बचाव पथकाच्या मदतीने मुर्तिजापूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले. अपघातानंतर दोन तास महामार्गावरील वाहतूकीला अडथळा निर्माण झाल्याने वाहतुक एकतर्फी करण्यात आली होती. या घटनेमुळे बोरगाव मंजू गावात दिवाळीच्या दिवशी शोक कळा पसरली.

# कंत्राटदारांनी मजुरांना दिवाळी भेट म्हणून दिले टिफिन बॉक्स

## -मजुरांसोबत आनंद वाटून साजरी केली दिवाळी



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे शहरातील सरकारी कंत्राटदारांनी दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर त्यांच्या मजुरांना टिफिन बॉक्स भेट म्हणून दिले. कामगारांसोबत आदर व्यक्त करण्याचा आणि आनंद वाटून घेण्याचा हा अनोखा उपक्रम कार्यक्रमादरम्यान दिसून आला. या भेटवस्तू केवळ मजुरांसाठी उपयुक्त नाहीत तर त्यांच्यात चांगले संबंध निर्माण करण्यास देखील मदत करतात. टिफिन बॉक्स ही मजुरांसाठी एक उपयुक्त आणि व्यावहारिक भेट आहे.ज्याचा वापर ते रोजंदारीसाठी बाहेर पडताना जेवणासाठी करू शकतात. चांदूर रेल्वे शहरातील शासकीय ठेकेदार यांचे बागापूर, चांदूररेल्वे तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच पुलगाव, धामणगाव येथे मोठ्या प्रमाणात काम सुरू आहेत. या कामांवर ते दररोज १५० ते २०० कामगारांना रोजगार देतात. या वर्षी दिवाळी भेट म्हणून टिफिन बॉक्स व मिठाई भेट देण्यात आली. ही भेट म्हणजे कामगारांच्या प्रती आदर आणि कौतुक व्यक्त करण्याचा एक अनोखा मार्ग आहे, ज्यामुळे कंत्राटदार आणि कामगारांमध्ये मजबूत आणि सकारात्मक संबंध निर्माण होतात.यावेळी सरकारी कंत्राटदार सागर जाणे, पप्पू सोळंके, सचिन खंडार, सूरज चौधरी आणि अभिषेक इखे यांनी या दिवाळीच्या सणानिमित्त त्यांच्या कर्मचाऱ्यांना आणि कामगारांना कृतज्ञता व्यक्त करण्याची ही अनोखी पद्धतीने दिवाळी साजरी केली.

**प्रत्येक इमारतीमागे कामगारांचे कष्ट असतात**
'प्रत्येक इमारतीमागे कामगारांचे कष्ट असतात. कामगारांच्या कष्टाशिवाय कोणतीही मोठी रचना उभी राहू शकत नाही.तर, या दिवाळीत गरीब कामगारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची ही एक संधी होती, जी आम्ही खूप चांगल्या प्रकारे पूर्ण केली. कंत्राटदारांच्या वतीने, आम्ही सर्व कामगारांच्या कुटुंबांना आनंदी, समृद्ध आणि आनंदी दिवाळीच्या शुभेच्छा देतो.'
**-पप्पू सोळंके, कंत्राटदार, चांदूर रेल्वे**

# दिवाळीच्या पाडव्यावर चेनुष्ठा येथे एक गाव एक गवळण

## परिसरातील नागरिकांची एकच गर्दी

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील चेनुष्ठा येथील सार्वजनिक गवळण मंडळाद्वारे गेल्या अनेक वर्षापासून गवळण परंपरा कायम आहे. गावात एक गाव एक गवळण दिवाळीच्या दिवशी व दिवाळीच्या पाडव्यावर सर्व गावातील सर्वच जाती-धर्माचे आणि विशेषतः तरुण वर्ग गवळण मध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेतात.



दिवाळीच्या पर्वावर २२ ऑक्टोबर ला दुपारी ३.३० वाजता कुंभारवाडा येथून प्रस्थान होऊन गाईचे घोठाणावर जाऊन नंतर गावाच्या हनुमान मंदिरामध्ये पूजन होऊन संपूर्ण गावात गवळण फिरतात. या पारंपारिक गवळण मध्ये गवळीच्या भूमिकेत सारंग आमले गौळणच्या भूमिकेत कुणाल वानखडे व आयुष शेळके श्रीवल्ली च्या भुमिकेत रोषण कामडी व पुष्पा च्या भुमिकेत अभिजित मेहरे तर ढोलकी वादक मुरलीधर आमले, शंकर उईके,युगल उईके, गजानन खंडारे,तुणतुणी वादक विलास वानखडे, अरविंद आमले, प्रकाश मदनकर, मंजिरी वादक अनिल नेरकर, अविनाश वानखडे,गायक पुंडलिक मेहरे, दिनेश आमले, दिनेश गौड,अजय आमले, दिलीप आमले, प्रभाकर मेहरे,मयुर गौड,रूपेश कामडी, सचिन पडोळे होते. समस्त चेनुष्ठा गावकरी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने गवळण पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती.गौळण शांततेत पार पाडण्याकरिता संपूर्ण गावकरी यांनी सहकार्य केले.

## १ व १० वरिल उर्वरित

### एका मतदाराचे नाव हटवण्यासाठी

मालमत्तांवर छापे टाकले होते. गुत्तेदार हे २०२३ च्या अलंद निवडणुकीत काँग्रेसचे बी. आर. पाटील यांच्याकडून पराभूत झाले होते.एसआयटीने या प्रकरणाचा तपास २६ सप्टेंबर रोजी हाती घेतला असून या तपास पथकाने कलबुर्गी जिल्हा मुख्यालयात असलेल्या एका डेटा सेंटरवर लक्ष्य केंद्रीत केले आहे, कारण येथूनच सर्व अर्ज दाखल करण्यात आले होते. अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी २०२३ मध्ये नावे वगळण्यात आल्याचे लक्षात आल्यानंतर या प्रकरणाचा तपास सुरूवातीला स्थानिक पोलिसांनी आणि सीआयडी सायबर क्राइम यूनिटने केला, ज्यामध्ये मोहम्मद अशफाक नावाच्या एका स्थानिक रहिवाशाचा सहभाग आढळून आला. त्यानंतर तपास एसआयटीने त्यांच्याकडे घेतला.२०२३ मध्ये अशफाकची चौकशी झाली, पण त्याने निर्दोष असल्याचा दावा केल्यानंतर आणि त्याच्याकडील इलेक्ट्?निक उपकरणे पोलिसांना देण्याचे आ□ासन दिल्यानंतर त्याला सोडण्यात आले. त्यानंतर तो दुबईला स्थलांतरीत झाला.

### महाराष्ट्रात विजेच्या गडगडाटासह

समावेश असणार आहे. भारतीय हवामान विभागाच्या मते बंगालच्या उपसागरावर चक्रीवादळ निर्माण झालं आहे. त्यामुळे वारे वाहत असल्याच्या कारणास्तव राज्यात हवामान अस्थिर आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने नागरिकांना खबरदारी म्हणून योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. कारण राज्यातील काही ठिकाणी अचानक वादळ किंवा जोरदार पाउस पडण्याची शक्यता आहे. या संदर्भातील वृत्त फ्री प्रेस जर्नलने दिलं आहे.

मुंबई आणि आसपासच्या उपनगरांमध्ये संध्याकाळी किंवा रात्री गडगडाटासह पाउस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान २५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहू शकतं. पुणे, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगरसह महाराष्ट्राच्या इतर भागांमध्येही अशीच परिस्थिती असणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, भारतीय हवामान खात्याने कोकण पट्ट्यातील मच्छिमार आणि किनारी रहिवाशांना जोरदार वारे वाहत असताना समुद्रात न जाण्याचं आवाहन केलं आहे. तसेच प्रवाशांना प्रवास करताना काळजी घेण्याचा सल्लाही हवामान खात्याने दिला आहे. तसेच २२ ते २६ ऑक्टोबर या दरम्यान येलो अलर्ट कायम राहणार असल्याचंही हवामान खात्याने म्हटलं आहे.

### 'लाडकी'योजनेत १२,४३१

देण्यात आली आहे. या सर्व लाभार्थी लाडक्या भावांना यादीतून काढण्यात आले. पण त्यांनी आतापर्यंत प्रत्येक महिन्याला १५०० रूपयांचा लाभ घेतला, त्याचं काय? त्यांच्यावर कारवाई होणार का? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

**२४ कोटी २४ लाख रुपये हडप-** १२४३१ पुरूषांनी प्रत्येक महिन्याला सरकारच्या तिजोरीतून १५०० रूपयांचा लाभ घेतला. आतापर्यंत या अपात्र लाडक्या भावांनी २४ कोटी २४लाख रूपये लाडकीचे पैसे हडप केले आहेत. तर अपात्र महिला लाभार्थ्यांमुळे१४०.२८ कोटींचा भुर्दंड सरकारला बसल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे. इतकी नावे समोर आली असली तरी अद्याप कोणत्याही व्यक्तीकडून चुकीच्या पद्धतीने मिळवलेल्या लाभाच्या वसुलीची कारवाई सुरू करण्यात आलेली नाही.

### सुनेला अपघात प्रकरणातून

असे म्हणत किशोरी पेडणेकर यांनी टीका केली.

**उर्मिला कानेटकर-कोठारे अपघात प्रकरण-** गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात उर्मिला कानेटकर-कोठारे यांच्या गाडीचा भीषण अपघात झाला होता. उर्मिला आपल्या मैत्रिणीला भेटून तिच्या घरी जात होता. तिचा चालक गजानन पाल हा गाडी चालवत होता. कांदिवाली पोईसर मेट्रो स्थानकाजवळ चालकाचे नियंत्रण सुटले आणि गाडी उलटली. या अपघातामध्ये मेट्रो स्थानकाजवळ काम करणा-या दोन मजुरांना उडवले होते. त्यापैकी सम्राटदास जितेंद्र या नावाचा मजूराचा मृत्यू झाला होता. या अपघातात उर्मिला कोठारेही जखमी झाली होती. तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

**नेमकं काय म्हणाले महेश कोठारे?-** भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी मागाठाणे येथे आयोजित केलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमात दिग्दर्शक महेश कोठारे यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमात भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, भाजपाचे उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, भाजपा उत्तर मुंबई जिल्हाध्यक्ष बाळा तावडेही उपस्थित होते. यावेळी त्यांनी भाजपचे कौतुक करताना महेश कोठारे म्हणाले की, भाजप म्हणजे आपले घर आहे. मी स्वतः भाजपाचा भक्तआहे. मी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा भक्तआहे. या कार्यक्रमांना येउन आनंद होतो. सध्याचे १५ वे वर्ष असून १६ व्या वर्षाचा जो दिवाळीचा जल्लोष होईल, तेव्हा मुंबईत कमळ फुललेले असेल याची मला खात्री आहे, असे ते म्हणाले.

### सोने विक्रमी उच्चांकावरून

सोन्याने १,२९,५८४ रुपयांचा सर्वकालीन उच्चांक गाठला होता. आज चांदीचे दर १०,५४९ ने घसरून १,५२,५०१ प्रति किलो झाले. पूर्वी, चांदी १,६३,०५० प्रति किलो होती. १४ ऑक्टोबर रोजी, चांदीने १,७८,१०० या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचले होते. भारतात हंगामी खरेदी संपली आहेः दिवाळीसारख्या सणांनंतर भारतात सोने आणि चांदीची खरेदी मंदावली आहे. नफा मिळवणे आणि जास्त खरेदी करण्याचे संकेतः गुंतवणूकदार तेजीनंतर नफा बुक करत आहेत. रिलेटिव्ह स्ट्रेंथ इंडेक्स सारखे तांत्रिक निर्देशक दर्शवित आहेत की किमती जास्त खरेदी केलेल्या क्षेत्रात पोहोचल्या आहेत. त्यामुळे, ट्रेंड फालोअर्स आणि डीलर्सनी विक्री सुरू केली आहे.

### नौदलामुळे भारतीयांचा

वर्षांत पंतप्रधानांनी दिवाळीसाठी जम्मू आणि काश्मीरला जास्त म्हणजेच चार वेळा भेट दिली.**संरक्षण निर्यातीत तब्बल ३० पट वाढ-** देशात अलिकडे सरासरी ४० दिवसांनी एक नवीन स्वदेशी युद्धनौका आणि पाणबुडी नौदलात सहभागी होत आहे. आमच्या ब्रम्होस आणि आकाश मिसाइलने ऑपरेशन सिंदूरवेळी आपली क्षमता सिद्ध केली. मागच्या एक दशकात आपली संरक्षण निर्यात ३० पटीने वाढली. यात सर्वात मोठे यश डिफेन्स स्टार्टअपचे आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### क्षुल्लक कारणावरून युवकाची हत्या

जळता फटाका अंगावर फेकल्याचे कारणावरून मो. मुस्तकीम ने अब्दुल सोहेलला शिवीगाळ केली. यानंतर तो तिथून चालला गेला आणि त्याने रात्री अब्दुल सोहेल याला चर्चा करण्यासाठी अल बदर हॉल समोर बोलावले. जिथे दोघांच्या मधात पुन्हा वाद झाला. हा वाद एवढा वाढला की दोघांमध्ये मारहाण झाली.या दरम्यान आरोपी मो मुस्तकीम पठाण ने अ. सोहेलच्या मानेवर आणि खांद्यावर चाकूने वार केले. तसेच अब्दुल सोहेल ने पण आरोपीवर चाकूने हल्ला केला. यामध्ये आरोपी सुद्धा जखमी झाला. जखमी अवस्थेत अ.सोहेलला आधी बेस्ट हॉस्पिटल नंतर जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. आरोपीवर देखील उपचार सुरू आहे. पोलिसांनी सर्वप्रथम सोहेलच्या विरुद्ध ३२४ आणि मो.मुस्तकीम विरुद्ध ३२६ चा गुन्हा दाखल केला होता. अब्दुल सोहेलच्या मृत्यूनंतर मो. मुस्तकीम विरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. बुधवारी सकाळी फॉरेन्सिक टीमने घटनास्थळी पोहोचून पुरावे एकत्रित केले. नागपूरी गेट पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहे.**पाच दिवसांपूर्वी झाला होता वाद-** माहितीनुसार मृतक अब्दुल सोहेल व आरोपी मो.मुस्तकीम यांच्यात पाच दिवसांपूर्वी वाद झाला होता. हा वाद त्या दिवशी निवळला होता. त्यानंतर मंगळवारी रात्री दोघांच्या मधात पुन्हा फटाक्यावरून वाद झाला आणि हा वाद विकोपला गेला. यामध्ये अब्दुल सोहेल ची हत्या झाली. पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे. जखमी असल्यामुळे त्याच्यावर उपचार सुरू आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २३ ऑक्टोंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# परदेशी नागरिकांसाठी धावून गेले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक!

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

**मानवतेचे सर्वोत्तम उदाहरण वाशिम जिल्ह्यात घडले. म्यानमार (ब्रह्मदेश) येथून भारतात देवदर्शनासाठी आलेल्या परदेशी नागरिकांच्या गाडीला समृद्धी महामार्गावर जऊळका फाट्याजवळ १८ ऑक्टोंबर रोजी सकाळी सुमारे तीन वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात १३ वर्षीय मुलगा आणि त्याचे वडील जागीच ठार झाले. अपघातानंतर परदेशी असल्याने आणि भाषेचे ज्ञान नसल्याने हे कुटुंब अत्यंत बिकट परिस्थितीत सापडले.**



त्यावेळी वाशिम जिल्ह्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक धावून आले आणि त्यांनी मानवी संवेदना जपत संपूर्ण जबाबदारी स्वीकारली. प्राप्त माहितीनुसार, गेल्या ३० दिवसांपासून हे पर्यटक भारतभ्रमंती करत होते. त्यांनी अयोध्या, काशी, मथुरा, केदारनाथ, इत्यादी तीर्थस्थळांना भेट दिल्यानंतर मुंबईवरून जगन्नाथ पुरीकडे जाण्याचा त्यांचा बेत होता. परंतु, काही कारणास्तव त्यांची रेल्वे चुकल्याने त्यांनी मुंबईवरून नागपूरमार्गे खाजगी

## वाशिममध्ये म्यानमारच्या नागरिकांचा भीषण अपघात; वडील-मुलाचा जागीच मृत्यू, RSS स्वयंसेवकांनी पार पाडल्या अंत्यसंस्काराच्या सर्व क्रिया

वाहनाने प्रवास सुरू केला होता. गाडीत तीन पुरुष, दोन महिला आणि एक मुलगा होता.

जऊळका फाट्याजवळ वाहनचालकाला झोपेची डुलकी लागल्याने गाडी डिव्हायडरवर आदळली. अपघात इतका भीषण होता की वडील आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर जखमी पर्यटकांना वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी वडील आणि मुलगा दोघेही मृत झाल्याचे घोषित केले.

परदेशी नागरिक असल्यामुळे त्यांच्या नातेवाईकांना संपर्क करणे व अंत्यसंस्काराची व्यवस्था करणे ही मोठी अडचण होती. मात्र, परिस्थितीची जाणीव होताच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक तात्काळ रुग्णालयात पोहोचले आणि त्यांनी प्रशासनासह सर्व कायदेशीर, धार्मिक आणि सामाजिक प्रक्रिया स्वतःच्या जबाबदारीवर हाताळल्या.

मृत व्यक्तींच्या कुटुंबाने स्थानिक हिंदू धर्मपद्धतीनुसार वाशिमच्या मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला. एकाच सरणावर वडील आणि मुलाचा अंत्यसंस्कार करण्यात आला.

या वेळी त्यांच्या ब्रह्मदेशातील नातेवाईकांशी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क ठेवण्यात आला होता. तिकडून मंत्रोच्चार सुरू असतानाच वाशिम येथे अंत्यसंस्कार विधी पार पडले. अत्यंत जड अंतःकरणाने त्या आईने आपल्या मुलाला आणि पतीला मुखाग्नी दिला.यानंतर त्यांची अस्थी वाशिममधील पवित्र पद्मतीर्थ धामात प्रथेप्रमाणे विसर्जित करण्यात आली. त्यानंतर त्या परिवाराला संघाच्या मदतीने त्यांच्या मायदेशी पाठविण्यात आले. या प्रसंगी स्वयंसेवक म्हणाले, 'परदेशी असो वा देशी — मानवतेपेक्षा मोठा धर्म नाही. या दुर्दैवी घटनेत आम्ही आमचे कर्तव्य पार पाडले.'

त्या म्यानमारच्या मातेला डोळ्यांत अश्रू आणत ती म्हणाली, ''एए ने आम्हाला आमच्या कुटुंबासारखी साथ दिली... आम्ही हे आयुष्यभर विसरणार नाही.' वाशिमच्या इतिहासात ही पहिलीच घटना आहे, ज्या अंतर्गत परदेशी नागरिकांचा अंत्यसंस्कार स्थानिक पद्धतीने पद्मतीर्थधाम येथे करण्यात आला.

# दिवाळीच्या दिवशी कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

अतिवृष्टीमुळे झालेली नापिकी व कर्जबाजारीपणामुळे हताश झालेल्या दुघोरा ता.कारंजा येथील अल्पभूधारक वृद्ध शेतकऱ्याने दिवाळीच्या दिवशीच अर्थात २१ ऑक्टोबर रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे.

वासुदेव नारायण भगत, (७१, रा. दुघोरा ता. कारंजा) असे आत्महत्या करणाऱ्या वृद्ध शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या नावे चार एकर शेत असून, यंदाच्या खरीप हंगामात त्यांनी सोयाबीन पिक घेतले होते. पण अतिवृष्टीमुळे या पिकाची उगवण क्षमता कमी झाल्याने संबंधित शेतकऱ्याला चार एकरामध्ये फक्त चार पोते सोयाबीन झाले.

त्यामुळे बँकेचे पिक कर्ज कसे भरावे? आणि उदरनिर्वाह कसा करावा? अशा विवंचनेत त्यांनी २० ऑक्टोबरच्या मध्यरात्री नंतर स्वतःच्या घरात लाकडी नाटिला गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच कारंजा



## दुघोरा येथील हृदयद्रावक घटना

ग्रामीण पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक प्रवीण शिंदे यांच्या मार्गदर्शनात स.फौ. विनोद महाकाळ व पोहेका छोटे बली पप्पूवाले यांनी घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला. तसेच मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला होता. याप्रकरणी मुलगा अविनाश वासुदेव भगत (४४, रा. दुघोरा) यांच्या फिर्यादीवरून कारंजा ग्रामीण पोलिसांनी मर्ग दखल केला आहे. त्यांच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे असून एका मुलाने काही वर्षापूर्वी गळफास घेऊन आत्महत्या केली होती हे येथे उल्लेखनीय आहे.

# राजस्थानी समाजाचा अनकूट स्नेहसंमेलन व ५६ भोग दर्शन उत्साहात



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

दरवर्षीप्रमाणे दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी वाशीम येथील समस्त राजस्थानी समाजाच्या वतीने अन्नकूट स्नेह मिलन व छपनभोग दर्शन कार्यक्रम स्थानिक महेश भवन येथे २२ ऑक्टोंबर रोजी उत्साहात पार पडला.

यावेळी सभागृहात भगवान बालाजी ची आकर्षक प्रतिमा समोर ५६ भोग प्रसादी ठेवण्यात आली होती .आचार्य पंडित विजयपकाश दायमा, पंडित नीरज उर्फ लाला शर्मा ,पंडित आनंद दायमा यांच्या उपस्थितीत आरती व ५६ भोग प्रसादी चे भोग भगवान श्रीकृष्णाच्या चरणी अर्पण करण्यात आले. यावेळी गायक भक्तांनी उत्साहात श्री बालाजी ची आरती सादर केली .तदनंतर सर्व भक्तांना महाप्रसाद सोबत छप्पन भोग प्रसादीचे वितरण करण्यात आले.

## सामाजिक वनीकरणाची 'झाडे लावा, झाडे जगवा' योजना कागदावरच का?

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी दरवर्षी सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात येते. वृक्षारोपण करताना त्यावर कोट्यवधीचा खर्च केला जातो. मात्र, लावलेली झाडे जगली की नाहीत याचे मूल्यमापन सामाजिक वनीकरणांकडून होत नसल्याने कोट्यवधी रुपये खर्च करून लावलेल्या रोपट्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसून येत आहे. शासनामार्फत गाव पातळीवर सामाजिक वनीकरण विभागाकडून वृक्षारोपणासाठी अनेक योजना राबवल्या जातात. मात्र, या योजना गावपातळीपर्यंत पोहोचताना दिसत नसून 'झाडे लावा झाडे जगवा' वृक्ष लागवड योजना कागदावरच दिसून येत असल्याने सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांचे या बाबीकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे.

# पैनगंगानदीवरचे बंधाऱ्यातील अडकलेला काडी- कचरा व लाकडे कधी काढणार?

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवर जलसंपदा विभागाअंतर्गत येत असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याच्या दुरावस्था बघता शेतकऱ्यांच्या मागणीला अद्याप प्रतिसाद सुद्धा दिला नाही.शेतकरी शेवटच्या श्वासापर्यंत पाणी मिळण्यासाठी आशा ठेवून जगत आहेत. त्याचप्रमाणे जलसंपदा विभागाचे इंजिनियर चिखलीकर यांनी १५ ऑक्टोबर पर्यंत कोल्हापुरी बंधाऱ्यातील लाकडे व काडी- कचरा काढण्यात येईल आणि हे आश्वासन हवेत विरले, असून कोणताही परिणाम जलसंपदा विभागावर झाला नसल्याचे यावरून दिसते. जलसंपदा विभाग कोल्हापुरी बंधाऱ्यातील गाडी कचरा व गेट टाकण्यासंदर्भात कर्जाची दाखवत आहे. जलसंपदा विभाग शेतकऱ्यांच्या मुळावर बसला असून शेतकऱ्यांसाठी पाणी



## जलसंपदा विभाग बसला शेतकऱ्यांचा मुळावर?

अडवल्या संदर्भात स्मरण कधी होईल?, याची वाट शेतकरी पाहत आहे. सध्या स्थितीतही आजच्या परिस्थितीवरून वाटतं, आसेगावपेन येथील कोल्हापुरी बंधाऱ्यातील लाकडे व गाडी कचरा काढण्यासाठी कामाला सुरुवात झाली नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.

सध्या स्थितीत तरी २२ ऑक्टोबर पर्यंत कोल्हापुरी बंधाऱ्याचे गेट बसले नसल्याने याबाबत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरु होण्याची वाट जलसंपदा विभाग पाहात आहे का?, तसंच पैनगंगा नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्या अंतर्गत शेत जमीन येत असलेल्या सर्व शेतकऱ्यांना वाटत आहे. रब्बी हंगामासाठी पाणी अडवण्याकरिता लोखंडी गेट टाकून त्यामध्ये रबरी सीटा बसवण्यात याव्यात. गेट टाकतांना संपूर्णतः लिकेजेस बंद होईल याची सुरुवातीलाच दखल घ्यावी. याबाबत जलसंपदा विभागाने दखल घेऊन लवकरात- लवकर कोल्हापुरी बंधाऱ्यातील काडी-कचरा काढून त्यामध्ये गेट टाकण्याची प्रक्रिया सुरू करावी.त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता मिटू शकते. या परिसरातील येवती, आसेगावपेन, चिंचाबापेन, मसला पेन, भापूर,कवठा खुर्द,बाळखेड, धोडप , इत्यादी गावातील शेतकरी नारायणराव सरनाईक (माजी सरपंच), पुरुषोत्तम सरनाईक, माणिक देव्हडे, ज्ञानेश्वर सरनाईक, वैभव सरनाईक, भाऊसाहेब सरनाईक, गजानन बोडखे, सुनील अलाट, शिवाजी अवताडे,नशीरखान पठाण,ज्ञानबा घोडे, सुनील खानझोडे, अनिल खानझोडे,इत्यादी शेतकऱ्यांनी मागणी ही केली आहे.

# रस्त्यावरच्या कुटुंबांसोबत दिवाळी साजरी



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

दिवाळी हा सण आनंद, उजेड आणि प्रेमाचा प्रतीक मानला जातो. मात्र समाजात असे अनेक कुटुंबे आहेत ज्यांच्यासाठी अंधार अजूनही कायम आहे — ज्यांच्याकडे स्वतःचं घर नाही, स्थिर उत्पन्न नाही आणि शिक्षणाची साधनंही नाहीत. अशा वंचित घटकांपर्यंत दिवाळीचा आनंद आणि शिक्षणाचा उजेड पोहोचविण्याचा एक संवेदनशील आणि प्रेरणादायी प्रयत्न 'महामानव अल्पसंख्यांक बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था' या नव्या स्वयंसेवी संस्थेकडून करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा श्रद्धा गवई यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात श्रीराम गवई, संघानंद ताजणे, तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अंतर्गत रस्त्यावर झोपड्या टाकून राहणाऱ्या कुटुंबांना भेट देत लहान मुलांना शैक्षणिक साहित्य — पुस्तके, वह्या, पेन्सिली — तसेच दिवाळीच्या गोडधोड भेटवस्तू वाटण्यात आल्या. मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हसू हेच या उपक्रमाचे सर्वात मोठे यश ठरले. या वेळी बोलताना श्रीराम गवई म्हणाले, 'आपण फक्त दिवाळी साजरी करण्यापुरतेच नव्हे, तर या मुलांपर्यंत शिक्षणाचा उजेड पोहोचविण्यासाठी हे पहिले पाऊल आहे. शिक्षण हीच खरी दिवाळी आहे.' संस्थेचा उद्देश समाजातील मागास, अल्पसंख्यांक आणि वंचित घटकांपर्यंत शिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतेचा संदेश पोहोचविणे हा आहे. या दिवाळीला 'महामानव अल्पसंख्यांक बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था'ने दिलेला हा प्रकाश केवळ दिव्यांचा नाही, तर मानवतेचा नवा दीप पेटविणारा ठरला आहे.

# सोयाबीनचे उत्पादन घटले अन् भावही घसरले; शेतकरी आर्थिक संकटात

**■ प्रतिनिधी | मानोरा ■**

सततच्या व मुसळधार पावसामुळे सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाले. पावसाच्या विश्रांतीनंतर सध्या सोयाबीन काढणीचा हंगाम सुरू झाला आहे.अनेकांची सोयाबीन काढणी झाली असून यावर्षी सोयाबीनचे उत्पादन घटले आहे. त्यातच सोयाबीनचे बाजारभावही घसरल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांची दुर्दशा पाहून सोयाबीनच्या हमीभावात वाढ करावी तसेच तातडीने शासकीय खरेदी केंद्र सुरू करावे अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होवू लागली आहे.

या वर्षी सुरुवातीपासूनच सतत पाऊस, तर कधी अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्याचे खरिपातील महत्त्वाचे सोयाबीनचे पीक हातचे गेले आहे.यावर्षी सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घटले आहे. त्यातच सोयाबीनचे बाजारभावही घसरल्यामुळे शेतकरी कोंडीत सापडला आहे. सोयाबीनला हमीभावापेक्षाही कमी भाव मिळत असल्यामुळे ऐन दिवाळीत शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला आहे. यावर्षी सोयाबीनचा उतारा सरासरी तीन ते चार प्रती एकर निघत असल्याने सोयाबीनच्या हमीभावात वाढ करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. उत्पादनात निम्म्यापेक्षा अधिक घट येत असून सध्या सोयाबीनचे बाजारभाव चार हजारांच्या आसपास आहेत. सोयाबीनला कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. उत्पादनापेक्षा लागवडीपासून तर कापणी पर्यंतचा खर्च जास्त झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. खर्च वाढला व उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांना दुहेरी फटका बसला आहे.

# गरजवंतांच्या दारी पोहचला दिवाळीचा फराळ व मिठाई

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

गत २२ वर्षापासून सामाजिक कार्यकर्ते नीलेश सोमाणी, डॉ. दीपक ढोके हे दिवाळीनिमित्त गरजवंतांच्या दारी पोहोचून त्यांना फराळ व मिठाई देऊन त्यांच्या समवेत दिवाळी साजरी करून माणुसकीचे दर्शन घडवित आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही त्यांनी उपक्रम राबविला.

दिवाळी निमित्त २१ व २२ ऑक्टोबर रोजी स्थानिक अकोला नाका परिसर, पोलीस स्टेशन स्टेशनसमोरील रस्त्यावर ,झोपड्या करून राहणारे गरजवंत मुले, मुली, अकोला नाका परिसरातील उघड्यावर राहणारे परिवार, जिल्हा सामान्य रुग्णालय, बस स्थानक, पुसद नाका, रेल्वे स्टेशन परिसर या ठिकाणी जाऊन दिवाळीचा फराळ,



मिठाई त्याना भेट देऊन त्यांची दिवाळी साजरी केली.

बेघर मुलांना दिवाळी निमित्त साहित्य वाटप करताना मान्यवर.गरजवंतांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न या समाजसेवीकडून करण्यात आला. आकस्मिक मिळालेल्या आगळ्या वेगळ्या भेटीने अनेक गरजवंतांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. दरवर्षी सोमाणी व डॉ. ढोके हे दिवाळीसोबतच कडाक्याच्या थंडीतही गरजवंतांना ब्लकेटचे वितरण करण्यासोबत विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवीत असतात.सामाजिक उपक्रमात तन, मन, धनाने सहभागी होऊन मदत करीत असतात. यावेळी नीलेश सोमाणी, डॉ. दीपक ढोके यांच्या समवेत अनुज ढोके, आयूष ढोके, तेजस सोमाणी, पूर्वा सोमाणी उपस्थित होते. सदर उपक्रमाची सर्वत्र प्रशंसा केली.

# प्रा. अभिजित ढोरे यांना गणित विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

## गडद उर्जेवरील संशोधनात मिळवली उल्लेखनीय कामगिरी

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

मुर्तिजापूर येथील डॉ. आर. जी. राठोड कला आणि विज्ञान महाविद्यालयात गणित विभागात कार्यरत असलेले प्रा. अभिजित ओमप्रताप ढोरे यांनी आपल्या शैक्षणिक कार्यात उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती तर्फे गणित विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा. ढोरे यांचा संशोधनाचा विषय — 'Investigations of Dark Energy in Modified Theories of Gravitation' — हा आधुनिक गणित व भौतिकशास्त्राच्या संगमावर आधारित असून, विश्वातील 'डार्क एनर्जी'विषयी नव्या दृष्टीकोनातून अभ्यास करणारा आहे. या विषयावर त्यांनी सखोल संशोधन करून मौलिक निष्कर्ष मांडले आहेत. त्यांनी आपला संशोधनप्रबंध सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग



अँड टेक्नॉलॉजी, अमरावती येथील गणित विभागातील प्रा. डॉ. मोहिनी नसे-उगले (काळे) यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला. संशोधनाच्या कालावधीत त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन, विश्लेषणात्मक विचार व सातत्यपूर्ण परिश्रम यांचा सुंदर समन्वय साधला.

प्रा. ढोरे यांनी आपल्या या यशाचे श्रेय आपल्या आप्तस्वकीय, सहकारी प्राध्यापक, महाविद्यालयीन सहकर्मी तसेच विद्यार्थ्यांना दिले आहे. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक व वैज्ञानिक वर्तुळात त्यांचे अभिनंदन होत आहे. या कामगिरीमुळे स्थानिक शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, प्रा. ढोरे हे तरुण संशोधकांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.

## वंचित महिलांची दिवाळी केली गोड गोरगरिबांच्या चेहऱ्यावर फुलला आनंद

**■ प्रतिनिधी | रिसोड ■**

तालुक्यातील केनवड येथे दिवाळीनिमित्त वंचितांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि एकात्मतेचा सण असला तरी प्रत्येकाच्याच आयुष्यात हा उजेड समानतेने पोहोचत नाही. पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे अनेक गरजू कुटुंबांना या सणाचा आनंद लांबच राहतो. याच पार्श्वभूमीवर समाजातील वंचित घटकांपर्यंत आनंदाचा किरण पोहोचविण्याच्या हेतूने जय गजानन महिला सेवाधारी गट आणि गजानन गोळे यांच्या संयुक्त विद्यमाने केनवड येथे एक सुंदर सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत गावातील अनेक गोरगरिब कुटुंबांना दिवाळी फराळाचे साहित्य तसेच कपड्यांचे वाटप करण्यात आले. या निमित्ताने दिवाळी साजरी करण्याची संधी मिळाल्याने चेहऱ्यावर हास्य फुलले.

## आजाद समाज पार्टीचा निर्धार

# वाशिम जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका स्वबळावर लढवणार!

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

जिल्ह्यातील आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगर परिषद निवडणुकांमध्ये आजाद समाज पार्टी स्वबळावर उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा पश्चिम विदर्भाचे महासचिव किशोर मानकर यांनी केली आहे.मानकर म्हणाले की, 'आज राज्यात आणि जिल्ह्यात घराणेशाही, भ्रष्टाचार, अन्याय आणि अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत. सत्तेला चिकटलेले गोचिड सत्ताधारी केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी कार्यरत आहेत, तर कष्टकरी, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनता महागाई, शिक्षण आणि आरोग्याच्या गंभीर प्रश्नांनी त्रस्त आहे.'



त्यांनी पुढे सांगितले की, 'या अन्यायाविरोधात आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना आवाज देण्यासाठी फुले–शाहू– आंबेडकरी विचारांच्या कार्यकर्त्यांना पुढे आणणे गरजेचे आहे. म्हणूनच आजाद समाज पार्टी जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका स्वबळावर लढवणार आहे.'मानकर यांनी स्पष्ट केले की, 'आजाद समाज पार्टी ही सर्वसामान्य जनतेची, वंचित बहुजनांची आणि कष्टकरी वर्गाची खरी प्रतिनिधी पक्ष आहे. जनतेच्या प्रश्नांवर भक्कम नेतृत्व तयार करून समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.'तसेच त्यांनी इच्छुक कार्यकर्ते आणि समाजसेवकांना आवाहन केले की, 'आगामी निवडणुकांमध्ये पक्षाचे उमेदवार म्हणून काम करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी सिद्धार्थ देवरे, दत्तराव धांडे, किशोर मानकर, सुभाष अंभोरे यांच्याशी संपर्क साधावा. या निवडणुकांतून आजाद समाज पार्टी नव्या राजकीय विचारांचा आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखवेल, असा ठाम विश्वास पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३२३ ■ गुरुवार, २३ ऑक्टोबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# भाजप सरकारच्या धोरणांविरोधात 'काळी दिवाळी

## -शेतकऱ्यांच्या न्यायासाठी महाविकास आघाडीचे धरणे आंदोलन

### -कर्जमाफीचा शब्द पाळा खासदार अमर काळे

**वर्धा जनमाध्यम :** अतिवृष्टी, रोगराई, अपुरी नुकसान भरपाई आणि कर्जबाजारीपणामुळे हैराण झालेल्या शेतकऱ्यांच्या न्यायासाठी महाविकास आघाडीच्या वतीने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'काळी दिवाळी' धरणे आंदोलन करण्यात आले. 'सरकार सण साजरा करतेय, पण शेतकऱ्यांच्या घरात दिवाळीशिवाय अंधार आहे, असा एल्गार या आंदोलनात उमटला.या आंदोलनाचे नेतृत्व खासदार अमर काळे यांनी केले. सोयाबीन आणि कापूस उत्पादकांचे अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले असून, चारकोल रॉट व यलो मोझॅक रोगांमुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. पण सरकारकडून जाहीर झालेली नुकसान भरपाई अद्याप बँक खात्यात जमा झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.धरण्यादरम्यान माजी राज्यमंत्री रणजित कांबळे, माजी राज्यमंत्री व शिवसेना (उबाठा) नेते अशोक शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, काँग्रेस नेते शेखर शेंडे, सुनील राऊत, जिल्हाध्यक्ष




मनोज चांदुरकर, डॉ. अभ्युदय मेघे, सुधीर पांगूळ यांनी सरकारच्या शेतकरीविरोधी भूमिकेवर सडकून टीका केली.

**मुख्यमंत्री असंवेदनशील, कर्जमाफीचा पाझर फुटलेलाच नाही : अमर काळे**

अतिवृष्टी व नापिकीमुळे अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई देऊ असे सरकारने सांगितले, पण शेतकऱ्यांच्या खात्यात आजही एक पैसाही जमा झालेला नाही. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार, असे सांगून सत्तेवर आलेल्या महायुती सरकारची संवेदनशीलता संपली आहे, अशी तीव्र टीका खासदार काळे यांनी केली.

**सरकार शेतकऱ्यांची फसवणूक करतेय ; माजी राज्यमंत्री रणजित कांबळे** -वर्धा जिल्ह्यात ५५ महसूल मंडळांपैकी ३५ मंडळ अतिवृष्टीग्रस्त जाहीर करण्यात आली आहेत, मात्र उर्वरित २० मंडळांचा प्रस्ताव अजूनही शासन दरबारी प्रलंबित आहे. मुख्यमंत्र्यांनी १८ हजार ५०० रुपयांच्या नुकसान भरपाईचे आश्वासन दिले; पण प्रत्यक्षात ८ हजार ५०० रुपयेच शेतकऱ्यांना देण्यात आले आहेत. ही शेतकऱ्यांची दिशाभूल आणि फसवणूक आहे, असा आरोप कांबळेंनी केला.

**आंदोलनात मोठा जनसहभाग**

काळी दिवाळी आंदोलनात जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा कलावती वाकोडकर, काँग्रेसचे राजेंद्र शर्मा, बालू वानखेडे, दशरथ ठाकरे, अतुल पन्नासे, अर्चना भोमले, प्रवीण हिवरे, बाळकृष्ण माऊस्कर, वीणा दाते, बाळा नांदुरकर, महेश झोटिंग, रिपाइंचे विदर्भ प्रमुख महेंद्र मुनेश्वर, अरुणा धोटे, सुरेश ठाकरे, इक्राम हुसैन यांच्यासह विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी व शेकडो शेतकरी उपस्थित होते.


**शेतकऱ्यांच्या मागण्या ठाम**

आंदोलनातून महाविकास आघाडीने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, ओल्या दुष्काळाचे पॅकेज वाढवणे, वर्धा जिल्ह्यात ओला दुष्काळ घोषित करणे, वन्यजीवांकडून झालेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाई वाढवणे, तसेच सोलर पंप ऐच्छिक ठेवून दोन्ही पर्याय उपलब्ध करणे या मागण्या सरकारसमोर ठेवल्या.महाविकास आघाडीचे नेते म्हणाले, सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहे. आम्ही सरकारला अद्याप वेळ दिली आहे, पण जर मागण्यांकडे दुर्लक्ष झाले, तर राज्यभर तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात येईल.

# दिवाळीच्या रात्री यूसीएनच्या कार्यालयाला आग

## -इंटरनेट सेवा ठप्प, लाखोंचं नुकसान

**वर्धा जनमाध्यम :** लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री आनंदाच्या फटाक्यांनी आकाश दणाणत असताना बॅचलर मार्गावर मात्र आगीच्या ज्वाळांनी काळोख पसरवला, यूसीएन नेटवर्कच्या कार्यालयाला लागलेल्या भीषण आगीत संपूर्ण युनिट जळून खाक झाल्याने परिसरात प्रचंड गोंधळ उडाला.



रात्री सुमारे नऊच्या सुमारास कार्यालयातून धूर निघत असल्याचे दिसताच नागरिकांनी अग्निशमन विभागाला कळविले. वर्धा नगरपालिकेच्या जवानांनी तातडीने धाव घेत पाण्याचा मारा सुरू केला आणि तब्बल दीड तासानंतर आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र तोपर्यंत सर्व उपकरणे राख झालेली होती.या आगीत लाखोंचे नुकसान झाल्याची चर्चा असून काही काळासाठी शहरातील इंटरनेट सेवा ठप्प झाली. फटाक्यांच्या ठिणगीमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. रामनगर पोलिसांनी घटनेची नोंद घेत चौकशी सुरू केली आहे. दिवाळीच्या जल्लोषात घडलेल्या या घटनेने वर्धा शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# पुष्पा जातीच्या कापसाला ८१०० रुपयांचा दर

### सिंदी रेल्वे परिसरात कापूस खरेदीला सुरुवात, शेतकऱ्यांत उत्साह

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** यंदाच्या हंगामातील कापूस खरेदीला चांगली सुरुवात झाली असून सिंदी रेल्वे परिसरात दर ८१०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. सेलू येथील व्यापाऱ्याने खडकी (ता. आमगाव) येथील शेतकरी इरफान अली सैय्यद यांच्या 'पुष्पा' जातीच्या कापसाला हा दर दिल्याने बाजारपेठेत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.सैय्यद यांच्या सात एकर सिंचित शेतीतून पहिल्या वेच्यात सुमारे २२ क्विंटल कापूस निघाला.



दिवाळीचा हंगाम सुरू असतानाच त्यांनी स्वतःच्या वाहनातून हा कापूस सेलू बाजारात आणला. दफ्तरी बी-बियाणे उत्पादक संस्थेअंतर्गत व्यापाऱ्यांनी गुणवत्तेनुसार ८ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल दर देत शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवला.अलीकडील काळात कापसाच्या दरात स्थिरता नसल्याने शेतकरी चिंतेत होते. मात्र, या दरवाढीमुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा उजळल्या असून परिसरात उत्साहाचे वातावरण आहे.

# रेती तस्करांचा साम्राज्य संघर्ष रक्तात संपला

## अवैध रेती घाटाच्या वादातून रवींद्र पारिसेची हत्या

**देवळी जनमाध्यम :** देवळी तालुक्यातील वर्धा नदी घाटांवर राज्य करणाऱ्या रेती माफियांचा खूनी खेळ अखेर प्राणघातक ठरला. अवैध रेती उत्खननाच्या सीमावादातून आंजी घाटावरील तस्कर रवींद्र अशोक पारिसे (वय ५०, रा. अंदोरी) याची सोमवारी रात्री निर्दयपणे हत्या करण्यात आली.



अवैध रेतीतून कोट्यवधींचा खेळ चालत असताना, सरकार व प्रशासन डोळेझाक करून बसलेले असतानाच या माफियांच्या युद्धात परिसर हादरला. रवींद्र पारिसे याला प्रतिस्पर्धी तस्कर रोहन देशमुख आणि त्याच्या टोळीने यवतमाळ जिल्ह्याच्या सीमेवरील ए.बी. बार येथे बोलावून चाकू, दगड, ब्लेडच्या साह्याने ठार मारले. रक्ताच्या थारोळ्यात पारिसेचा जीव सोडला.हत्या करीत आरोपी फरार झाले असून पोलीस आजही त्यांचा माग काढण्यात अपयशी ठरत आहेत. आरोपींमध्ये रोहन देशमुख (रा. आंजी), पंकज जबडे, सुनील तेलरांधे, तुषार रघाटाटे उर्फ बाटा आणि योगेश बोटफोले यांचा समावेश आहे.वर्धा नदीलगतच्या शिरपूर, अंदोरी, रोहिणी, तांबा, कविटगाव आदी घाटांवर मोठ्या प्रमाणावर रेती माफियांची मक्तेदारी आहे. जिल्ह्यात रेती तस्करांचे ट्रॅक्टर, टिप्पर आणि जेसीबी उघड्यावर चालत आहेत, पण संबंधित अधिकाऱ्यांना त्याचे काहीच दिसत नाही. राजकीय आशीर्वादामुळे रेती माफिया अक्षरशः कायदा खिशात घेऊन फिरत आहेत.अंदोरी नदी पार करताच यवतमाळ जिल्ह्यातील धाबे आणि बियर बार हे तस्करांची अड्डे बनले आहेत. रेतीचे हिशेब, पैसे आणि सत्ता यावरून इथेच रक्तपाताचे नाट्य रंगते. स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की पोलिस प्रशासन या गुन्हेगारी व्यवहारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.रवींद्र पारिसे हा रेती तस्कर असला तरी समाजकारण करणारा माणूस म्हणून ओळखला जात होता. त्याच्या मृत्यूने अंदोरी गाव शोकाकुल झाले. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी दिवे न लावता पारिसेच्या अंत्यसंस्कारावेळी गावकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू होते.

अवैध रेतीमागील सत्ताधारी आणि प्रशासन यांचा नवा संगनमताचा चेहरा पुन्हा एकदा उघडा पडला आहे.



रांगोळीतील प्रत्येक रंगात साजणाऱ्या संस्मरणांचा, प्रेमाचा आणि सांस्कृतिकतेचा संगम आहे. हे रंगत जीवनाला आनंद देणारे ठरतात. वर्धेचे कलाकार दिलीप माधुस्कर यांनी दिवाळीनिमित्त कृष्णाची फारच मनमोहक रांगोळी साकारली.

**फोटो:राहुल तेलरांधे वर्धा**



### लक्ष्मीपुजनाच्या दिवशी शेतकऱ्याचा हताश निर्णय

# ९ एकरातील सोयाबीनच्या पिकाला दिली आग

**गिरड (ता. समुद्रपुर) जनमाध्यम :** अतिवृष्टी आणि रोगट हवामानामुळे हाताशी आलेले सोयाबीन पीक फसल्याने गिरड येथील एका शेतकऱ्याने लक्ष्मीपुजनाच्या दिवशीच स्वतःच्या ९ एकरातील उभ्या पिकाला आग लावली. मेहनतीचे स्वप्न आगीत जळताना पाहून गावभर हळहळ व्यक्त होत आहे.गिरड येथील शेतकरी राजेंद्र गिरडे यांनी हंगामाच्या सुरुवातीला दर्जेदार सोयाबीन बियाणे, खते आणि किटकनाशके वापरून शेती केली होती. सुरुवातीला पीक जोमात असले तरी नंतर रोगाचा प्रादुर्भाव वाढला आणि शेंगा भरल्या नाहीत. तरीही थोडेफार उत्पादन मिळेल या आशेने त्यांनी कापणी केली; मात्र शेंगांत दाणाच नसल्याचे लक्षात आले.निराश झालेल्या गिरडे यांनी अखेर लक्ष्मीपुजनाच्या दिवशीच ९ एकरातील सोयाबीनचे पीक स्वतःच्या हाताने जाळून टाकले. या घटनेत त्यांचे सुमारे तीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.गेल्या काही दिवसांपासून समुद्रपुर तालुक्यातील अनेक शेतकरी अतिवृष्टी व रोगट हवामानामुळे अडचणीत सापडले असून सरकारी मदतीकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

# शॉर्टसर्किटमुळे दांडेकर कुटुंबाचे घर राख; खा.काळे यांनी तत्काळ घेतली मदतीची जबाबदारी

**हिंगणघाट जनमाध्यम :** वडनेर गावात मंगळवारच्या मध्यरात्री शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत दांडेकर कुटुंबाचे संपूर्ण घर जळून खाक झाले. या घटनेत घरातील सर्व वस्तू, कपडे, धान्य, फर्निचर, कागदपत्रे व वीज उपकरणे राख झाली असून कुटुंब अक्षरशः उघड्यावर आले आहे. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.घटनेची माहिती मिळताच खासदार अमर काळे यांनी तातडीने वडनेर येथे भेट दिली. त्यांनी जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांच्या सोबत स्थलपरिस्थितीचा



आढावा घेत, उपविभागीय अधिकाऱ्यांना पंचनामे करून तातडीने मदत देण्याच्या सूचना दिल्या.या प्रसंगी ओबीसी जिल्हाध्यक्ष प्रशांत घवघवे, जिल्हा सरचिटणीस दशरथ ठाकरे, तालुका अध्यक्ष विनोद वानखेडे, युवक कांग्रेस प्रदेश संघटक संदीप किटे, युवक जिल्हाध्यक्ष प्रणय कदम, मिलिंद कोपुलवार, अनिल कोंबे, नामदेव राऊत, युवक तालुका अध्यक्ष राहुल वानखेडे, प्रवीण कलोडे, गुरुद्याल सिंग जुनी, पंकज मानकर आदी उपस्थित होते.ग्रामस्थांनी दांडेकर कुटुंबाला दिलासा देण्याचे आवाहन केले असून प्रशासनाकडून लवकरच मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# महामार्गावर टपोरींचा गोंधळ; वाहने अडवून फोडले फटाके, वाहनचालक त्रस्त

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहराजवळील बुटीबोरी–तुळजापूर महामार्गावरील जुनापानी परिसरात मंगळवारी रात्री काही युवकांच्या टोळीने गोंधळ माजवला. सुमारे २५० ते ३०० युवकांनी रस्त्यावर येऊन फटाके फोडत वाहतूक अडवली, त्यामुळे काही काळ परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले.फटाक्यांच्या मोठ्या आवाजामुळे अनेक वाहनचालक घाबरून थांबले, काहींनी प्रसंगावधान राखत अचानक ब्रेक मारल्याने अपघात टळला.

या प्रकारामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलीस चौकशी करत असून टपोरी युवकांच्या टोळीचा शोध सुरू करण्यात आला आहे. सार्वजनिक रस्त्यावर अशा प्रकारे गोंधळ घालणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेशी खेळ करणे हे गंभीर प्रकरण असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.अलीकडेच वाहतूक पोलिसांनी शहरात दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई सुरू केली होती. त्यानंतर गोंधळखोरांनी महामार्गावर थैमान घालण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा सुरु आहे. दरम्यान, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत पुढील कारवाई सुरू केल्याचे सांगितले.

# दालमिलमध्ये मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक मोटर आणि साहित्य चोरी

**तळेगाव (वर्धा) -** श्रीकृष्णाई इंडस्ट्रीज, तळेगाव येथील दालमिलमध्ये अज्ञात चोरट्यांनी मोठ्या प्रमाणावर चोरी केली आहे. दिनांक १४ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर दरम्यान घडलेल्या या चोरीत २१ इलेक्ट्रिक मोटर, एलईडी टीव्ही, कॉपर वायर, मोटर बेल्ट व मशीन स्टँडसह अंदाजे ९०० किलो दाळीचे प्लास्टिक पोते लंपास झाले आहेत.फिर्यादी मोहित अशोकराव राऊत व्यवसाय दालमिल मालक यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिस तपास अधिकारी किशोर खंडार यांच्या देखरेखीखाली गुन्ह्याचा तपास सुरू आहे. सध्या आरोपी अज्ञात असून चोरीचे साऱ्या बाबींचे बारकाईने निरीक्षण केले जात आहे.मोहित राऊत यांच्या मते, दालमिलसाठी २०२३ मध्ये लाखो रुपये कर्ज घेऊन त्यांनी मशीनरी आणि इन्फ्रास्ट्रक्चर तयार केला होता. चोरी झालेल्या वस्तूंची किंमत मोठ्या प्रमाणावर आहे, ज्यामुळे मोठ्या आर्थिक फटका बसल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.पोलीसांनी नागरिकांमध्ये सजग राहण्याचे आवाहन केले असून अशा प्रकारच्या घटनांबाबत त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

# मोबाईलवर बोलण्याचा जीवघेणा शेवट

**सेलू:** मोबाईलवर बोलत असताना अंधारात असलेली विहीर न दिसल्याने आकाश पोहाणे (३२, रा. दुबे ले-आऊट, सेलू) याचा मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना वर्धा–नागपूर महामार्गावरील यादगार साऊथ इंडियन अॅण्ड चायनीज हॉटेलमागे मंगळवारी घडली. रात्रीपासून तो घरी न आल्याने शोध घेतला असता त्याची दुचाकी हॉटेलबाहेर दिसली. सीसीटीव्ही तपासताना तो फोनवर बोलत हॉटेलच्या मागे जाताना आढळून आला. विहिरीत शोध घेतल्यावर त्याचा मृतदेह सापडला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत तपास सुरू केला आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आनंदनगर येथील घरफोडीतील दागिन्यांची चोरी

## -अज्ञात चोरट्यांचा गुप्तप्रवेश

**वर्धा :** अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केली असून, सोन्याचे व चांदीचे किंमती स्वरूपी दागिने व रोख रक्कम चोरी केली आहे. तक्रारदार बच्छलाबाई देवचंद भिसे यांनी सांगितले की, सायंकाळी १८ ऑक्टोबर रोजी त्या कन्हान येथे असून त्याच्या काळात त्यांच्या घराचा आलमारी व लॉकर तोडले गेले व त्यातील सोन्याचे १२ ग्राम वजनाचे दागिने, चांदीचा २५० ग्राम वजनाचा कमरबंद व पायपट्ट्यांचे जोड तसेच ५००० रुपये रोख गायब झाले.पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून, अज्ञात आरोपींचा शोध



सुरू असून, घटनास्थळी पोलीस तपास करत आहे. स्थानिक नागरिकांनी पोलिसांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. हा प्रकार घरफोडी आणि चोरीच्या वाढत्या प्रकरणांशी संबंधित असून, स्थानिक प्रशासनाने सुरक्षा उपाय वाढवण्यावर भर दिला आहे.


महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**सार्वजनिक बांधकाम विभाग,सिव्हील लाईन्स वर्धा**

ई-मेल :- wardha.ee@mahapwd.gov.in

दूरध्वनी क्र.-०७१५२-२९९३०७

**ई-निविदा सुचना क्र.२९/२०२५-२६**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा** हे खालील वर्धा जिल्हयातील कामांकरिता महाराष्ट्र शासनाकडे योग्य त्या वर्गात पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून/सुशिक्षित बेरोजगार अभियंता व वर्धा जिल्हयातील पात्र पंजीकृत मजुर संस्थेकडून **"ब-१"/C Form, Contractor Own Design** निविदा प्रपत्रामध्ये ई-निविदा आमंत्रित करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत (रु.लक्ष ) |
|---|---|---|
| | **Tender for General Contractor** | |
| 1 | Extension and Strengthening To office Building of Publc works subdivision At Hinhanghat, Dist. Wardha | 135.00 (One Crore Thirty Five Lakh only) |
| 2 | Providing Furniture and Water Cooler at Subhagruha, Yatri Niwas, International Library, Visitor Facility Centre, Parking Lot, Anna Sagar Lake, Dham River Area and Eco Forest under Sewagram Development Plan Sewagram Wardha | 178.27 (One Crore Seventy Eight Lakh Twenty Seven Thousand only) |
| | | |
| | **Tender for C Form, Contractor own Desigh** | |
| 1 | Construction Of Major Bridge On Wardha River Between Yavatmal And Wardha District Tah. Hinganghat, Dist. Wardha | 3166.67/- (Thirty One Crore Sixty Six Lakh Sixty Seven Thousand only) |

निविदा प्रपत्राची किंमत व बयाना रक्कम :- निविदेमध्ये प्रकाशित केल्यानुसार.
निविदा प्रपत्राची माहिती व वेळापत्रक :- सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथे सूचना फलकावर आहे. सर्व पात्र/इच्छुक निविदाधारकांनी ई-निविदा प्रत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी अटी, शर्ती व सविस्तर माहिती www.mahapwd.gov.in (१०.०० लक्ष वरील कामे) www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

साबांवि, वर्धा जा.क्र.५८८०/का-३ (३)/निविदा/२०२५
दिनांक :- १५/१०/२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आणखी ३४६ कोटींचा निधी मंजूर

## ■ दिवाळीनंतर मिळणार मदत ■ शेतक-यांच्या नशिबी प्रतीक्षाच

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठवाड्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांसाठी राज्य सरकारने ३४६.३१ कोटी रुपयांच्या मदत निधीला मंजुरी दिली. या निर्णयामुळे सुमारे ३ लाख ५८ हजार शेतक-यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, दिवाळीनंतरच शेतक-यांच्या खात्यात हे पैसे येतील, अशी शक्यता आहे. त्यामुळे शेतक-यांची प्रतीक्षा आणखी लांबणार आहे. राज्य सरकारने अतिवृष्टीग्रस्त, पूरग्रस्तांना मदत देण्यासाठी ३१ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले. परंतु ही मदत टप्प्याटप्प्याने मंजूर केली जात असल्याने शेतक-यांना मदत मिळण्यास विलंब होत आहे.

यंदा जून ते सप्टेंबरदरम्यान झालेल्या पावसामुळे लाखो हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले होते, ज्यासाठी सरकारने हा मदत अध्यादेश जारी केला. छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, परभणी, जालना, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांसाठी हा निधी मंजूर करण्यात आला. सरकारकडून मदत जाहीर झाली असली तरी प्रत्यक्ष पैसे शेतक-यांच्या खात्यात नेमके कधी जमा होणार, याबाबत अजूनही स्पष्टता नसल्याने शेतक-यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.सप्टेंबर महिन्यात राज्यात मुसळधार पाउस झाला. मराठवाड्यात तर अतिवृष्टी झाल्याने पिके पाण्यात बुडाली तर नदीकाठावरील पिके वाहून गेली. तसेच शेतीही खरडून गेल्याने शेतीचेही मोठे नुकसान झाले. एक तर शेतीची मशागत, पेरणी, कोळपणीचा खर्च आणि त्यात खरीप हंगाम हातातून गेल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. शेतीचे अभूतपूर्व नुकसान झाल्याने शेतक-यांना मोठी मदत मिळावी, अशी मागणी होत होती. अखेर राज्य सरकारने ३१ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले. त्यानंतर लगेचच शेतक-यांना मदत मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, काही शेतक-यांना दिवाळीआधी मदत दिली. परंतु बहुतांशी शेतक-यांच्या नशिबी अद्याप प्रतीक्षाच आहे. राज्य सरकार टप्प्याटप्प्याने मदतीची



रक्कम मंजूर करीत आहे. त्यामुळे आता ब-याच शेतक-यांना दिवाळीनंतरच मदत मिळणार आहे. त्यामुळे शेतक-यांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कारण शेतक-यांना दिवाळीत मदत मिळणे अपेक्षित होते. परंतु ही मदत मिळाली नाही. परंतु टप्प्याटप्प्याने निधी मंजूर केला जात असल्याने लवकरच शेतक-यांच्या खात्यात रक्कम जमा होउ शकते.

**राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आंदोलन**

शेतक-यांच्या प्रश्नांवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट आणि भाजप महायुती सरकारमध्ये संघर्ष पेटला आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी सरकारने जाहीर केलेली मदत तुटपुंजी असल्याचा आरोप करत राष्ट्रवादीने राज्यव्यापी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. सरकारने शेतक-यांची दिवाळी काळी केली आहे, असा थेट आरोप राष्ट्रवादीने (शरद पवार गट) केला आहे.

**जरांगे पाटील यांचे आता शेतक-यांसाठी आंदोलन-** राज्य सरकार मदतीची घोषणा करीत आहे. निधीही मंजूर करीत आहे. परंतु दिवाळीत ब-याच शेतक-यांच्या खात्यात नुकसान भरपाई मिळालेली नाही. संकटग्रस्त शेतक-यांना हातभार लावणे सरकारची जबाबदारी आहे. पण शेतक-यांना मदत मिळत नाही. त्यामुळे दिवाळीनंतर अंतरवालीत शेतकरी तज्ज्ञांशी चर्चा करून शेतक-यांसाठी आंदोलनाची तारीख निश्चित करू, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. रस्त्यावर येउन सरकारचे कपडे फाडावेच लागतील, असा इशारा त्यांनी दिला.

**शेतक-यांच्या मदतीबाबत राज्य सरकार अपयशी-** शेतकरी उद्ध्वस्त होत असताना त्याला मदत करण्याची भूमिका जाहीर केली जाते. केंद्रीय गृहमंत्र्यांनीही मोठी मदत दिल्याने सांगितले जाते. डबल इंजिनचे सरकार असताना शेतक-यांना मदत देण्यात हे सरकार अपयशी ठरले आहे, असा सवाल काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला.

## संक्षिप्त

### भुजबळ म्हणजे फुसका फटाका

#### मनोज जरांगेंनी फोडला बॉम्ब



**बीड :** दरवर्षी दिवाळीत चिवड्यासोबत राजकीय फटाकेबाजी होते अशातच मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी सर्वांना दीपावलीच्या मनापासून त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच भुजबळांना कोणत्याच फटाक्याची उपमा चालत नाही ते फुसकी आहेत. छगन भुजबळ हे घुरट आणि ठुसका फटाका आहेत, असा टोला जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांना लगावला. सरकारने जाहीर केलेल्या पॅकेज शेतक-यांचं काहीच होत नाही, फक्त तात्पुरता आनंद द्यायचा. तात्पुरता आनंद म्हणजे त्याचा अर्थ फसवणूक असा होतो. याला खच्चीकरण करण्याचं काम म्हणतात, त्यामुळे हे सरकार तात्पुरता आनंद सत्तेमध्ये आल्यापासून देत असल्याचाही जरंगे पाटील यांनी म्हटलं.फक्त आश्वासन देउन शेतक-यांचे पोट भरणार नाही, त्याला प्रत्यक्ष मदत पाहिजे. असेही जरांगे म्हणाले. दीपावली आणि पाडव्याचे दोन-तीन दिवस जाउ द्या त्यानंतर शेतकरी तज्ज्ञ अभ्यासक यांना आम्ही फोन करणार आहोत. शेतक-यांसाठी कशा स्वरूपाने पुढे जायचं यासाठी कर्जमुक्तीसाठी नुकसान भरपाई पैसे या सगळ्या गोष्टींच्या संदर्भात काय करायचं. त्यासाठी सगळ्या पक्षात असलेले सुद्धा आम्ही बोलवणार आहोत. सध्या शेतक-यांचा संसार उध्वस्त झाल्याने वाईट दिवाळी आलेली आहे, त्यामुळे कशीतरी आता करावी लागणार आहे.

### माजी आमदार राजीव देशमुख यांचे निधन



**चाळीसगाव :** चाळीसगाव विधानसभेचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष राजीव देशमुख यांचे आज हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे चाळीसगाव आणि जळगाव जिल्ह्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. राजीव देशमुख यांनी २००९ ते २०१४ या कालावधीत चाळीसगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले होते. आमदारकीच्या काळात त्यांनी चाळीसगाव आणि परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले. त्याआधी चाळीसगाव नगर परिषदेचे नगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले होते. ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) प्रदेश नेतृत्वात उपाध्यक्षपदावर कार्यरत होते. २०१४ आणि २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांचा पराभव झाला होता. मात्र, कार्यकर्त्यांमध्ये त्यांचा प्रभाव कायम होता. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत, विशेषतः लोकनियुक्त नगराध्यक्षपदासाठी, महाविकास आघाडीकडून राजू देशमुख यांच्या नावाची चर्चा सुरू होती. पक्षात त्यांचा अनुभव, जनसंपर्क आणि प्रशासकीय जाण लक्षात घेता, त्यांना जबाबदारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती.

### भीषण अपघातात ४ भाविक ठार

**उमरगा :** देवदर्शन करून कारने आपल्या गावी बिदरकडे परत निघालेल्या चौघांवर काळाने घाला घातला. दाट धुक्यामुळे दुस-या बाजूने भरधाव येणा-या कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि ही कार गावी जाणा-या भाविकांच्या कारला धडकली. मंगळवारी सकाळी साडेसातच्या सुमारास सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर दाळिंब (ता. उमरगा) शिवारात ही दुर्घटना घडली. या अपघातात बिदर जिल्ह्यातील चौघे जागीच ठार झाले तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, कोल्हापूर जिल्ह्यात तिघे तर जालना जिल्ह्यात एका महिलेचा मृत्यू झाला. ऐन दिवाळीत ३ अपघातांत ८ जणांना जीव गमवावा लागला. कर्नाटकमधील बिदर जिल्ह्यातील भाविक सोमवारी (केएल ३८ एम ९९४६) या कारने सोलापूर जिल्ह्यातील हुलजंती (ता. मंगळवेढा) येथील महालिंगराया देवस्थानच्या दर्शनासाठी गेले होते. देवदर्शन करून गावाकडे परत जात असताना मंगळवार, दि. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी सोलापूर-हैदराबाद महामार्गावर दाळिंब ते शिवाजीनगर तांडा दरम्यान सोलापूरच्या दिशेने भरधाव जाणा-या टाटा सफारीच्या (एमएच १४ ईपी ०७३२) चालकाचा कारवरील ताबा सुटला. भरधाव कार महामार्गावरील दुभाजकाला धडकून हवेत उडाली आणि दुभाजकाच्या दुस-या बाजूने समोरून येणा-या भाविकांच्या कारवर आदळली. त्यामुळे भाविकांची कार खड्डयात फेकली गेली. या भीषण दुर्घटनेत रतिकांत मारुती बसगौडा (३०), शिवकुमार चितानंद वग्गे (२६), संतोष बजरंग बसगौडा (२०), सदानंद मारुती बसगौडा (१९, चौघेही रा. खाशमपूर (पी), ता. जि. बिदर) या भाविकांचा मृत्यू झाला तर कारचालक दिगंबर जगन्नाथ संगोळगी (३१, रा. खाशमपूर), सफारी चालक लावण्य हणमंत मसुती (२२, रा. सोलापूर) दोघे गंभीर जखमी झाले.


### टेम्पोची दुचाकीला धडक, बहीण-भावासह तिघे ठार

**कोल्हापूर :** चुकीच्या दिशेने आलेल्या टेम्पोने दुचाकीस्वारास दिलेल्या धडकेत तिघे ठार झाले. कोल्हापूर-राधानगरी रोडवर कौलव येथे आज, मंगळवार सकाळच्या सुमारास हा अपघात झाला. ऐन दिवाळीतच अपघातात तिघे ठार झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. श्रीकांत बाबासो कांबळे (तरसबळे, ता राधानगरी), दिपाली गुरुनाथ कांबळे (शेडुर ता. कागल) अशी मृत दोघांची नावे आहेत. तर अथर्व गुरुनाथ कांबळे (शेंडूर कागल), कौशिकी सचिन कांबळे हे गंभीर जखमी झाले.

### शिंदे गट-भाजपमध्ये धुसफूस

#### माजी नगरसेवक फोडल्याने शिंदे गटाची नाराजी

**मुंबई :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील घटक पक्षांमधील विशेषतः शिवसेना आणि भाजप यांच्यातील मतभेद पुन्हा एकदा उघड झाले आहेत. अनेक ठिकाणी भाजपा नेत्यांकडून डिवचण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यामुळे शिवसेनेतही स्वबळाचे नारे जोर धरू लागले आहेत. विशेषतः ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक आणि नवी मुंबईसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी जागावाटपावरून आणि स्थानिक नेतृत्वाच्या मुद्यावरून वाद वाढला आहे. दुसरीकडे अजित पवारांची राष्ट्रवादी आणि शिंदे सेनेतही टोकाचे मतभेद आहेत.दरम्यान, भाजपकडून युतीधर्म पाळला जात नसल्याचा आणि शिवसेनेची ताकद कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप शिवसेनेचे स्थानिक नेते करत आहेत. या वाढत्या संघर्षामुळे आगामी पालिका निवडणुकांमध्ये महायुती म्हणून एकत्र लढण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, काही शिवसेनेचे माजी नगरसेवक भाजपमध्ये दाखल झाले आहेत. त्यावरूनही शिंदे गट आणि भाजपमध्ये नाराजी वाढली आहे. यावर खा. नरेश मस्के यांनी महायुती विरोधकांना संपविण्याकरिता झाली आहे. परंतु आता महायुतीमधील पक्ष मित्रपक्षांचेच माजी नगरसेवक फोडण्याच्या मागे लागले आहेत. भाजप मोठा भाउ आहे. परंतु तेच आमचे पदाधिकारी फोडत आहेत. हा महायुतीत मिठाचा खडा टाकण्याचा प्रकार आहे, अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली.एकमेकांचे नगरसेवक फोडण्याची प्रथा चुकीची आहे. एकमेकांसोबत लढायचे तर लढूया, जरी आपण स्वबळावर लढलो तरी आपल्या मित्र पक्षावर टीका करायची नाही, परंतु एकमेकांचे माणसे फोडणे हे चुकीचे आहे, असे शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के म्हणाले.



### दोन कारचा भीषण अपघात; ४ ठार

**धाराशिव :** ऐन दिवाळीत आक्रित घडले अन् उत्सवावर शोककळा पसरली आहे. धाराशिवमध्ये दोन महागड्या आलिशान कारची जोरदार धडक झाली. या भीषण अपघातामध्ये चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोन जण जखमी आहेत. जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार, कार वेगात होती त्याचवेळी अचानक रस्त्यावर कुत्रा आल्याने हा अपघात झाल्याचे समोर आले आहे. सोलापूर-हैदराबाद महामार्गावर हा अपघात झाला. दोन वाहनांच्या भीषण अपघातानंतर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती. उमरगा तालुक्यातील डाळिंबजवळ सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर सफारी आणि ग्रँड वितारा या दोन महागड्या गाड्यांची जोरदार धडक झाली. या अपघातात चौघांचा जागेवरच मृत्यू झाला. तर दोन जण जखमी झाले, त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

# लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मविआचे धरणे

## सरकारने शेतक-यांसाठी केली काळी दिवाळी म्हणत सरकारचा निषेध

**वर्धा /प्रतिनिधी-** राज्य सरकारकडून शेतक-यांप्रती चांगला निर्णय घेण्यात येत नाही. सरकारला वर्ष झाले असताना देखील अद्याप कर्जमाफी देण्यात आलेली नाही. यामुळे शेतक-यांच्या न्याय्य मागण्यांसाठी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी महाविकास आघाडीने आंदोलनाचे हत्यार उपसले असून यावेळी राज्य सरकारचा निषेध करण्यात आला.




वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खासदार अमर काळे यांच्या नेतृत्वात आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आंदोलनाला माजी मंत्री रणजित कांबळे यांच्यासह जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. भाजपा सरकारने ही दिवाळी शेतक-यांसाठी काळी दिवाळी केली असे म्हणत आंदोलन करण्यात येत असून धरणे आंदोलन करत सरकारचा निषेध करण्यात आला.शेतक-यांची संपूर्ण कर्जमाफी, ओल्या दुष्काळाच्या पॅकेजमध्ये वाढ, वनप्राण्यांमुळे होणा-या शेती पिकांच्या नुकसानीच्या मदतीत वाढ करणे, शेतक-यांना सोलर पंपाची सक्ती न करता विद्युत कनेक्शन देण्यात यावे, शासकीय कंत्राटदारांचे थकित देयक तातडीने देण्यात यावे या मागणीसाठी आंदोलन करण्यात येत आहे. सरकारने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आंदोलनाची वेळ आणली आहे. राज्यातल्या भाजपा सरकारला एक वर्ष पूर्ण झाले आहे. मात्र अजूनपर्यंत शेतक-यांच्या कर्जमाफीचा मुहूर्त सापडला नाही. शेतीमालाला कवडीमोल भाव मिळत आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पैसे नाहीत, विहिरीचे पैसे नाहीत. यामुळे हा नागरिकांचा सरकारविरोधात असंतोष आहे. पुढे मोर्चे आणि रास्ता रोको आंदोलन करणार. नाही तर मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही; असा इशारा खासदार अमर काळे यांनी दिला आहे. राज्य सरकारने कर्जमाफीची घोषणा केली, मात्र अद्याप मिळाली नाही. अतिवृष्टी नुकसानग्रस्तांना मदतीची घोषणा केली. मात्र शेतक-यांच्या खात्यात पैसे जमा झाले नाहीत. तर जिल्ह्यातील ५४ मंडळांपैकी पहिल्या ३५ मंडळांसाठी १४२ कोटींचा निधी आला. आता जिल्हाधिकारी सांगतात की, उर्वरित मंडळांचा प्रस्ताव पाठवला आहे. एकप्रकारे सरकार शेतक-यांची दिशाभूल करत आहे. यामुळे दिवाळीच्या दिवशी आंदोलनाची वेळ आल्याचे माजी मंत्री रणजित कांबळे यांनी म्हटले आहे.

# कोलकाताहून श्रीनगरला जाणा-या इंडिगो विमानातून इंधन गळती

## वाराणसीला इमर्जन्सी लँडिंग, १६६ प्रवासी सुखरूप


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** कोलकाता ते श्रीनगर जाणा-या इंडिगो एअरलाईन्सच्या विमान क्रमांक ६क६९६१ चं वाराणसी विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. हवेत असताना विमानात इंधनाची गळती झाल्याचं समजताच क्रू मेंबर्सनी त्वरित परिस्थितीचं गांभीर्य ओळखून एअर ट्रॅफिक कंट्रोल (ATC) शी संपर्क साधला. ज्यानंतर विमान वाराणसीला उतरवण्यात आलं. या विमानात एकूण १६६ प्रवासी आणि कर्मचारी होते. सुदैवाने सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स सुखरूप असून, त्यांना विमानातून उतरवून विमानतळावरील आगमन विभागात नेण्यात आलं. ANI ने हे वृत्त दिलं आहे.



विमानात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे ही घटना घडली असून, वाराणसी विमानतळ प्रशासन आणि स्थानिक पोलीसांकडून या घटनेची सखोल चौकशी सुरू आहे. विमानाच्या इंधन प्रणालीत नेमक्या कोणत्या तांत्रिक अडचणी आल्या, याचा शोध घेतला जातो आहे. पोलिसांनी स्पष्ट केलं आहे की परिस्थिती नियंत्रणात आहे आणि विमानतळावरील नियमित कामकाज पुन्हा सुरू करण्यात आलं आहे. इंडिगो एअरलाईन्सकडून जाहीर करण्यात आलं आहे की, प्रवाशांना श्रीनगरला पोहोचवण्यासाठी दुस-या विमानाची व्यवस्था केली जात आहे. सध्या सर्व प्रवासी सुरक्षित असून, त्यांना वेटिंग रुममध्ये ठेवण्यात आलं आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विमान अद्याप ग्राउंडवर असून, तांत्रिक पथक त्याच्या इंधन गळतीचा तपास करत आहे. प्रवाशांना पुढील फ्लाइटमध्ये पाठवण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे. अशा घटना जरी अपवादात्मक असल्या, तरी विमान वाहतुकीतील सुरक्षा आणि दक्षता किती महत्त्वाची आहे, हे पुन्हा अधोरेखित होते. इंडिगोच्या क्रू मेंबर्सनी वेळेवर योग्य निर्णय घेउन १६६ जीव वाचवले.

# भारताला अद्याप आशियाई चषकाची प्रतीक्षाच

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताने आशिया कपच्या फायनलमध्ये पाकिस्तानला पराभूत करत स्पर्धेचे विजेतेपद मिळवले होते. मात्र, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वातील टीम इंडियाने पीसीबी अध्यक्ष आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष मोहसीन नक्वीच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला होता. यानंतर मोहसीन नक्वी ट्रॉफी घेउन दुबईच्या हॉटेलमध्ये गेले. त्यानंतर पाकिस्तानला जाण्यापूर्वी नक्वी यांनी ती ट्रॉफी आशियाई क्रिकेट परिषदेच्या कार्यालयात ठेवली. ते अजूनही भारताला ट्रॉफी सोपविण्यास तयार नाहीत. त्यामुळे बीसीसीआय आता आयसीसीकडे तक्रार करणार आहे.बीसीसीआयने एसीसी अध्यक्ष मोहसीन नक्वी यांना एक अधिकृत ई-मेल पाठवून विजेत्या संघाला ट्रॉफी लवकरात लवकर सोपवावी, असे म्हटले. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी ही माहिती दिली. आम्ही एसीसीला पत्र लिहिले असून, ट्रॉफी विजेत्या संघाला दिली जावी, असे म्हटले. याबाबत त्यांनी प्रतिसाद दिला नाही किंवा नकारात्मक उत्तर आल्यास आयसीसीला पत्र लिहिणार असल्याचे म्हटले. आम्ही एक एक पाउल पुढे जातोय, असेही त्यांनी सांगितले. जर मोहसीन नक्वी ट्रॉफी देण्यास तयार झाले नाहीत तर बीसीसीआय कठोर कारवाई करेल. जर आशिया कपची ट्रॉफी भारताला मिळाली नाही तर बीसीसीआय आयसीसीला पत्र लिहिणार असल्याचेही देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केले. आता बीसीसीआय हा मुद्दा आयसीसीच्या बैठकीत मांडणार आहे. आशिया चषकाच्या ट्रॉफीच्या प्रकरणात भारताला श्रीलंका आणि अफगाणिस्तानचा पाठिंबा मिळाला.सूर्यकुमार यादवच्या नेतृत्त्वातील टीम इंडियाने आशिया कपच्या फायनलमध्ये पाकिस्तानला ५ विकेटने पराभूत केले होते. त्यावेळी भारतीय खेळाडूंनी मोहसीन नक्वी यांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारणार नाही, असे





स्पष्ट केले होते. त्यावर भारताने एमिरेटस क्रिकेट बोर्डाच्या उपाध्यक्षांनी ट्रॉफी द्यावी, अशी मागणी केली होती. त्यावेळी मोहसीन नक्वी यांनी भारताची ही अट मान्य करण्यास नकार दिला. मॅच जिंकल्यानंतर भारतीय खेळाडू जवळपास एक तास मैदानावर वाट पाहत राहिले. मात्र, तिढा सुटला नाही. मोहसीन नक्वी आशिया कपची ट्रॉफी घेउन निघून गेले. त्यावेळी भारतीय संघाने प्रतिकात्मक जल्लोष केला. आशिया कपमध्ये भारताने पाकिस्तानला तीन वेळा पराभूत केले होते.

**गेल्या आठवड्यात एसीसीला दिले पत्र-** आशियाई क्रिकेट परिषदेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बीसीसआयचे सचिव, बीसीसीआयचे एसीसी प्रतिनिधी राजीव शुक्ला आणि श्रीलंका क्रिकेट आणि अफगाणिस्तानसह इतर सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी गेल्या आठवड्यात आशियाई क्रिकेट परिषदेला भारताला ट्रॉफी द्यावी, असे पत्र दिले होते. मात्र, मोहसीन नक्वी यांचा भारताबाबत हेकेखोरपणा कायम आहे. त्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

**नक्वीचा नवा प्रस्ताव-** आशियाई क्रिकेट कौन्सिलच्या एका सूत्राच्या माहितीनुसार मोहसीन नक्वी यांनी बीसीसीआयच्या कोणत्याही प्रतिनिधीने दुबईच्या एसीसीच्या मुख्यालयात येउन ट्रॉफी घेउन जावे, असे म्हटले. मात्र, बीसीसीआयने तो प्रस्ताव नाकारला. बीसीसीआय हा मुद्दा आयसीसीकडे नेणार असून, लवकरच यासंबंधी तक्रार केली जाणार आहे.

# ऑपरेशन सिंदूर २.० ची तयारी सुरू:लष्करप्रमुख

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ऑपरेशन सिंदूर १.० ही लष्करी कारवाई तात्पुरती थांबली असली, तरी ती थांबलेली नाही. ऑपरेशनचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत कारवाई सुरूच राहील आणि भारतीय लष्कर संभाव्य ऑपरेशन सिंदूर २.० साठी सक्रिय तयारी करत आहे, अशी माहिती लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी दिली. दिवाळीच्या भेटीदरम्यान सीमावर्ती जिल्हा पिठोरगढ येथे जवानांशी बोलताना जनरल द्विवेदी यांनी युद्धभूमीपलीकडे लष्कराची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. लष्कर नेहमीच राष्ट्र उभारणीत आघाडीवर आहे, असे ते म्हणाले. भारतीय लष्कराने राष्ट्र उभारणीमध्ये पुढाकार घ्यावा. आपण राष्ट्र उभारणीचा पहिला आधारस्तंभ बनले पाहिजे आणि जनतेसोबत मिळून काम केले पाहिजे, असे मत जनरल द्विवेदी यांनी व्यक्त केले. नुकत्याच झालेल्या उत्तराखंडमधील धरली आणि थराली तसेच अमरनाथ बचाव मोहिमांमध्ये लष्कराने केलेल्या प्रभावी बचाव कार्याचा उल्लेख त्यांनी केला. प्रत्येक जवानाने इतरांना आदर्श वाटावा, असा नेता बनण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.



# भीषण अपघातात ६३ जणांचा जागीच मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** युगांडामध्ये भीषण अपघात झाला आहे. बस आणि इतर वाहनांची धडक होउन तब्बल ६३ जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. युगांडाची राजधानी कंपालाच्या उत्तरेला असलेल्या गुलू शहराला जोडणा-या कंपाला-गुलू महामार्गावर बुधवारी सकाळी हा अपघात झाला, ज्यामध्ये एका बससह अनेक लहान आणि मोठी वाहनं एकमेकांवर आदळली.स्थानिक पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या धडकेत मोठ्या प्रमाणात जीवितहानी आणि मालमत्तेचं नुकसान झालं आहे. युगांडा पोलिसांनी या अपघाताचा तपास सुरू केला आहे. सुरुवातीच्या तपासानंतर स्थानिक पोलिसांनी या अपघातात दोन बस आणि इतर चार वाहनांचा समावेश असल्याचं सांगितलं.



बस चालकाने कंपाला-गुलू महामार्गावर एका लॉरीला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला, परंतु विरुद्ध दिशेने येणा-या वाहनाशी धडक झाली.अचानक झालेल्या या धडकेनंतर मागून येणारी अनेक वाहनं एकमेकांवर आदळली, ज्यामुळे महामार्गावर गोंधळ उडाला. कंपाला पोलिसांनी सांगितलं की, अपघातानंतर बचाव आणि मदत पथकं तैनात करण्यात आली आहेत. जखमी आणि अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकं सक्रियपणे काम करत आहेत. मृतांची ओळख पटवण्याची प्रक्रिया सुरू आहे. जखमींवर पश्चिम युगांडाच्या किरियानडोंगे शहरातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या भयानक आणि दुःखद अपघातानंतर कंपाला-गुलू महामार्ग तात्पुरता बंद करण्यात आला आहे. ६३ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर अनेक जण गंभीर जखमी आहेत.

# ‘महाज्योती’च्या नवीन इमारतीचे भूमिपूजन वेदोक्त मंत्रोपचाराने

**नागपूर/प्रतिनिधी :** क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारकार्याचा वसा चालवण्यासाठी, त्यांच्या विचारातला सुशिक्षित समाज निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्तजाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकासासाठी संस्था स्थापन केल्याची माहिती महाज्योतीच्या संकेतस्थळावर आहे.

महाज्योतीच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा नुकताच झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आले. मात्र, भूमिपूजन सोहळ्यातून याच विचारांना फाटा देण्यात आल्याचा आरोप होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी थेट या प्रकरणावरून महायुती सरकारला घरचा आहेर दिला आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालेल्या कार्यक्रमावर मिटकरींनी टीका केल्याने या प्रकणाला नवीन वळण आले आहे. महात्मा जोतिबा फुले यांनी संपूर्ण आयुष्य धार्मिक रूढी, परंपरा आणि कर्मकांडाच्या विरोधात लढा दिला. त्याचा विरोध म्हणून सत्यशोधक विवाह पद्धतीही सुरू केली. मात्र, त्यांच्याच नावाने असलेल्या महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (महाज्योती) नवीन इमारतीचे भूमिपूजन वेदोक्त मंत्रोपचार पद्धतीने करण्यात आले. सामाजिक व ओबीसी संघटनांनी या कृतीचा निषेध केला आहे. सदर परिसरामध्ये महाज्योतीची नवीन इमारत तयार होणार असून रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. या दरम्यान रितसर पुजारी बोलावून मंत्रोपचार पद्धतीने भूमिपूजन करण्यात आले. यासंदर्भातील छायाचित्र आणि माहिती समोर येताच सामाजिक संघटनांकडून विरोध सुरू झाला. ओबीसी युवा अधिकार मंचचे मुख्य संयोजक उमेश कोरांम यांनी या प्रकारचा तीव्र निषेध केला.महात्मा फुले यांनी कायम कर्मकांडाचा विरोध केला व सार्वजनिक सत्यधर्माच्या माध्यमातून बहुजन समाजाने यापासून दूर जावे, असा संदेश दिला. असे असतानाही फुल्यांच्या विचारावर चालणारी संस्थाच कर्मकांडाला पाठबळ देत असले तर हे संयुक्तिक नाही. यातून येणा-या पिढीला आम्ही कुठला संदेश देतो, याचा प्रशासनाने विचार करावा. या घटनेचा आम्ही तीव्र निषेध करतो, असेही कोरांम म्हणाले.‘नकोच मध्यस्थी देव आणि भक्तांमध्ये’ असे सांगणा-या महात्मा फुले यांच्या नावाने असणा-या संस्थेच्या भूमिपूजन कार्यक्रमात मंत्रोपचार करणे म्हणजे फुल्यांनी आयुष्यभर केलेले प्रबोधन आणि त्यांचा इतिहास मिटवण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला.






मोल मिटकरींचा महायुतीला घरचा आहेर; मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजन केलेल्या कार्यक्रमावर सडकून टीका, महात्मा फुलेंची मरणोत्तर विटंबना!

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# संपादकीय

प्रबंध संपादकः प्रदीप देशपांडे

## गाझा पट्टी अशांत

गेल्या दोन दिवसांपासून गाझा पट्टी येथील इस्त्रायली सैनिकांनी तीव्र हल्ले तर केले असून युद्धविराम झाल्यानंतर जे शांततेचे वातावरण निर्माण झाले होते ते आता पार उद्ध्वस्त झाले आहे. युद्धविरामापूर्वी जवळपास गाझावासीयांना ६०० दिवस बॉम्बहल्ल्यांचा सामना करावा लागला होता. गाझामधील ४६,००० अधिक लोक मारले गेले आहे. त्या हिंसाचाराची पुन्हा आठवण ताजी व्हावी अशीच परिस्थिती सध्या गाझा पट्टीत आणि तेथील रफा परिसरात आहे. मारलेल्या लोकांपैकी १८,००० मुले आहेत. यावरून गाझामधील परिस्थिती किती भीषण आहे हे लक्षात यावे. अर्थात यास दोन्ही बाजू दोषी आहेत हे विसरून चालणार नाही. कारण एकीकडे हमास युद्धबंदी स्वीकारते पण तिचे पालन करत नाही आणि दुसरीकडे इस्त्रायली सैन्य तर याचीच वाट पाहत असते, की कधी युद्धंबंदी मोडता येईल. यात मानवतेचा मात्र मुडदा पडतो. गाझामध्ये शांतता करार अमलात आणायचा असेल तर तो पूर्णपणे आणि खऱ्या अर्थाने अमलात आला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. आताची युद्धबंदी ही तात्पुरती आणि वरवरची होती. त्यातून खऱ्या अर्थाने शांतता प्रस्खापित झाली नाही. कायमची शांतता प्रस्थापित झाली तरच युद्धबंदीला काही अर्थ राहील. पण तसे होत नाही हे तर दुःख आहे. याला इस्त्रायल जितके दोषी आहे तितकेच हमासही आहे.पॅलेस्टाईनचा गाझा भूमीवरील कब्जा हा अवैध असल्याने हा संघर्ष संपू शकत नाही असा पॅलेस्टाईनच्या पक्षपाती लोकांचा दावा असतो. पण ते हमासच्या अतिरेकी कारवायांकडे हेतूतः दुर्लक्ष करतात. हमास आणि इस्त्रायलने एकमेकांवर कराराचा भंग केल्याचा आरोप केला आहे, तर आपल्याला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळावे म्हणून जो अट्टहास केला त्या ट्रम्प यांनी अजूनही गाझामध्ये युद्धबंदी कायम आहे असे म्हटले आहे. पण असे म्हणणे म्हणजे आत्मवंचना ठरेल. इस्त्रायली सैनिकांनी केलेल्या गोळीबारात ४ लोक ठार झाल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या युद्धबंदी करारानंतर हा या भागातील संघर्षाचा सर्वात वाईट दिवस आहे असे जे म्हटले गेले ते अगदी रास्त आहे. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी इजिप्तमधील शर्म एल शेखमध्ये जागतिक नेत्यांसमोर बोलताना मध्यपूर्वेतील शांतता प्रस्थापित केली आहे असा दावा केला होता. पण त्या दव्याची शाई वाळतही नाही तोच इस्त्रायल आणि हमास यांच्यातील रक्तरंजित संघर्षात प्राणहानी झाल्याने युद्धबंदी मोडीत निघाल्याची बातमी ट्रम्प यांची विश्वासार्हता संपल्याची जाणीव करून देते. इस्त्रायली युद्धविमाने पुन्हा सक्रिय झाली आहेत आणि भविष्यात पुढे आणखी काय वाढून ठेवले आहे याची प्रचिती येते. हमासने अद्याप शस्त्रे हाती घेतलेली नाहीत तरीही अमेरिकेने युद्धबंदी कायम राहण्यासाठी या प्रांतात पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. कारण अमेरिका जेव्हा दुसऱ्या महायुद्धात उतरली तेव्हाच युद्धाचा निकाल लागला होता.त्यामुळे आता ट्रम्प यांना केवळ युद्धबंदी कायम आहे असे म्हणून आपली जबाबदारी झटकता येणार नाही, युद्धबंदीचे उल्लंघन कुणी केले हा वादाचा प्रश्न आहे. कारण इस्त्रायली सैन्याने हमासने अगोदर युद्धबंदीचा भंग केल्याचा आरोप केला तर इस्त्रायली सैन्याने केवळ हमासच्या हल्ल्यांना उत्तर दिले असे म्हटले आहे. त्यामुळे या वादात न जाता आता शक्तिशाली लोकांनी यातून मार्ग काढावा आणि लोकांना शांततेच्या मार्गाने जाण्यास मदत करावी असाच सर्वसामान्य लोकांचा आग्रह आहे. हमास आणि इस्त्रायली सैनिक यातील कोण खोटे बोलत आहे हे सांगणे अवघड आहे. युद्धबंदीचे उल्लंघन झाले हे उघड आहे आणि ते कुणाच्या आगळीकीने झाले हे या क्षणी बाजूला ठेवले तरीही गाझामध्ये आजची वेळ अत्यंत चिंताजनक आहे हे निश्चित आहे. हमासने इस्त्रायलवर युद्धबंदी भंग केल्याचा आरोप करणे आणि इस्त्रायलने तसाच आरोप करणे यातून काहीही प्रश्न सुटणार नाही. गाझामधील निरपराध लोक मात्र मारले जात राहतील आणि त्यांना न्याय देणारा कुणी नसेल. कोणताही धर्म यात माघार घेण्यास तयार नाही. गप्पा मात्र सारे मानवतेच्या मारतात. पण मानवतेचा सर्वात जास्त मुडदा याच भूमीवर पडला आहे. हा इतिहास आहे.त्यामुळे इस्त्रायल आणि पॅलेस्टिनी यांच्यातील या युद्धबंदीला अगोदरच ताण बसला होता. जराही हिंसक घटनेनंतर ती युद्धबंदी कोसळली आणि तीच आज शक्यता दिसत आहे. आता तर इस्त्रायलने गाझामध्ये मदत पाठवणे बंद केले आहे. दोन वर्षांच्या विनाशकारी संघर्षानंतर ट्रम्प यांच्या मध्यस्थीने शांतता प्रस्थापित झाली आणि हिंसाचार आटोक्यात आला होता, पण आता पुन्हा ते दिवस आता परतले आहेत. या पूर्वीही हमास आणि इस्त्रयायल यांच्यात युद्धबंदी लागू झाली होती. पण ती अनेकदा तुटली तसेच यंदाही झाले. कारण अत्यंत घाईघाईने प्रश्नाचा साकल्याने विचार न करता ती अमलात आणली गेली, त्यामुळे युद्धबंदी तुटणारच होती. तसेच झाले आहे. युद्धविराम पार पाडण्यासाठी ट्रम्प यांच्याकडे दृढनिश्चय आहे का हा मूळ प्रश्न आहे. वाटाघाटी गंभीरपणे करण्याची अमेरिकेची म्हणजे ट्रम्प यांची खरोखर इच्छा आहे का हाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे. युद्धबंदी यशस्वी होत नाही किंवा झाली नाही याला कारण आहे कारण ट्रम्प यांचे सर्व काही आपल्यालाच माहीत आहे असे वाटणारे धोरण. त्यांच्या दिखाऊपणाचे परिणाम दोन्ही बाजूंना भोगावे लागत आहेत हे वास्तव आहे.इस्त्रायली नेतृत्व आणि हमासचे नेते यांच्याकडे वचनबद्धता असली तरीही त्यांच्याकडे असे काही स्पॉयलर गट आहेत की जे दृष्टिपथात असलेली शांतता प्रत्यक्षात येऊ देत नाहीत. आता ट्रम्प यांनी शांतता करार अमलात आणल्याबद्दल स्वतःची पाठ थोपटून घेतली असली तरीही मध्य पूर्वेत किंवा पश्चिम आशियात ट्रम्प यांचा प्रभाव पूर्वीसारखा राहिला नाही हेच वास्तविक कारण आहे. त्यामुळे शांतता करार होतील आणि ते काही काळ चालून मोडले जातील. सध्या गाझाची जनता मात्र वाऱ्यावर आहे आणि तिला वालीही कुणी उरलेला नाही हे सत्य आहे.सध्या गाझाची जनता मात्र वाऱ्यावर आहे आणि तिला वालीही कुणी उरलेला नाही हे सत्य आहे.



# माओवादाची अखेर

सुमारे साठ वर्षांपासून देशात ल्या घनदाट जंगलात पसरलेला हिंसक माओवादी उद्रेक आता शेवटच्या घटका मोजतो आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी गडचिरोलीत मल्लाजुल्ला वेणुगोपाल उर्फ भूपती याने केलेलं आत्मसमर्पण ही या शेवटाची सुरुवात मानली जाते. १९६७ मध्ये पश्चिम बंगाल मधून सुरू झालेल्या या रक्त रंजित वादळाने गेली ६० वर्ष देशातली घनदाट जंगलं आपल्या हिंसक कारवायांनी जागती ठेवली होती. लोकशाही व्यवस्थेत वंचितांना, विस्थापितांना, आदिवासींना न्याय मिळणं कधीच शक्य नाही; त्यासाठी मोठा उठाव व्हावा लागतो आणि सशस्त्र क्रांतीशिवाय त्याला पर्याय नाही, या श्रद्धेने गेली साठ वर्षं अनेक उच्चशिक्षित या चळवळीत सामील झाले.

आपल्या आयुष्याची राखरांगोळी करून त्यांनी जंगलातील आदिवासींना याच विचार पथावर आणण्याचा प्रयत्न केला. बहुतेक ठिकाणी धाकदपटशाहीनेच. पश्चिम बंगालमधून सुरू झालेल्या या हिंसक चळवळीने नंतर आंध्र प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमा रेषांवर असलेल्या निबिड अरण्याला आपले केंद्र बनवले. अनेक निर पराध आदिवासींची 'खबऱ्या' असल्याच्या संशयावरून त्यांनी हत्या केली. पोलीस, सुरक्षा दलांविरोधात तर उघड युद्ध पुकारले. या संघर्षात किती जणांचे जीव गेले, त्याची गणती नाही. सुरुवातीला या चळव ळीला करुणेची बैठक होती. वैचारिक मांडणीचा आधार होता. पण, नंतर हिंसा आणि त्यातून निर्माण होणारी दहशत एवढ्यापुरतंच तिचं अस्तित्व उरले. देशाच्या अर्थव्यवस्थेने अनेक वळणे घेतली. केंद्रात आणि राज्यात अनेक सरकार बदलली.

या प्रत्येक सरकारचे विकासाचे कार्यक्रम, प्राधान्यक्रम होते. वंचितांसाठीच्या योजना होत्या. पण, नक्षलवादी चळवळीने या विकासाला विरोध केला. असा विकास आदिवासी, वंचित समूहांतील उद्रेकाची शक्तीच मारून टाकतो, बंडखोरीची ठिणगी विझवणारा विकास नकोच, या नकारात्मक भावनेने त्यांनी लोकशाही प्रक्रियेतून होणाऱ्या विकासालाच शत्रू मानले. नक्षलवादी चळवळीचे वैचारिक भरकटणे यातूनच सुरू झाले. गेली काही वर्ष तर त्यांची धडपड स्वतःच्या अस्तित्वासाठीच सुरू होती. ज्या वंचित जनसमूहांसाठी त्यांनी वर्चस्वाचा त्याग केला, त्या जनसमूहांपासून त्यांची नाळ तुटली होती. ते जनसमूह नक्षलवाद्यांशी संघर्ष करत मूळ प्रवाहात सामील होत होते. गेल्या दोन-तीन दिवसांत महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये झालेल्या दोन - तीनशे नक्षल वाद्यांच्या आत्मसमर्पणामागे ही अपरिहार्यता आहे.

भूपतीवर सहा कोटी रुपयांचे बक्षीस होते. त्याचा मोठा भाऊ कोटेश्वरुलू उर्फ किशनजी २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये झालेल्या चकमकीत मारला गेला. त्याच्या मृत्यूनंतर देशातील नक्षलवादी चळवळीचा संयोजक, रणनीतीकार, वैचारिक आधार म्हणून भूपती कडेच पाहिले जात होते. तेलंग णातल्या करीमनगर जिल्ह्यात पेद्दापल्ली परिसरात त्याचं वास्तव्य होते. त्याची पत्नी तारक्काने गेल्या वर्षीच आत्मसमर्पण केले. किशन भाईच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी सुजातानेही अलीकडेच आत्म समर्पण केले. आत्म समर्पण करून मुख्य प्रवाहात सामील होण्यापूर्वी भूपतीने चळवळीची संघटना त्मक दुःस्थिती, वैचारिक अडचण आणि समाजमनातून कमी होत चाललेला पाठिंबा या तीनही बाबींचा सविस्तर ऊहापोह करून संपूर्ण नक्षलवादी चळवळीच्या समारोपाचा विषय मांडला होता. काल छत्तीसगड मध्ये ज्या २०० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं, ते या भूपतीच्या आव्हानाचाच परिणाम मानला जातो. नक्षलवाद्यांचे प्रत्येक प्रदेशात म्होरके आहेत.

अशा म्होरक्यांपैकी दहा मुख्य सूत्रधारांचे गेल्या तीन दिवसांत आत्मसमर्पण झाले, ही साधी गोष्ट नाही. माओवादी पक्षाच्या केंद्रीय समितीचा सदस्य रुपेश याचाही यात समावेश आहे. मुख्य सूत्रधारांपैकी मांडवी हेडमा आणि तिरुपती उर्फ देवजी हे दोघेच अद्यापही विजनवासात आहेत. ते आणि त्यांचे काही सहकारी वगळता नक्षलवादी चळवळीत आता प्रभावी असे फार कोणी राहिले नाही, असा सुरक्षा यंत्रणांचा दावा आहे. २१ मे रोजी अबुझमाड येथे मारल्या गेलेल्या नरसिंह उर्फ नम्बाला केशवराव उर्फ बसवराजू याने मांडवी आणि तिरुपती या दोघांनाही त्याची हत्या होण्यापूर्वीच आत्मसमर्पणाचा सल्ला दिला होता. पण, तेव्हा त्यांनी तो मानला नाही. आजही ते वरमलेले नाहीत. याची दखल घेऊन सुरक्षा यंत्रणांनी त्यांच्या मागे लागलं पाहिजे. त्यांचे आत्मसमर्पण जेवढ्या लवकर होईल, तेवढं मोदी सरकारचं ३१ मार्च २०२६ पूर्वी संपूर्ण देश माओवादमुक्त करण्याचं ध्येय पूर्ण होईल.

लोकशाहीत कितीही दोष दिसत असले, तरीही आज लोकशाहीएवढी सर्वसमावेशक, न्यायतत्त्वावर आधारलेली, समतामूलक दुसरी चांगली व्यवस्था नाही. भारतीय लोकशाही तर अधिक लवचिक आहे. जगातल्या अन्य लोकशाही व्यवस्थांपेक्षा भारतीय व्यवस्थेत सुधारणा, संवाद आणि सामिलीकरणाच्या शक्यता सर्वाधिक आहेत. त्यामुळेच नक्षलवादासारखी जहाल, हिंसाधारीत क्रांतिकारक विचारसरणी इथे टिकाव धरू शकली नाही. क्रांतीच्या कल्पना हळूहळू विरत गेल्या. उत्क्रांतीचाच मार्ग अधिक शाश्वत आणि फलदायी असल्याच्या निष्कर्षावर देशातल्या जहालात ल्या जहाल नक्षलवाद्यांनाही यावे लागले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही देशातील जनतेने अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या नेत्यांनाच आपले नेतृत्व म्हणून का निवडले, याचे उत्तर यात आहे.गेल्या तीन दिवसांत नक्षलवाद्यांचं मोठ्या संख्येने झालेलं आत्मसर्पण हा माओवादाचा पराभव आणि लोकशाहीचा विजय आहेच; पण त्याचं विश्लेषण केवळ एवढ्याने संपत नाही. नक्षलवादाचा, माओवादाचा पराभव करणं हे केवळ सुरक्षा आणि शांततेसाठी आवश्यक नव्हते. त्यापेक्षाही ते विकासात्मक सामाजिक, राजका ीय कारणांसाठी अधिक होते. जसा आदिवासींनी, वंचित - शोषितांनी रचनात्मक विकासाचा मार्ग निवडला, तसे सरकारलाही आता या समूहांना विकास प्रक्रियेत वेगाने सामावून घ्यावं लागेल. १९६७ मध्ये नक्षल वादी चळवळीची मांडणी केली गेली, तेव्हाचा वर्गसंघर्ष, वर्गशत्रू वेगळे होते. बदलत्या अर्थव्यव स्थेने, जागतिकीकरणाने त्याचे सगळे आयामच बदलून टाकले. नक्षलवादी चळवळ कमकुवत, सैरभैर, संदर्भहीन ठरण्याला तेही एक कारण ठरले. नक्षल वाद्यांच्या आत्मसमर्पणाने निबिड अरण्यात शांतता राहील.

पण, नुसत्या शांततेने भागणार नाही. तिथे न्यायही पोहोचला पाहिजे. आदिवासींचे विस्थापन होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. त्यांचं शोषण करणारी व्यवस्था कमजोर झाली पाहिजे. नक्षलवादाचा मार्ग नाकारून आपण शांततापूर्ण विकासाचा, रचनात्मक लोकशाहीचा मार्ग निवडला ते योग्यच केलं, असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला पाहिजे. तो खरा लोकशाहीचा विजय असेल!

## उत्सुकता 'द ताज स्टोरी'ची

ताजमहाल हा 'तेजोमहाल', म्हणजे भगवान शिवाचे मंदिर असल्याचे वास्तव उघड करणारा 'द ताज स्टोरी' हा चित्रपट ३१ ऑक्टोबरला देशभरात प्रदर्शित होत आहे. युट्युबसह अन्य सामाजिक माध्यमांवर व्हायरल झालेला चित्रपटाचा ट्रेलर सध्या जोरदार चर्चेत आहे. जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेला ताजमहाल शाहजहान या मोगल सम्राटाने पत्नी मुमताज हिच्या स्मरणार्थ बांधल्याचे आजतागायत इतिहासाच्या पुस्तकांतून शालेय विद्यार्थ्यांवर बिंबवण्यात आले. मात्र यामागील सत्य वेगळेच असून ते या चित्रपटाच्या माध्यमातून मांडण्याचा धाडसी प्रयत्न या चित्रपटाच्या माध्यमातून करण्यात आला आहे. त्यामुळे लोकांमध्ये त्याविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. जेष्ठ इतिहास संशोधक पुरुषोत्तम ओक यांनी ताजमहाल विषयी सखोल संशोधन करून 'ताजमहाल नव्हे तेजोमहाल', हे पुस्तक लिहिले; मात्र एकगठ्ठा मतांसाठी तत्कालीन सरकारच्या काळात हे सत्य दडपण्यात आले. ते सत्य 'द ताज स्टोरी' या चित्रपटातून मांडण्यात आले आहे. सुरेश झा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून तुषार अमरीश गोएल यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. ज्येष्ठ अभिनेते परेश रावल यांनी या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली आहे. या चित्रपटाचे वैशिष्ट्यपूर्ण कथानक आणि सामाजिक माध्यमांवरील प्रतिक्रिया पहाता देशपातळीवर या चित्रपटाविषयी उत्सुकता दिसून येत आहे. चित्रपटामध्ये 'ताजमहाल'ची माहिती देण्यासाठी 'गाईड' म्हणून काम करणाऱ्या परेश रावल यांना ताजमहालच्या वास्तूवर स्वस्तिक, श्रीफळ, त्रिशूळ, ॐ आदी असंख्य प्रतिके आढळून येतात. त्यानंतर त्यांनी ताजमहालच्या वास्तूचा सखोल अभ्यास केल्यावर ताजमहालमधील बंद करण्यात आलेल्या २२ खोल्या, ताजमहालच्या तळघरात सापडलेली हिंदूंची प्रतिके आढळून येतात. त्या वेळी ताजमहाल हे भगवान शिवाचे मंदिर असल्याचे वास्तव त्यांना आढळून येते. हे सत्य शोधण्यासाठी पत्करलेली जोखीम; हे सत्य उघड होऊ नये, यासाठी एका समाजाकडून त्यांना झालेला प्रचंड विरोध आणि सत्यासाठी त्यांनी दिलेला न्यायालयीन लढा अशी चित्तथरारक अन् संघर्षाची कथा या चित्रपटात साकारण्यात आली आहे. ताजमहालच्या संशोधनात सापडलेली हिंदू धर्मातील सात्विक प्रतीके आणि त्याठिकाणी दडवण्यात आलेले पुरावे याविषयी याआधीही अनेक पोस्ट सामाजिक माध्यमांतून पाहण्यात आल्या होत्या. मात्र चित्रपटाच्या माध्यमातून त्याबाबत रीतसर माहिती मिळणार असल्याने हा चित्रपट समस्त भारतीयांनी चित्रपट गृहांत जाऊन पाहायला हवा. ताजमहालसारख्या देशभरात अनेक वास्तू आहेत ज्या यवनी आक्रमकांनी पाडून किंवा दडवून त्याठिकाणी आपल्या पंथाच्या वास्तू उभ्या केल्या आहेत.

# संवाद

**जगन घाणेकर,** मुंबई
९६६४५५९७८०

## भित्याच्या पोटी ब्रह्मराक्षस

प्रसिद्ध मराठी दिग्दर्शक महेश कोठारे यांनी मागाठाणे येथील एका दिवाळी पहाटच्या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे (भाजपचे) कौतुक केले. 'भाजप म्हणजे आपले घर आहे, कारण मी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदींचा भक्त आहे,' असे महेश कोठारे म्हणाले. यासोबतच, 'आपल्याला इथून नगरसेवक निवडून द्यायचा आहे, पण यावेळचा महापौरही इथूनच निवडून गेलेला असेल,' असे महेश कोठारे बोलले.परंतु, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) (उबाठा) पक्षाला त्यांच्या या बोलण्याची 'मिरची का झोंबली', हे समजायला मार्ग नाही. जर त्यांनी शिवसेना (उबाठा) किंवा मराठी भाषिकांवर टीका केली असती, तर मग आपण ही बाब समजू शकलो असतो. त्यांनी ना शिवसेना (उबाठा) वर टीका केली, ना ते मराठी भाषिकांवर काही बोलले.या भाषणावर शिवसेना (उबाठा) प्रवक्ते संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली. 'महेश कोठारे हे नक्की मराठीच आहेत ना? मला याबद्दल शंका वाटते. तुम्ही कलाकार आहात. तुम्ही जर असेच काही बोलत राहिलात, तर रात्री येऊन तो तुम्हाला चावेल आणि गळाही दाबेल,' असे म्हणत त्यांनी महेश कोठारेंवर धमकीवजा टीकास्त्र सोडले.

लोकशाहीमध्ये कोणत्याही व्यक्तीला आपले व्यक्तिगत मत मांडण्याचा तसेच आवडीनुसार निवड करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. खासदार संजय राऊत यांना ही गोष्ट माहीत नसेल, असे कसे होईल? त्यांनी तर संविधान 'कोळून पिले आहे'. तरीही ते अनाप-शनाप प्रतिक्रिया देत आहेत. यामागे आगामी काळात पार पडणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत, विशेषतः बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुक पार पडणार आहे, या मध्ये शिवसेना (उबाठा) फारसा प्रभाव पाडू शकणार नाही, अशी पुसटशी कल्पना तर त्यांना आली का ? हा प्रश्न पडतो म्हणूनच त्यांनी अशी प्रतिक्रिया दिली असावी. मराठीत एक म्हण आहे भित्याच्या पोटी ब्रह्म राक्षस जेव्हा एखादी व्यक्ती खूप घाबरते, तेव्हा ती चुकीच्या गोष्टी करू शकते किंवा भीतीमुळे टोकाची भूमिका घेऊ शकते यातील ही त्याची प्रतिक्रिया आहे अन्यथा सामान्य माणूस ज्या पद्धतीने आपले मत व्यक्त करतो त्या प्रमाणे महेश कोठारे बोलले असतील पण भीती माणसाला किती खालच्या स्तरावर उतरविते याचे हे लक्षणं आहे.

**अविनाश देशपांडे**

## निवडणुकांचे बदललेले घातक रूप

लोकशाहीत निवडणुकीला खूप महत्त्व आहे. निवडणुकीमुळेच सक्षम सत्ताधारी व विरोधक मिळतात. देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाले त्यापैकी जवळजवळ ७० वर्षे एकाच पक्षाची सत्ता असल्याने हम करे सो कायदा हीच मानसिकता सर्वांवर लादली गेली. त्या नंतर आलेल्या सरकार ने देशाला प्रगतीपथावर नेण्याचे ध्येय ठेवून निवडणूक घेतल्या परिणामी गेल्या काही वर्षात अनेक वर्षे सत्तेत राहिल्या नंतर त्या पक्षाला निवडणुकीत मिळालेल्या अपयशामुळे ते सैरभैर झाले आहेत त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत विकासाचा मुद्दा दूर करून आरोप प्रत्यारोप, लांगूनचालन, दंगली घडवणे,आतंकवादी हल्ले, हिंसा, आंदोलने, मत चोरी, ई व्ही एम मशीन या गोष्टींवर प्राधान्य दिले जात आहे. आताची निवडणूक एक वेगळ्या मुद्द्यावर होण्याची शक्यता आहे ती म्हणजे तथाकथित प्राणी प्रेमी मग ते भटके कुत्रे असोत, आक्रमक हत्ती किंवा कबुतरे असोत त्यांच्या रक्षणासाठी राजकीय पक्ष स्थापन केले जात आहे. दादरच्या कबूतरखाना विरुद्ध न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध जैन समाज आक्रमक होऊन मुंबई महानगरपालिका निवडणुकीत एक स्वतंत्र पक्ष म्हणून निवडणूक लढण्याचे जाहीर केले आहे. हे जाहीर करत असतांना त्यांची भाषा ऐकून शांतिप्रिय असलेला जैन समाज कोणत्या दिशेला जात आहे हे न समजण्यासारखे आहे. माणसांपेक्षा प्राणी महत्त्वाचे आहेत असे काही लोकांना वाटते आणि त्याप्रमाणे ते त्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करतात. सत्ये शिवाय हे शक्य नसल्याने सत्ता पालट करण्यासाठी रोज नव नवीन पक्ष निर्माण होत आहे. निवडणूक आयोगाने अशा राजकीय पक्षांनी ध्येयधोरणे, त्यांचे आर्थिक व्यवहार तपासून त्यांना मान्यता देणे गरजेचे आहे. मान्यता मिळाल्यानंतर आपल्या जाहीरनाम्याप्रमाणे ते काम करत आहे की नाही हे पाहणे देखील निवडणूक आयोगाने केले आहे. काही राज्यातील विधानसभा निवडणूकीत भाषिक राजकारणाचा देखील वापर होत असल्याचे दिसून आले आहे. या सर्वातून एकच दिसून येते ते म्हणजे पैसा आणि सत्ता ही आपल्याकडे असावी असे वाटते. विकासाचा मुद्दा हा गौण ठरत आहे. खरंतर देश विकसित झाला तरच तो सुजलाम सुफलाम होऊ शकतो. सर्वांचे आर्थिक पाठबळ पण वाढू शकते. देशाला सुजलाम सुफलाम न बनवता देशाला गुलामगिरीत परत कसे ढकलता येईल हेच आता वेगवेगळ्या निवडणुकीतून पाहायला मिळते. उमेदवार देताना त्याचे चारित्र्य, समाजासाठी केलेले कार्य न बघता कोणालाही अगदी गुन्हेगाराला देखील तिकीट दिले जाते. तो गुन्हेगार कारागृहातून निवडणूक लढवून जिंकतो हे अतिशय दुर्दैवी आहे. सर्व पक्षांच्या या ध्येयधोरणांमुळे सामान्य मतदार निवडणुकीत असमाधानी असून तो निवडणुकीत सहभागी होत नाही. निवडणुकीच्या निमित्ताने मिळणारी सुट्टी ही अन्य कारणासाठी किंवा मौजमजा करण्यासाठी वापरली जाते. मतदान करायला खूप कमी लोक स्वतःहून येतात. जे येत नाही त्यांना वेगवेगळी आमिषे दाखवली जातात किंवा एकाच व्यक्तीचे दोन, तीन किंवा त्यापेक्षाही जास्त मतदान केंद्रात नाव असल्याने ते त्या त्या ठिकाणी जाऊन मतदान करतात.

**लीना मकरंद गाडगीळ**
पनवेल.

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# नितिमान नितीनमुळे सिंधुबाईच्या अंधारलेल्या आयुष्यात उजळली आनंदाची पणती

## मोडकळीस आलेल्या नारळी येथील वारकड कुटुंबास नितीन भुतडा यांनी दिले कायमस्वरूपी उदरनिर्वाहाचे साधन "राजकारणातील पारदर्शी व्यक्तिमत्वाची अनोखी समाजसृजनशीलता!"



**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - आयुष्याचं गणित तसं अवघडच असते. प्रत्येकजण आपापल्या परीने बेरीज वजाबाकी करीत जीवनाचे गणित सोडविण्याचा प्रयत्न करतो. मात्र कधी कधी अचानक काही वादळं येतात आणि सारे काही कोलमडून पडते. असाच काहीसा प्रकार नारळी येथील सिंधूबाई वारकड यांच्या सोबत घडला. सिंधूबाई वारकड ह्या नारळीत नाल्याकाठी गोळ्या, बिस्कीट, वेफर्सचे सारखे दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे साहित्य विक्रीचे छोटेखानी दुकान चालवून आपला उदरनिर्वाह चालवायच्या.

दरम्यान दि 16 ऑगस्ट रोजी ढगफुटी सदृश अतिवृष्टी झाली. ज्यात संपूर्ण गाव जलमय झाले. होत्याचे नव्हते झाले. त्यात सिंधुबाईचे उदरनिर्वाहचे दुकानबपूर्णतः वाहून गेली. छोट्याशा दुकानाच्या भरवशावर 5 मुलींसह संसाराचा गाडा ओढणाऱ्या सिंधूबाई उन्मळून पडल्या. आता काय करायचे..? आणि कसे जगावे असा प्रश्न पडला...? 5 मुलींचे शिक्षण उदरनिर्वाह, संसाराचा गाडा कसा चालवायचा या चिंतेने त्या खचून गेल्या होत्या. उमरखेड-महागाव मतदारसंघातील दयेचा पाझर, जनसामान्यांच्या आशेचा किरण असलेले भाजपा, यवतमाळ व पुसद जिल्हा समन्वयक श्री नितीन भुतडा हे अतिवृष्टीग्रस्त भागाचा पाहणी दौरा करीत असताना सिंधूबाई यांनी त्यांची भेट घेतली. सिंधूबाईंनी आपबीती कथन करीत हंबरडा फोडला. कुटुंबांचे आभाळ फाटल्याची कैफियत मांडली. आता काय करावं आणि कसं जगावं? लेकरांना काय खाऊ घालावं? कस शिकवावं असे मन सुन्न करणारे प्रश्न मांडले. सृजनशील मनाच्या नितीन भुतडा यांनी त्यांची कैफियत ऐकून घेतली. त्यांना धीर दिला. त्यांच्या कु हर्षदा गजानन वारकड वय 8 वर्ष , तेजस्विनी गजानन वारकड 9 वर्ष, संजीवनी गजानन वारकड 13 वर्ष, गायत्री गजानन वारकर 15 वर्षे आणि टीना गजानन वारकड 16 वर्ष या मुलींनाही धीर देत चिंता करू नका हा भाऊ तुमच्या पाठीशी आहे, आपण सर्व व्यवस्थित करू असे आश्वस्त केले. आणि जवळपास 1 लाख रु किमतीचे लोखंडी दुकान बनवून दिले व लक्ष्मीपूजनाच्या पावन पर्वावर त्या दुकानात सर्व माल भरून देत रीतसर उद्घघाटन केले. त्याच बरोबर त्यांची दिवाळी देखील चांगली व्हावी या करिता पाचही मुलींना कपडे, सिंधुबाईना कपडे, सासुला कपडे दिवाळी निम्मित फराळ मिठाई व फटाके सुद्धा कुटुंबाला दिले. नितिन भुतडा यांनी एका अंधारलेल्या आयुष्यात तेजाची, उमेदीची पणती पेटविली. याचं पणतीच्या प्रकाशाने वारकड कुटुंबीयांमध्ये चैतन्य संचारले. खऱ्या अर्थाने दीपोत्सव नारळीवासियांना अनुभवण्यास मिळाला. भुतडा यांच्या संवेदनशील स्वभावाची यानिमित्ताने पुन्हा एकदा प्रचिती आली. यापूर्वी देखील हेलीकॉप्टर बनवून देशास समर्पित करण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्याच हेलिकॉप्टर ची ट्रायल घेतांना अपघाती दगावलेल्या फुलसावंगी येथील मुस्लिम समुदायातील मुन्ना उर्फ रंचोच्या परिवारास भुतडा यांनी 5 लाखांची मदत दिली होती. अनेक होतकरू विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व देखील त्यांनी घेतले आहे. अतिवृष्टीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी मदत म्हणून 11 लाख रुपयांची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा केली. त्यांच्या जन्मदिनी अनेक अपंग व्यक्तींना ई रिक्षा देऊन अनेकांचे अपंगत्व दूर केले. नितीनभाऊंच्याच मार्गदर्शनात सहस्त्रबाहु चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून हजारो गरजूंना मोफत औषध पुरवठा नियमितपणे केल्या जातो. आशा सृजनशील मनाच्या नितीन भुतडा यांच्या संवेदनशील कामाची चर्चा सर्वदूर पर्यंत होत आहे.

# काकड आरतीच्या माध्यमातून सामाजिक एकोप्याचे जतन

## तळणी येथील गावकऱ्यांचा प्रेरणादायी उपक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - दिवाळीच्या शुभ पर्वावर गावागावात भक्तीमय उपक्रम राबवले जातात. त्यातीलच एक सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा उपक्रम म्हणजे काकड आरती पर्व. तळणी गावात अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या काकड आरती परंपरेत गावकऱ्यांचा उत्साह, श्रद्धा आणि एकोपा पाहायला मिळतो.

याही वर्षी लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने काकड आरतीचा शुभारंभ करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे पहिल्या दिवशी गावचे माजी उपसरपंच शाहीद रयानी यांच्या राहत्या घरी चहा व अल्पोपहाराचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी तळणी गावातील तांड्यातील बंजारा काकडा, महिला काकडा आणि पुरुष काकडा या तिन्ही काकडा मंडळांना निमंत्रण देण्यात आले होते. सर्वप्रथम आलेल्या बंजारा काकड्यांचे पांढऱ्या टोप्यांनी व पुजाऱ्यांना शेला देवून सन्मान करण्यात आला. त्यानंतर महिला काकड्यांचे शाल देऊन आणि पुरुष काकड्यांचे भगवी टोपी



व पुजाऱ्यांना पांढरा शेला अर्पण करून स्वागत करण्यात आले. तिन्ही काकडा मंडळांना चहा व नाश्ता देण्यात आला. या कार्यक्रमास माजी उपसरपंच शाहीद रयानी व त्यांचा परिवार, सरपंच श्रीराम मेश्राम, देवराव महाराज, विष्णुपंत लोणकर, अशोक वाघमारे, शांताराम राठोड, सैयद जलील, ज्ञानेश्वर घारेकर, विजय राठोड, शेख नूर, पवन घारेकर, शोहेल खान, किरण वाघमारे, सुभाष जाधव, वैभव राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. गावातील परंपरा, सामाजिक ऐक्य आणि आपसातील प्रेम वाढवण्याचा संदेश देणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने "एक गाव एक भावना" याचा सुंदर प्रत्यय देणारा ठरला.

# पुसद अर्बन बँक व भारती मैद पतसंस्थेला ठेवीदारांनीव खातेदारांनी सहकार्य करावे!

## सर्व पक्षीय बैठकीत आवाहन ; ठेवीदारांना पाच लाखापर्यंत रिझर्व बँकेच्या नियमानुसार सुरक्षा!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - पुसद येथील दि.२२ ऑक्टोंबर रोजी विश्रामगृह येथे पुसद अर्बन बँक व भारती मैंद पतसंस्था या संस्थेमधून ठेवीदार आपली ठेवी काही अफवेच्या कारणास्तव काढत असल्यामुळे त्यांना आवाहन करण्यासाठी सर्वपक्षीय पत्रकार परिषद घेण्यात आली. यामध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी (शरद पवार गट)भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) व इतर सामाजिक संघटनेच्या वतीने ही पत्रकार परिषद घेण्यात आली.

आपल्या पुसद तालुक्यात ४० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या पुसद अर्बन कॉ ऑप बँक व २३ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या भारती मैद पतसंस्थेमार्फत बैंकिग च्या अत्यंत चांगल्या व तत्पर सेवा दिल्या जातात. दोन्ही संस्थामार्फत छोट्या व्यावसाईकापासून ते मोठ्या व्यावसायिकांना व्यवसाय कर्ज, गृह, शिक्षण कर्ज अडिअडचणी मध्ये पाहिजे तेव्हा कर्ज सुविधा दिली जाते. संजय गांधी, लाडकी बहीण सारख्या शासकीय योजनाच्या हजारो लाभार्थी खातेदारांना पुसद अर्बन बँक तत्पर सेवा देत असते. दोन्ही संस्थांमध्ये व्यापारी, सर्व पक्षीय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते संचालक म्हणून कर्तव्य बजावत आहेत बँक व पतसंस्थेतील सर्व ठेवीदारांना आज पर्यंत त्याच्या ठेविवरीत व्याज तसेच त्यानी खात्यातून मागितली तेव्हा पाहिजे तितकी रक्कम पुरविली आहे. दोन्ही संस्थांमध्ये सर्व काही सुरळीत सुरु असतांना मागील १ महिन्यात दोन्ही संस्थांमधील ठेवीदारां मध्ये चुकीचा संभ्रम निर्माण होऊन ठेवीदारांनी आपल्या ठेवी विड्रॉल करणे सुरु केले आहे ज्या ठेवीदाराच्या भक्कम पाठिंब्यामुळे संस्था उभ्या आहेत त्यांनीच अचानक ठेवी काढणे सुरु केल्याने बैंक व पत्तसंस्थाच्या दैनदिन व्यवहारावर विपरीत परिणाम पडत आहे.

ठेवीदारांच्या गैरसमजुतीतुन विड्राल होत असल्याने अत्यंत चांगल्या पद्धतीने चालणाऱ्या दोन्ही संस्थाच्या भवितव्यावर प्रश्न उपस्थित होऊ शकतो, तसे झाल्यास आपल्या भागात बैंकिंग ची सेवा देणाऱ्या हक्काच्या संस्था आपण गमावून बसु, दुरगामी परिणाम करणाऱ्या या घटनेला राळण्यासाठी पुसद अर्बन बँक व भारती मैंद पतसंस्थेवर ठेवीदारांनी विश्वास ठेवावा असे आवाहन आज विश्राम गृहावर झालेल्या सर्व पक्षीय बैठकीतून करण्यात आले. त्यानंतर दिलेल्या सामूहिक पत्रकातुन वरील आवाहन करण्यात आले.

या पत्रकार परिषदेला उपस्थित.. नारायण शिरसागर, ॲड.उमाकांत पापीनवार, डॉ. मोहम्मद नदीम,राजन मुखरे,राजेश साळुंके, पंजाबराव खडकेकर,भगवान आसोले, निशांत बयास,मो ईरफान मो.फयान, नितीन भुतडा, निखिल चिद्दरवार,अनिरुद्ध पाटील,नाना बेले,निलेश पेन्शनवार, डॉ.अकील मेमन, सुरज डुबेवार, संजय बजाज, बाळासाहेब पाटील कामारकर,अनुकूल चव्हाण, विनोद जिल्लेवार, निखिल ठाकरे, गणेश पवार, निखिल गादेवार, अभिजीत पानपट्टे, ओमप्रकाश शिंदे, करण ढेकळे, जिया शेख, हरगोविंद कदम, वैभव देशमुख,ऋषिकेश पंडितकर,संग्राम देशमुख,सह अनेक सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कंत्राटदारांची चार महिन्यांपासून देयके थकली

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी : मनरेगा योजनेंतर्गत काम चार करणाऱ्या अकुशल मजुरांसोबत शासकीय कंत्राटदारांच्या कुशल कामांची देयके मागील महिन्यांपासून थकलेली आहेत. शासनाच्या दिरंगाईमुळे हजारो कष्टकरी कुटुंबांची दिवाळी अंधारात जाणार आहे.

वणी तालुक्यात गावोगावी मनरेगांतर्गत चालणारी रोपवाटिका रस्ते व नालेबांधणी जलसंधारणाची कामे निधीअभावी ठप्प झाली आहेत. चार महिन्यांपासून एकाही मजुराला मजुरी न मिळाल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाकडून वारंवार आश्वासने मिळतात. प्रत्यक्षात निधी मात्र मिळालेला नाही. शासनाच्या या दिरंगाईला कंटाळून रोपवाटिकांवर काम करणाऱ्या मजुरांनी कामबंद आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. परिणामी, कोट्यवधींची झाडे सुकत असून, संपूर्ण प्रकल्प धोक्यात आला आहे. फक्त मजुरांचेच नव्हे, तर शासकीय कंत्राटदारांचेही बिल थकले आहेत. ग्रामपंचायतींच्या विकासकामांना निधी मिळत नसल्याने स्थानिक विकास ठप्प झाला आहे. तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना जसे की सिंचन विहीर, शेततळे, बांध बांधणी आणि जलसंधारणाची कामे पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने देयके दिली नाहीत.

अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून कामे पूर्ण केली. मात्र, निधी न मिळाल्याने त्यांची परतफेड करणे अवघड झाले आहे. शेतकरी आणि मजुरांचा सरकारविरोधात तीव्र आक्रोश व्यक्त होत असून, ग्रामपंचायती व पंचायत समित्या निधीच्या मागण्या पाठवत आहेत, पण कोणताही प्रतिसाद नाही. शासनाने कष्टकरी मजुरांची मजुरी, कंत्राटदारांची बिले आणि शेतकऱ्यांची थकीत रक्कम तत्काळ द्यावी, अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले जाईल, असा इशारा युवा सेना (उबाठा) जिल्हा उपाध्यक्ष अजिंक्य शेंडे यांनी सरकारला दिला आहे.

## • वेचक

### कीर्तन हे मनोमंथनाचे साधन : हभप रामेश्वर खोडे महाराज

वणी : कीर्तनामध्ये मनोरंजन असल्यास हरकत नाही, पण कीर्तन हे मनोरंजनाचे नव्हे, तर मनोमंथनाचे साधन आहे. ज्याप्रमाणे शेतात, दुकानात किंवा कोठीत असणाऱ्या तांदळाचा भात होत नाही. त्यासाठी त्याला पातेल्यात यावे लागते. त्याप्रमाणे जीवनाचे कल्याण होण्यासाठी कीर्तनात येणे अनिवार्य आहे, असे विचार महाराष्ट्र शासन पुरस्कृत व्यसनमुक्ती सम्राट म्हणून तिख्यात हभप रामेश्वर महाराज खोद्रे यांनी व्यक्त केले. तणी येथील जैताई देवस्थानच्या प्रांगणात स्व. अरुण बिलोरीया आणि विमलताई धोटे यांचे मातापिता तुळसाबाई आणि दादाजी गोहणे यांच्या स्मृत्यर्थ आयोजित धनत्रयोदशीच्या प्रभातकालीन कीर्तनात ते व्यक्त होत होते. सागर मुने यांनी प्रास्ताविक केले. आपल्या कीर्तनामध्ये संसार हा न संपणारा आहे तर परमार्थ हाच खन्य अर्थाने पूर्णत्वाला जाणार आहे. परमार्थात प्रयत्न करायला हवे तर संसार प्रारब्धाने होतो, गंगा पाप दूर करते पण कीर्तन पाप करण्याची प्रवृत्ती नष्ट करते. गरम झाल्याशिवाय लोखंडसुद्धा नरम होत नाही. त्याच स्तरूपात तपाशिवाय आपल्यालाही नम्रता येत नाही. अशा विविध वाक्यांच्या आधारे निरूपण करीत खोडे महाराजांनी जीतनामध्ये व्यसनमुक्तीचे आणि मातृ-पितृ सेवेचे महत्त्व अधोरेखित केले. जैताई देवस्थानचे सचित ह.भ.प मनु महाराज तुगनायत यांनी संचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्तीतेसाठी हरिहर भागतत, तुषार नगरवाला, देवानंद पोद्दार, जयंत लिडबिडे, नामदेत पारखी यांनी परिश्रम घेतले. यावेळी माजी आमदार संजीवरेडी बोदकुरवार तथा विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद पुंड यांच्याहस्ते कीर्तनकारांचा सन्मान करण्यात आला. कीर्तनास राजू चव्हाण यांनी संवादिनीवर, लक्ष्मण गायकवाड यांनी तबल्यावर तर विष्णू नारिंगे यांनी मंजिरीवर साथ दिली.

### मारेगाव शहरात अग्निशमन यंत्रणेचा अभाव

मारेगाव : यवतमाळ जिल्ह्यात दुर्गम असलेला मारेगाव तालुक्यासाठी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा असणे क्रमप्राप्त बनले आहे. तालुक्यासाठी महत्त्वपूर्ण असणारी अग्निशमन यंत्रणा नसल्याने आगीसारखी अनुचित घटना घडल्यास दुसऱ्या तालुक्यातील यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत आहे. बाहेरून अग्निशमन यंत्र यायला वेळ जात असल्याने आगीत मोठे नुकसान झाल्यानंतर ही यंत्रे पोहोचतात. यापूर्वी बिहाडीपोड, कापूस जिनिंग, रोडवर मारेगाव तालुक्यात आग लागल्यास अन्य शहरातून अग्नीशमन दल बोलवावे लागते. धावणाऱ्या वाहनांना लागलेल्या आगीत संपूर्ण बेचिराख झाल्यावर यंत्र पोहोचल्याचा प्रकार घडला आहे. शहर तालुक्याचे मुख्यालय असल्याने गेल्या काही वर्षात लोकसंख्या वाढत आहे. शासकीय, निमशासकीय आणि खासगी कार्यालये, बाजारपेठ, सरकारी दवाखाना, इंग्रजी माध्यमच्या शाळा आहेत. नव्याने मार्डी, कुंभा येथे बाजारपेठ उदयाला येत आहे. शहरात नव्याने नागरी वस्ती उभी राहिली आहे. अग्निशमन यंत्रणेची गरज लागल्यास २० ते ४० किलोमीटर अंतरावरून अग्निशमन दल बोलवावे लागते. मारेगाव तालुक्यातील पावसाळ्यात नैर्सगिक आपत्ती सातत्याने उद्भवतात. त्यामुळे अग्निशमन यंत्रणा असल्यास विविध नैर्सगिक आपत्ती यामध्ये आग विझवण्यासाठी मदत होऊ शकते. अनेक दिवसांपासूनची मागणी असतानाही याकडे प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष होत आहे. मारेगाव तालुक्यात विविध मार्गावर लहान-मोठे अपघात सातत्याने घडत आहेत. ही समस्या कायम असल्याने भविष्यात वाहनांची संख्या व बदलत्या तंत्रज्ञानाच्या वाहनांची संख्या लक्षात घेता, फिरते अग्निशमन सह रेस्कू व्हॅन असणे गरजेचे आहे.

### दिग्रसमध्ये रंगू लागली इच्छुक उमेदवारांची चर्चा

दिग्रस : येथील नगरपालिकेचे नगराध्यक्ष व प्रभाग आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता प्रभागात राजकीय चर्चांना ओर आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत जागा वाटप, तिकीट कुणाला मिळणार, आपला माणूस असेल की दुसरा, असे विविध प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. दिठाळीनंतर राजकीय धुळवड आणखी ओरात उडणार आहे. इच्छुक उमेदवार दिवाळी सण कॅश करण्याच्या कामी लागले आहेत. शहरात प्रत्येक पक्षाचा कार्यकर्ता सज्ज असून, नेत्यांपेक्षा कार्यकर्त्यांचा उत्साह अधिक दिसत आहे. निवडणुकीतील तिकीट निश्चितीपूर्वीच कार्यकर्त्यांनी आपला प्रचाराच्या तयारीला सुरुवात केली आहे. आपल्या प्रभागात प्रत्येक घरी जाऊन भेटीगाठी सुरु केल्या आहेत. सोशल मीडियावर निवडणुकीचा फिव्हर तापला आहे. अद्याप आचारसंहिता लागली नसली तरी उमेदवार ठरवण्याची धावपळ सुरू आहे. दिवाळीनंतर वातावरण आणखी तापणार आहे.

# नगराध्यक्ष पदासाठी प्रितेश बोरेले अपक्ष लढणार ? , शहरात चर्चेला उधाण

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : भाजप युवा मोर्चाचे माजी तालुकाध्यक्ष प्रितेश बोरेले हे येणाऱ्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल करणार असल्याची चर्चा सध्या शहरात जोरात रंगत आहे. सतत सामाजिक कार्यात निस्वार्थपणे सहभागी राहून युवकांना संघटित करून समाजकार्यासाठी प्रेरित करणारे प्रितेश बोरेले हे शहरातील परिचित युवा नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

मागील अनेक वर्षे त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत पक्षवृद्धीसाठी उल्लेखनीय काम केले. त्यांच्या कार्याचा लाभ पक्ष संघटनेलाही मोठ्या प्रमाणात



झाला आहे. प्रितेश बोरेले यांनी 'युवा फाउंडेशन'च्या माध्यमातून शहरातील युवकांना सामाजिक कार्यात सहभागी करून शिक्षण, आरोग्य, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय उपक्रम राबवले आहेत. या माध्यमातून त्यांनी युवकांमध्ये समाजसेवेची भावना जागवली असून, अनेक युवक आज विविध क्षेत्रांमध्ये आपले नाव कमावत आहेत. राजकीय वारसा नसताना केवळ आपल्या विचारशक्ती व समाजकारणाची तळमळ यांच्या जोरावर त्यांनी शहरवासीयांच्या मनात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. दरम्यान, प्रितेश बोरेले नगराध्यक्ष पदासाठी अपक्ष उमेदवारी दाखल करणार असल्याची चर्चा सोशल मीडियावरही जोरात असून त्यांच्या समर्थकांकडून बॅनरबाजी सुरू झाली आहे.

राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, बोरेले जर अपक्ष किंवा अन्य पक्षासोबत मैदानात उतरले, तर भारतीय जनता पक्षाला शहरात त्याचा फटका बसू शकतो, कारण त्यांच्या मागे युवकांचे मोठे पाठबळ असल्याचे चित्र दिसत आहे.

# पुसदमध्ये प्रारूप मतदार यादीवर ७११ आक्षेप दाखल!

## मतदारांनी नविन यादीमध्ये आपले नाव तपासा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - आगामी होणाऱ्या सार्वत्रिक २०२५-२६मधील निवडणुकासाठी पुसद नगरपालिकेच्या प्रारूप मतदार याद्या प्रशासनाने तयार केल्या. सदर यादी नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध केली. त्यामध्ये जुनी नावे असून नविन मतदारांचे नाव शोधून सापडत नाही. यादीत प्रभागाबाहेरील मतदरांची सुद्धा नोंद आहे. त्यातच १७ ऑक्टोबरपर्यंत आक्षेप नोंदविण्याची शेवटची तारीख अशी प्रक्रिया होती यामध्ये पुसद शहरातून एकुण (७११) नागरिकांनी आक्षेप नोंदविले आहेत.

प्रभाग रचना तयार करतांना ठरविण्यात आलेल्या सीमेअंतर्गतच मतदार यादी तयार होणे आवश्यक आहे. सदर प्रभागात प्रभाग रचनेच्या सीमेतील




मतदारांचा समावेश होणे अपेक्षित आहे. पुसद नगरपरिषद क्षेत्रात प्रभाग रचना आणि मतदार यादी यांचा कुठेही ताळमेळ नाही. आणि हमरस्ते ओलांडून जवळच्या प्रभागातील लोकांचा संपर्क तोडून दुसऱ्या प्रभागात समावेश करण्यात आला होता. त्यामुळेच एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागाच्या मतदार यादीत समाविष्ट झाली आहेत. प्रभागाचे पुन्हा सर्वेक्षण करावे. जे मतदार ज्या प्रभागात वास्तव्यास आहेत, त्याच प्रभागात ठेवावे. मतदार याद्या अद्यावत कराव्या, अशी आक्षेपधारकांची मागणी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे नवीन बनविलेल्या प्रभाग रचना मतदार यादी मध्ये नागरिकांनी आपले नावे आहे किंवा नाही याची तपासणी करून खातीरजमा करून घ्यावे.

# खुनाच्या गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन अवघ्या २४ तासात ठोकल्या बेड्या

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : 20/10/2025 रोजी माहिती मिळाली की, ग्राम आडद शेत शिवारात एक इसम संशयीत रित्या मृत पावलेल्या अवस्थेत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरुन पोलीस स्टाफ रवाना होवुन घटनास्थळाची पहाणी केली असता, एक इसम ज्याचे डोक्यावर कशाचा तरी मार लागुन मृत अवस्थेत दिसुन आला. सदर मृतकाचे नाव देवराव म्यानबा वाळके वय 45 वर्षे रा. धनज असे असल्याचे समजले. वरुन ग्राम धनज येथील पोलीस पाटील नामे बापुराव देवराव धनवे, वय 55 वर्षे, रा. धनज ता. उमरखेड यांचे जबानी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पोफाळी येथे मर्ग क्रमांक 26/25 कलम 194 बी. एन. एस. एस. प्रमाणे नोंद करून तपासात घेतला. तसेच मा. वैद्यकीय अधिकारी सा. उमरखेड यांनी दिलेल्या वैद्यकीय अहवाल, फॉरेंसीक अहवाल व मिळालेल्या पुराव्यावरुन सदर मृतक ह्याचा खुन झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने सदर गुन्हया मधे अपराध क्रमांक 310/2025 कलम 103 बी. एन. एस. प्रमाणे गुन्हा नोंद करुन तपासात घेतला आहे.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य पाहुन मर्गमधील मृतकाचा अज्ञात मारेकरी याचा शोधण्याचे पोलीसांपुढे कठीण अवाहन होते पहाता पोलीस अधिक्षक श्री. कुमार चिंता सा., अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश थोरात सा., उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हनुमंत गायकवाड सा. यांनी गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध घेण्याचे आदेशीत केले होते. त्याप्रमाणे पोलीस स्टेशन पोफाळी येथील पोलीस स्टाफ यांना सदर गुन्हयातील घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळाचे निरीक्षण करुन गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला असता घटनास्थळाचे शेजारी असलेल्या झोपडीतुन जप्त केलेल्या ।) एक रक्ताने माखलेला संशयास्पद एक पांढऱ्या रंगाचा शर्ट, 2) एक रक्ताने माकलेला संशयास्पद राखाडी रंगाचा पॅन्ट अशा वर्णाचे कपडे मिळुन आले. त्यावर पोलीस स्टेशन पोफाळीच्या पथकाने कौशल्याचा वापर करून सदर गुन्ह्यातील आरोपी हा मयताचे शेताचे शेजारी नातेवाईक असल्याचा अंदाज लावुन त्याप्रमाणे संशयीत इसम नामे किसन सोनबा वाळके वय 45 वर्षे रा. धनज ता. उमरखेड यास ताब्यात घेवुन पोलीस कौशल्याचा वापर करुन त्याच्याकडे विचारपूस करता, यातील मृतक इसम नामे देवराव ग्यानबा वाळके वय 45 वर्षे, रा. धनज ता. उमरखेड यास आरोपी किसन सोनबा बाळके याने मागच्या वर्षी शिमग्याला उसने दिलेले 15000/- रुपये परत मागीतले असता मयताने पैसे देशील तर घेशील नाही तर काय घेशील " असा आरोपीस म्हणाला त्यामुळे त्याचा राग मनात ठेवुन आरोपी हा मृतक देवराव म्यानबा वाळके याची घटने दिवशी झोपण्याची वाट पाहु लागला. दि. 19/10/2025 रोजी चे रात्री 11/00 वा चे सुमारास मृतक देवराव ग्यानबा वाळके हा त्याचे जनावराचे झोपडीसमोर एका लाकडी बाजेवर झोपुन असताना आरोपीने त्याचे जवळील कुऱ्हाडीच्या तुंब्याने दोन वेळा मृतक देवराव ग्यानबा बाळके याचे डोक्यावर जबर मार मारुन खुन केला अशी कबुली दिल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणुन आरोपीस अटक करण्यात आले.

# पांढरकवडा नगराध्यक्षपदाच्या आरक्षणावर हरकत!

## मदन जिड्डेवार यांची हायकोर्टात याचिका, 'ओपन' वर्गाचे सलग तीन कार्यकाळ आरक्षण रद्द करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - नगरपरिषदेच्या अध्यक्षपदाचे आरक्षण सलग तीन कार्यकाळ 'ओपन' (सर्वसाधारण) वर्गासाठी ठेवल्याच्या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्ते मदन जिड्डेवार यांनी बॉम्बे हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या खंडपीठासमोर १७ ऑक्टोंबर सुनावणी झाली असून, पुढील सुनावणी २१ नोव्हेंबर रोजी निश्चित करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने ६ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार पांढरकवडा नगराध्यक्षपद पुन्हा एकदा 'ओपन' वर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. मात्र, यापूर्वीही २००२ ते २०२३ या कालावधीत हे पद सलग 'ओपन' वर्गासाठीच आरक्षित राहिल्याचे याचिकाकर्ता जिड्डेवार यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. या सलग आरक्षणामुळे रोटेशन अर्थात पालट नियमाचे उल्लंघन होत असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. तसेच, ओबीसी आणि अनुसूचित जमाती वर्गांना न्याय्य प्रतिनिधित्व नाकारले जात असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले आहे. या प्रकरणी याचिकाकर्त्यांच्यावतीने अधिवक्ता सिद्धार्थ लोढा यांनी बाजू मांडली, तर राज्य सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील नीरज पाटील यांनी हजेरी लावली. जिड्डेवार यांच्या या याचिकेमुळे पांढरकवडा नगराध्यक्षपदाच्या आरक्षणावर आता कायदेशीर वाद निर्माण झाला असून, पुढील सुनावणीला न्यायालयाचा निकाल महत्त्वाचा ठरणार आहे.

# परतवाडा बस आगार समस्यांच्या विळख्यात

## प्रवाशांचे हाल, खाजगी ट्रॅव्हल्सचा मुक्त संचार, प्रशासनाचे दुर्लक्ष

**अचलपूर/वार्ताहर**
दिवाळीचे सुट्टी संपल्याने आज परतवाडा बस आगारात बाहेरगावी जाण्यासाठी प्रवासी वर्गाची सकाळपासूनच मोठी गर्दी होती. पण अमरावती, अकोला, दर्यापूर, मोर्शी आदी विविध ठिकाणी प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या बस फेऱ्यांची संख्या कमी होत असल्याने याचा फटका मात्र प्रवाशांना सहन करावा लागला.

यामुळे प्रवाशांना बसच्या प्रतीक्षेत तासनतास उभे राहावे लागत आहे. एकीकडे परतवाडा बस आगाराच्या परिसरात घाणीचे साम्राज्य सुद्धा पसरल्याने प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यासोबत परतवाडा बस स्थानकाच्या प्रवेशद्वारासमोर सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने चक्क खाजगी ट्रॅव्हल्स २०० मीटर परिसरातच उभी करतात. याचा आर्थिक फटका महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला बसत आहे. गेल्या अनेक वर्षापासून परतवाडा बस आकाराच्या परिसरात २०० मीटर आत मध्ये खाजगी ट्रॅव्हल्सला बंदी असताना सुद्धा खाजगी ट्रॅव्हल्स चालक आपल्या मनमर्जीप्रमाणे चक्क व बस स्थानकाच्या प्रवेशद्वारा समोरच वाहने उभी करतात आणि प्रवाशांची पळवा पळवी करतात. याबाबत अनेक तक्रारी करून सुद्धा परतवाडा बस आगाराचे आगारप्रमुख दुर्लक्ष करीत असल्याने प्रवाशी वर्गात नाराजीचा सूर उमटत आह. त्यासोबत





सीसीटीव्ही कॅमेरे परतवाडा बस आगार मध्ये व बाहेरच्या परिसरात कधी लावणार? हा प्रश्न सुद्धा निर्माण झालेला आहे. या सर्व बाबीमुळे परतवाडा बस आगार हे विविध समस्यांचे माहेरघर बनलेले आहे. या समस्या सोडवण्यासाठी परतवाडा बस आगार प्रमुख ठोस कारवाई करणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बलिप्रतिपदेच्या दिवसी किसान सभेचे सोयाबीन ओतो आंदोलन

# शासनाने सोयाबीनची खरेदी हमी भावाने करावी

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**
अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने गावा-गावात चौका-चौकात सोयाबीन ओतो'' आंदोलनाची राज्यव्यापी हाक दिली त्याचाच एक भाग म्हणून नांदगाव खंडेश्वर शहरातील मुंगसाजी चौकात किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांनी आणलेली सोयाबीन जमिनीवर ओतून राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा धिक्कार केला. त्याचबरोबर इडा पिळा टळू दे, बळीचे राज्य येऊ दे, या घोषणा देवून शेतकऱ्यांचा राजा सम्राट बळीराजाचा गौरव दिन साजरा



करण्यात आला.

सरकारने हमीभावाने सोयाबीन ५३२८ रुपये व कापूस ८१०० रुपये क्विंटल दराने, शासकीय खरेदी केंद्र सुरू करावेत, यासाठी सोयाबीन ओतून आंदोलन करण्यात आले. शासनाने सरकारी सोयाबीन खरेदी केंद्र सुरू न केल्यामुळे सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना एकरी १०००० ते १२००० हजार एकरी तोटा सहन करावा लागत आहे. फडणवीस सरकारची भूमिका शेतकरी विरोधी असून त्यांचा गगनभेदी घोषणाबाजी करत धिक्कार करण्यात आला. यावेळी किसान सभेचे जिल्हा सचिव, शाम शिंदे, माजी युवासेना नेते प्रकाश मारोटकर, काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष अक्षयभाऊ पारसकर, तालुका अध्यक्ष, दिलीप महल्ले, वईद खा पठाण, शत्रुघ्न मगर, मोहसिन शेख, राजीक शेख, बापूजी सुने, ज्ञानेश्वर शिंदे, दिनेश बावणे, किशोर मसराम, सुरज लोमटे, राजेंद्र राऊत, दीपक अंबाडरे, चैतन्य साळवन, गणेश बरगट यांचे सह आदी शेतकरी बांधव उपस्थित होते.

# प्रमोद पोकळे व संघाची राज्यस्तरीय भजन स्पर्धेसाठी निवड

**अमरावती दि. २२ :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, अमरावती गटाच्या वतीने ललित कला भवन, छाबडा प्लॉट, अमरावती येथे अकोला विभागाच्या अतिरिक्त सहा. कल्याण आयुक्त वैशाली नवघरे तसेच अतिरिक्त कामगार कल्याण अधिकारी सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गटस्तरीय पुरुष भजन स्पर्धा नुकतीच सोत्साह संपन्न झाली. या स्पर्धेत ललित कला भवन, अमरावती, कामगार कल्याण केंद्र, गांधी चौक अमरावती, राधानगर अमरावती, शेगाव नाका अमरावती, नवीवस्ती बडनेरा, संभाजीनगर अचलपूर, दिग्रस, मूर्तिजापूर, जयभारत चौक, यवतमाळ इत्यादी एकूण ९ केंद्रांतील भजनी संघांमधून बडनेरा नवीवस्तीच्या कामगार कल्याण केंद्रातील प्रमोद पोकळे व संघाने विजयाची परंपरा राखत प्रथम क्रमांक मिळवून उत्तुंग भरारी मारली. प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या या बडनेऱ्याच्या प्रमोद पोकळे व संघाची २९ व ३० जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय भजन स्पर्धेसाठी निवड झाली असून, या संघात मुख्य गायक म्हणून प्रमोद पोकळे तर तबलावादक प्रज्वल वांगे व निलेश रुमणे, पखवाजवादक निलेश बिरहा, वीणेकरी प्रवीण रुमणे आणि टाळ व सहगायनाच्या साथीला राजेंद्र इंगोले, गणेश खंडार, सुभाष सुने, सुनील तायडे, राजेश टारपे, मनोज संभे, विजय दारोकार, प्रज्वल हिरडे व अरविंद अंबाडकर यांचा समावेश आहे. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ चारुदत्त चौधरी, गुणवंत कामगार पुरस्कृत यांचे अध्यक्षतेखाली तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मंगेश मनोहरे, अजय लोंढे, भास्कर ढवळे व स्पर्धेचे परीक्षक प्रदीप गवळीकर, प्रा. मनोज विंचूरकर, विद्याताई जायले तसेच अमरावती गटाचे अतिरिक्त कामगार कल्याण अधिकारी सुनील चव्हाण आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, मान्यवरांचे स्वागत व निकाल वाचन अतिरिक्त कामगार कल्याण अधिकारी

# राष्ट्रसंताच्या पुण्यतिथी महोत्सवात चहा-बिस्कीटचे वाटप



**गुरुकुंज मोझरी-** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी निमित्त गुरुकुंजात दाखल झालेल्या अनेक पालखीचे स्वागत करून गुरुदेवभक्तांना चहा-बिस्कीटचे वाटप करण्यात आले.


गुरुकुंज मोझरी येथे डी अॅड कॉलेज जवळ मोझरी दासटेकडी गुरुकुंज-आश्रम या पालखी मार्गाने येणाऱ्या शेकडो पालखी व गुरुदेवभक्तांना डीएड कॉलेज जवळ गुरुदेवनगर येथे भव्य असे पालखीचे स्वागत करण्यात आले व त्यांना चहा,पाणी व बिस्कीट वाटप करण्यात आले. या उपकरणात शेजार धर्म ग्रुप मधील डॉ. विजय नाकाडे,चैतन्य कानेटकर,सुरज बोबडे, किरण बानते, दिनेश महल्ले,वैष्णव पोहकर,गजानन पांडे, नरेंद्र पाटील, समीर लांडगे, आशिष कानेटकर, सर्वेश कानेटकर व महिला मधून पालखी चे पूजन सविता बानते,रुपाली महल्ले, राखी कानेटकर, नीता बोबडे, प्रतीक्षा पोहरकर, सुलोचना धंदर, मोहिनी लांडगे, नंदा धस्कट, ईशा बानते, प्रेरणा गवळी आदींनी परिश्रम घेतले.

# देवांग कोष्टी विकास परिषदेचे शनिवारी आयोजन

## मान्यवरांच्या प्रबोधनासह समाजभूषणांचा सत्कार

**अचलपूर/वार्ताहर**
देवांग कोष्टी विकास परिषद, अचलपूर शहरच्या वतीने समाज प्रबोधन स्नेहमिलन व समाजभूषण सत्कार सोहळा २६ ऑक्टोबर २०२५ रविवार रोजी सकाळी १०.०० वा. अनिल इन मंगलम अॅण्ड लॉन अष्टमासिध्दी मंदिराजवळ अमरावती रोड अचलपूर येथे आयोजीत करण्यात आलेला आहे.

देवांग कोष्टी समाजाचे धर्मगुरु प.पु. श्री दयानंदपुरी महास्वामीजी (श्री गायत्री पीठ हम्पी, हेमकुट, कर्नाटक यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. स्वामीजींनी बैंगलोर येथील कैलास आश्रमात १२ वर्षे धार्मिक, अध्यात्मिक व पारंपारिक शिक्षण घेतले. स्वामीजी बालब्रम्हचारी आहेत. ते गेली ३५ वर्षापासून निरंतर सामाजिक व धार्मिक कार्य करीत आहेत. त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजाला अर्पण केले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू, माजी राज्यमंत्री महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते होणार आहे. विशेष अतिथी अरुणभाऊ वरोडे, अध्यक्ष अखिल भारतीय देवांग, देवांगन कोष्टी- कोष्टा फेडरेशन पुणे आणि सतिशभाऊ दाभाडे, अध्यक्ष महाराष्ट्र कोष्टी समान परिषद नागपूर म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान कैलास विठ्ठलराव टापरे, अध्यक्ष देवांग कोष्टी विकास परिषद अचलपूर तथा अध्यक्ष देवांग सार्वजनिक वाचनालय अचलपूर हे भूषविणार आहेत कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. मंदा माणिकराव नांदुरकर, मराठी विभाग प्रमुख मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती आहेत.डॉ. मंदा नांदुरकर उच्च विद्याविभूषीत असून त्यांचे असंख्य शैक्षणिक व साहित्यिक सामाजिक कार्य



आहे. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशीत झालेली आहे. श्रीलंका, तुर्कस्थान, दक्षिण कोरिया, थायलंड, नेपाळ या देशात आंतरराष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहिल्या आहेत. समाजातील गणमान्य व्यक्ती प्रमुख अतिथी, प्रमुख उपस्थिती म्हणून आमंत्रीत आहेत. या प्रसंगी समाजातील गरजू बांधवांना मदत करुन समाज सेवेचे कार्य करणाऱ्या समाज बांधवांचा समजभूषण म्हणून सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला संपूर्ण देशातून समाज बांधव उपस्थित राहणार असून अचलपूरात समाज बांधवांची मांडीयाळी ही राहणार आहे.

समाज बांधवांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून प.पु. श्री दयानंदपुरी महास्वामीजी यांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा तसेच समाज प्रबोधन स्नेहमिलन, समाजभूषण सत्कार सोहळयास उपस्थित राहावे अशी विनंती आयोजक समितीचे सदस्य सुदाम मुगल, राजेश राखोंडे, सुधाकरराव सदाफळे, अनिल राखोंडे, निळकंठ दलाल, उत्तमराव मुगल, सुनिल सदाफळे, केशवराव कराळे, गोपाल भूरके, गोपाल तिडके, नरेंद्र तिडके, धनराज दलाल, अरुण सदाफळे, यशवंत खुंटे, सुरेश राखोंडे, कविश्वर उघडे, अनिल तिडके, भूषण फिसके यांनी केली आहे.

# आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी शुक्रवारी विशेष शिबिर

**अमरावती/का.प्र.**
ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत दावा न केलेल्या आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी विशेष जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन २४ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. हे शिबिर दुपारी २ वाजता अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मुख्य इमारतीत पार पडणार आहे.

या शिबिरात खातेदारांच्या १० वर्षाहून अधिक कालावधीपासून दावा न केलेल्या ठेवींबाबत निराकरण करण्यात येणार असून, संबंधित ग्राहकांच्या तक्रारींचेही निवारण होणार आहे. अमरावती जिल्ह्यातील सर्व बँका या शिबिरात सहभागी होणार असून, नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी केले आहे.वित्तीय सेवा विभाग आणि राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्या निर्देशानुसार हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, नामनिर्देशित आणि पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या ठेवी परत मिळवण्याची संधी यातून मिळणार आहे.

'ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी'मध्ये अशा ठेवी हस्तांतरित केल्या जातात ज्या ठेवींवर १० वर्षाहून अधिक काळ दावा केलेला नसतो. मात्र, खातेदारांना या ठेवी परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार असून, नागरिकांनी या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# सरिता तिवारी यांचे निधन

**अमरावती** -यमुना हाऊसिंग सोसायटी, निभोंरा येथील रहिवासी सरिर्ता अजय तिवारी (वय ५० वर्षे) यांचे अल्प आजाराने निधन झाले.



त्यांच्या निधानाने परिसरात शोककळा पसरली आहे.त्यांच्या पश्चात पती अजय तिवारी, मुलगा, मुलगी असा आप्त परिवार आहे. अंत्यविधी त्यांच्या निवासस्थानी श्रद्धांजलीसाठी नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते.

# वाघदेवाची पारंपरिक पूजा उत्साहात

**अमरावती-** वाघबारसच्या औचित्याने आदिवासी कोळी महादेव जमातीच्या आराध्य दैवत वाघोबा (वाघदेव) याची पारंपरिक पूजाआर्चा उमेश महादेवराव ढोणे यांच्या हस्ते, पारंपरिक आदिवासी वाद्यांच्या मंगल निनादात झाली.

ही पूजन प्रक्रिया आदिवासी समाजाच्या धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक परंपरा आणि निसर्ग पूजक दृष्टिकोनाचे प्रतीक ठरली आहे. पारंपरिक वाद्य वाजवत, समर्पित भावनेने साजऱ्या झालेल्या या सोहळयाने आदिवासी संस्कृतीचे रूढी परंपरा चे जतन व संवर्धन साधले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने आदिवासी बांधव व मान्यवर




उपस्थित होते. पूजनानंतर धार्मिक विधीसह सामाजिक एकोपा व संस्कृतीचा वारसा जतन करण्याविषयी माहिती देण्यात आली.

# बारावीनंतर विद्यार्थ्याची विद्यापिठातूनच मतदान नोंदणी व्हावी

## एमएच २७ एटीएस ग्रुपची निवडणूक आयोगाला विनंती

**अमरावती/का.प्र.**
राज्य उच्च माध्यमिक बारावीची परीक्षा पूर्ण झाली असल्याने आणि १८ वर्षांच्या वयाची संपूर्ण माहिती, ज्यामध्ये नाव, पत्ता, फोटो आणि मोबाईल क्रमांक यांचा समावेश आहे, विद्यापीठामार्फत उपलब्ध असल्याने, निवडणूक आयोगाने ही माहिती निवडणूक आयोगाकडे पाठवावी आणि १८ वर्षांच्या वयापर्यंत पोहोचलेल्या मतदारांची थेट मतदार म्हणून नोंदणी करावी अशी विनंती निवडणूक आयोगाने करावी. प्रमोद पांडे, छाया किशोर कडू, संध्या अवसरे, संगीता गजभिये, अंजली पांडे, प्रा. समीर गुल्हाने आणि प्रा. प्रवीण गुल्हाने यांनी राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयुक्त, मुख्यमंत्री, राज्यपाल, पंतप्रधान आणि राष्ट्रपती, जिल्हा दंडाधिकारी आणि विभागीय आयुक्तांमार्फत करावी अशी विनंती केली आहे. बारावीच्या निकालानंतर सरासरी ९९ टक्के विद्यार्थ्यांनी मतदार होण्यासाठी आवश्यक असलेले मूलभूत पात्रता निकष, म्हणजेच १८ वर्षे वय, आधीच पूर्ण केले आहेत.

याव्यतिरिक्त, मतदार नोंदणीसाठी आवश्यक असलेली सर्व माहिती, ज्यामध्ये फोटो, आधार कार्ड, मोबाईल नंबर, पूर्ण नाव आणि पत्ता आणि इतर माहिती समाविष्ट आहे, संबंधित बोर्ड किंवा विद्यापीठाद्वारे सहज उपलब्ध आहे.

आजच्या ऑनलाइन, मोबाईल जगात, सरकार, प्रशासन आणि निवडणूक आयोगाला या सहज कामासाठी लाज, पैसा, वेळ, मनुष्यबळाची आवश्यकता नाही.

विनंतीमध्ये असे म्हटले आहे की उपलब्ध डेटा वापरून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आणि मतदाराचे ओळखपत्र मतदाराच्या घरी पोस्ट करणे हे एकमेव काम उरले आहे.

प्रमोद पांडे, प्रवीण गुल्हाने, छाया कडू, संध्या अवसरे, अंजली पांडे, संगीता गजभिये, वंदना भाटकर, जोशी, निंभोरकर, मिलिंद सराफ, मेश्राम, गायगोले, दाते, माधुरी चौधरी, संगेले, पवार, अंजली आदींसह शेकडो MH27 ATS सदस्य. केणे, तायडे, गायकी, बदनखे, आकोडे, भोयर, नाकील, देशमुख, फुसे, बिजवे, राऊत, वाघ, ठाकूर, अग्रवाल, राणे, बिडकर, यादव, देशपांडे, धाजेकर, पाठक, गुंबळे, पाल, कुपटे, गुप्ता, गुप्ता, बिवेकर, आदींनी पुढील कारवाई करावी, अशी विनंती वरसागर, कश्मीर आदींनी केली आहे. वैयक्तिकरित्या आणि ईमेलद्वारे सबमिट केलेल्या विनंत्यांवर.

# विदर्भ महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी ग्रीष्मा तट्टे यांची निवड

## खानापूरवासियांकडून भव्य सत्कार

**अचलपूर/वार्ताहर**
येत्या २६ ऑक्टोबर पासून २ नोव्हेंबर पर्यंत बीसीसीआय तर्फे आयोजित महिला अंडर १९ ट्वेन्टी ट्रॉफीसाठी विदर्भ महिला क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी निवड झालेली अचलपूर तालुक्यातील खानापूर तट्टे नगर येथील ग्रीष्मा गोविंद तट्टे या खेळाडूचे खानापूर येथील ग्रामस्थांनी शाल श्रीफळ देऊन भव्य दिव्य सत्कार केला.

यावेळी उपस्थित ग्रामस्थ वरिष्ठ मंडळी व भाजपा किसान मोर्चाचे सरचिटणीस अंकुश घुलक्षे यांनी ग्रीष्मा तट्टे यांना



पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. ग्रीष्मा तट्टे ही विदर्भ क्रिकेट महिला संघाचे नेतृत्व करीत आहे. ही स्पर्धा आता कटक येथे आयोजित करण्यात आली आहे.नुकतेच कु.ग्रीष्मा तट्टे ही कुटुंबासह खानापूर तट्टे नगर मध्ये नातेवाईकांच्या भेटीसाठी आली होती. अमरावती येथे शिक्षण घेऊन लहानपणापासूनच क्रिकेटची प्रचंड आवड असल्याने क्लबच्या माध्यमातून विदर्भ क्रिकेट असोसिएशन मध्ये कुमारी ग्रीष्मा तट्टे हीची निवड झाली आहे आणि उत्कृष्ट क्रिकेट टीमचे सदस्यांची आखणी ,बॅटिंग, फिल्डींग मध्ये वेगळा ठसा निर्माण केल्याने कुमारी ग्रीष्मा तट्टे या तरुणीला कटक येथे येत्या २६ ऑक्टोंबर पासून होणाऱ्या महिला अंडर १९ ट्वेन्टी ट्रॉफी साठी कर्णधार पदाची मोठी जबाबदारी दिलेली आहे. या टीम मध्ये एकूण १६ सदस्य राहणार आहे .अचलपूर तालुक्यातील खानापूर तट्टे नगर येथील कु.ग्रीष्मा ग्रीष्मा यांची विदर्भ क्रिकेट महिला संघाच्या कर्णधार पदी निवड झाल्याने हे अचलपूर तालुक्यात साठी नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे .यावेळी भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अंकुश घुलक्षे व अवंती तट्टे,वल्लरी तट्टे, राजेंद्र घुलक्षे, किशोर तट्टे, प्रभाकर तट्टे, दामोधर घुलक्षे, मनोहर घुलक्षे, श्रीनाथ तट्टे,श्रीरंग तट्टे,मांधाता तट्टे, सुमंत तट्टे, गोविंद तट्टे आदी उपस्थितीत होते.

# माजी जिल्हाप्रमुख तसेच तालुका प्रमुख राजू पांडे यांचा शिवसेनेत प्रवेश

**अंजनगाव बारी** -शिवसेना पक्षाच्या संघटनात एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, राजु पांडे शिवसेना उद्धव ठाकरे गट माजी उपजिल्हाप्रमुख धामणगाव रेल्वे तसेच तालुका प्रमुख चांदुर रेल्वे यांनी आज अधिकृतरीत्या शिवसेना मध्ये जाहीर प्रवेश केला आहे. हा प्रवेश सोहळा सह संपर्क प्रमुख शाम देशमुख व जिल्हा प्रमुख आशिष धर्माळे यांच्या नेतृत्वाखाली अत्यंत उत्साहात पार पडला.

या प्रसंगी शिवसेनेचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामपातळीवरील जनतेची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाची



पार्श्वभूमी राजू पांडे हे दीर्घकाळ स्थानिक राजकारणात सक्रिय राहिले असून, त्यांनी संघटन बांधणीसाठी आणि कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवण्यासाठी केलेल्या कामगिरीमुळे त्यांचा जनाधार मजबूत आहे. त्यांच्या प्रवेशामुळे जिल्हा आणि तालुका स्तरावर शिवसेनेला नवे बळ मिळाले आहे. या कार्यक्रमास अनेक स्थानिक पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, व ग्रामपातळीवरील कार्यकर्ते उपस्थित होते. प्रवेशानंतर सर्वांनी जल्लोषात घोषणाबाजी करत राजु पांडे यांचे स्वागत केले.

# आनंदाची देवाणघेवाण करणारा सण

**गे**ल्या तीन दिवसांपासून सुरु असलेला दीपोत्सव भाऊबीजेने समाप्त होईल. संपूर्ण समाज ज्यावेळी एकाच उत्सवामध्ये समरसून सहभागी होतो. किंवा जो उत्सव समाजाला खऱ्या अर्थाने सदभावनां बरोबरच सुखसमृद्धीचे आणि समाधानाचे वरदान देतो. अशा उत्सवाची महती तितक्याच मुक्तकंठाने गायली गेली पाहिजे. असा एकमेव उत्सव म्हणजेच दीपोत्सव असतो. कोणत्याही देवाची किंवा मूर्तीची प्रतिष्ठापना, आराधना, आरती, प्रसाद किंवा स्थापना विसर्जनाची कोणताही उपचार नसलेला हा एकमेव उत्सव म्हणता ईयोल. संपूर्ण सृष्टी ज्या प्रकाशाने आपल्या सजीवतेचा आनंद उपभोगतो. प्रकाशोत्सव करून पूजा करण्याचा अनोखा उपक्रम ठरतो. ज्याला आपण ज्योतीने तेजाची आरती असेच म्हणता येऊ शकेल. संपूर्ण सृष्टीची निर्मिती तेजातून झाली आहे. आणि प्रकाश हेच तिच्या अस्तित्वाचे सर्वात मोठे चिन्ह आहे. आणि त्यातून व्यक्त होणारा चैतन्याचा अनुभव प्रत्येकजण घेत असल्याने त्या चैतन्यरुपी प्रकाशाची अतिशय वेगळ्या पद्धतीने केली जाणारी आराधना खरोखरच समजून घेण्यासारखी आहे.

दीपावलीविषयी अनेक प्रकारे लिखाण झालेले आहे. वसुबारस ते भाऊबीज या पाच दिवसांची शृंखला औचित्यातून उदात्ततेचे दर्शन घडवतात. संपूर्ण सृष्टी एक पंचमहाभूतांचा समुच्चय आहे. पृथ्वी, पाणी, तेज, वायू, अग्नी यांच्या संयोगाने या सृष्टीचे चलनवलन होते. कदाचित त्या पंचमहाभूतांचा एकत्रित प्रभाव या पाच दिवसांमध्ये निर्माण होत असतात. म्हणूनच गायीच्या पूजेपासून ते भाऊबीजेला यमद्वितीयेचे निमित्त साधून काही ना काही संदेश देण्याचा प्रयत्न केला गेलेला दिसून येतो. आजच्या पाडव्याला श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वताची पूजा केली. गोकुळातले लोक इंद्राला नैवेद्य दाखवत होते. त्याऐवजी कृष्णाने जो गोवर्धन पर्वत तुम्हा सर्वांचे संरक्षण करतो. त्याला तुम्ही नैवेद्य दाखवा असे आवाहन केले. या अपमानाने संतप्त झालेल्या इंद्राने धो धो पाऊस पाडला पण कृष्णाने एका करंगळीवर तो गोवर्धन पर्वत उचलला आणि सर्वांना आश्रय प्राप्त करून दिला. जगाचे पालन करणाऱ्या कृष्णाची गोकुळवासीयांच्या मनात निर्माण झालेली भावना हा पुराणकथेतला भाग असला तरीदेखील पंचमहाभूतांशी संबंधित पाडव्याचा हा दिवस केवळ योगायोगही म्हणता येणार नाही तर तो भारतीय संस्कृतीने जाणीवपूर्वक सणांच्या शृंखलेत गुंफलेला दिवस ठरतो.

भाऊबीजेला यमद्विती याही म्हटले जाते. यम आणि यमी ही जोडी पुराणकाळापासून कथांच्या रूपाने लोकांपर्यंत पोहोचले.यमी ही यमाची बहिण असते. आणि हा यम तिच्या घरी जाऊन तिला भेटवस्तू देतो. बहिणीने केलेले औक्षण म्हणजेच संकटांना दूर करणारे मानले गेले.



भाऊबीजेला ज्याप्रमाणे गरीब, श्रीमंत असो. परंतु प्रत्येक भाऊबहीण आपल्या या प्रेमाचा वर्षाव एकमेकांवर करीत असतात. सगळ्या प्रकारच्या सुखदुःखांना विसरून केवळ भाऊबहिणीच्या प्रेमाचा इतका उदात्त अविष्कार जगातल्या कोणत्याही संस्कृतीत पाहायला मिळत नाही. तसे बघितले तर एकूणच दीपावलीचा हा सर्व प्रकारच्या मतभेदांना बाजूला सारून सर्वांना एकत्र आणणारा त्याहीपेक्षा केवळ आनंदाची देवाणघेवाण करणारा एकमेव सण ठरतो. कोणतेही कर्मकांड किंवा औपचारिकता न ठेवता स्वतःच्या आनंदामध्ये इतरांनाही सहभागी करून घेण्याचे वैशिष्ट्य दीपोत्सवातून जपले गेलेले पाहायला मिळते.

वर्षभर आपल्याला व्यवसाय, नोकरीमध्ये व्यस्त असणारा माणूस अनेक किंवा काळजी किंवा काही ना काही निराशेने ग्रासलेला असतो. परंतु दिवाळीच्या या पाच दिवसाच्या सणात तो या सर्व गोष्टींना अक्षरशः हद्दपार करतो. किंबहुना या पाच दिवसात कोणत्याही निराशेला तो जवळ फिरकू देत नाही. या प्रसन्न वातावरणामध्ये नकळतपणे प्रत्येकाला आत्मविश्वासही तितक्याच वेगळ्या पद्धतीने व्यक्त होत राहतो. या मुद्याचा जर विचार केला तर काहीसा निःसंगपणे तेवत राहणारा दिवा जसा अंधाराला आपल्या सभोवताली फिरकू देत नाही आपल्याच ताकद आणि क्षमतेनुसार तो अंधाराला दूर सारत असतो. अशा केवळ तेवत राहण्याचा वसा घेतलेल्या दिव्याचा प्रकाश हेसुद्धा आत्मविश्वासाचे प्रतिक होऊन जातो. प्रकाशापासून मिळणारी ही प्रेरणा नव्या उमेदीचे आंदण देतो. म्हणजे दरवर्षी जवळपास त्याच पद्धतीने साजरा होणारा हा दिवाळीचा सण कितीतरी नव्या नव्या उत्साहाने आत्मविश्वासाने प्रकट होतो. किंवा अभिव्यक्त होत राहतो.

आजचे जग खूप सुशिक्षित आहे असे नेहमीच सांगितले जाते. अनेक प्रकारचे शोध लागल्यामुळे आजचा माणूस विशेष प्रगत मानला जातो. तो मागासलेला नाही. तो आधुनिक म्हटला जातो त्याची विचार करण्याची क्षमता ही प्राचीन काळातल्या माणसांपेक्षा अधिक श्रेष्ठ दर्जाची असल्याचे आपण कौतुकाने म्हणवून घेत असतो. परंतु भारतीय संस्कृतीच्या प्राचीनतेमध्ये दडलेल्या या सणवारांच्या विद्देचा अभ्यास केला तर आजचा माणूस अजूनही किती निर्बुद्ध आहे याचीच प्रचिती येईल. आपल्या सभोवतालच्या प्रतिकांमध्ये प्रेरणांचा शोध घेणारा त्या प्रतिकांमधून ध्यासाची संकल्पना सांगणारा आणि मग साधारण वाटलेल्या दिव्याच्या प्रकाशाबरोबरच आत्मविश्वास जागवणारा भारतीय संस्कृतीचा विचार किती मनोज्ञ होता याची खात्री पटल्याशिवाय राहात नाही. आजचे विज्ञान युग आहे. माणूस सर्व दृष्टीने सुखी होऊ पाहत आहे. पण या सुखाला मनःशांती आणि समाधानाची जोड नसेल तर ते सुख दुःखालाच आमंत्रण देणारे वाटू लागते. भारतीय संस्कृतीने ज्ञान आणि आत्मज्ञानाला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. आणि या दोघांमधूनच सुख आणि समाधानाची प्राप्तीही करून दिली. खरे तर एक विलक्षण अशा आध्यात्मिकतेचा वसा सगळ्या जगालाच देण्याचे श्रेय भारतीय संस्कृतीकडे जाते. म्हणूनच दिपावलीसारखे सण उत्सव साजरे करीत असतात.

**मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

# बलिप्रतिपदेमागील गैरसमज आणि व्यापक दृष्टिकोन

**का**र्तिक शुद्ध प्रतिपदेस बलिप्रतिपदा असे म्हटले जाते. या दिवसाला पाडवा म्हणूनही संबोधले जाते. या दिवसापासून व्यापाऱ्यांचे नवीन वर्ष सुरु होते त्यामुळे या हिशोबाच्या नवीन वह्यांचे पूजन करण्याची प्रथा आहे. याच दिवशी सवाष्ण स्त्री आपल्या पतीचे औक्षण करते. या दिवशी माता पार्वतीने भगवान शंकराला द्यूत खेळात पराभूत केले होते त्यामुळ? या दिवसाला द्यूत प्रतिपदा असेही म्हटले जाते. बालिप्रातिपदेमागील पौराणिक कथा आपणा सर्वांनाच ठाऊक आहे. भक्त प्रल्हादाचा नातू आणि विरोचनाचा पुत्र बली हा असुरांचा राजा होता. राक्षसकुळात जन्म घेऊनही तो स्वार्थांध आणि मदांध नव्हता. प्रजाहितदक्ष आणि दानशूर राजा म्हणून त्याची त्रिलोकात कीर्ती होती. त्याच्याकडे आलेली कोणतीही व्यक्ती रिकाम्या हाताने परतत नसे. बली राजा जितका चारित्र्यवान आणि दानशूर होता तितकाच तो शूरवीर होता. शौर्याने त्याने देवांनाही पराभूत केले. लक्ष्मीसह त्याने देवांना बंदी केले होते. त्याच्याकडे आलेल्या अतिथीला तो मागेल ते दान देत असे परिणामी त्याच्या या दानशूरतेचा अनेक जण गैरफायदा घेऊ लागले. धर्मशास्त्रानुसार दान हे नेहमी सत्पात्रे असावे. चुकीच्या माणसाला दान केले तर तो संपत्तीमुळे उन्मत्त होऊ शकतो, आयत्या मिळालेल्या संपत्तीचा दुरुपयोग करू शकतो. ज्याचे पातक दान करणाऱ्यालाही लागते. बळीराजाच्या बाबतीतही असेच झाले,

एकदा बळीराजाने एका यज्ञाचे आयोजन केले होते. यज्ञानंतर दानधर्म केला जातो. भगवान श्री विष्णूने



मुंजा मुलाचा म्हणजेच वामनावतार धारण केला. 'ॐ भवति भिक्षां देही ।' म्हणत वामनाने बलीराजाकडे भिक्षा मागितली. बळीराजाने "काय हवे ?" विचारल्यावर वामनाने त्रिपाद भूमीदान मागितले. 'वामन कोण आहे आणि या दानामुळे काय होणार आहे याचे बळीराजाला भान नसल्याने त्याने लगेचच त्रिपाद भूमी वामनाला दान दिली. तत्क्षणी वामनाने विराटरूप धारण करून एका पावलाने संपूर्ण पृथ्वी व्यापून टाकली. दुसऱ्या पावलाने अंतरिक्ष व्यापले अन् त्याने "तिसरे पाऊल कोठे ठेवू ?", असे बलीराजाला विचारले. तिसरे पाऊल ठेवायला काहीच शिल्लक न राहिल्याने बली राजाने तिसरे पाऊल त्याच्या मस्तकावर ठेवण्यास सांगितले. त्याच्या या शरणागतीवर प्रसन्न होऊन वामनाने "तुला काही वर मागावयाचा असेल तर माग असे त्याला सांगितले. 'आता पृथ्वीवरील माझे सर्व राज्य संपणार आहे आणि आपण मला पाताळात घालविणार आहात, तेव्हा तीन पावले टाकण्याचे जे सर्व घडले, ते पृथ्वीवर प्रतिवर्षी तीन दिवस तरी माझे राज्य म्हणून ओळखले जावे अशी विनंती त्याने वामनाकडे केली. ते तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा. याला 'बलीराज्य' असे म्हणतात. ज्याला आपण दिवाळी म्हणतो. या दिवसांत ' 'इडा पीडा टळो आणि बलीचे राज्य येवो' अशी प्रार्थना केली जाते.

बली राजाच्या या पाताळ गमनाच्या कथेबाबत अनेकांच्या मनामध्ये गैरसमज आहेत. बली राजाच्या काळात समस्त जनता अत्यंत गुण्यागोविंदाने नांदत होती. सर्वत्र सुख समृद्धी होती. असे असतानाही श्रीविष्णूने घात करून बली राजाचा वध केला असा अपप्रचारही काही नास्तिक विचार सरणीच्या मंडळींकडून केला जातो. बली राजा हा दानशूर असला तरी त्याच्या दानशूरतेचा अनेकांनी अपलाभ करून घेतला. अपात्र लोकांच्या हाती संपत्ती गेल्याने त्या संपत्तीच्या बळावर त्यांनी इतरांना त्रास देण्यास सुरुवात केली. लोकांनी धर्माचरण करणे सोडून दिले. लोक मनाला हवे तसे वागत होते. सुखोपभोगांमध्ये लीन राहत होते, हे असेच चालू राहिले असते तर कालांतराने सृष्टीचे संतुलन बिघडले असते. परिणामी भविष्यात मोठे संकट ओढवले असते. बली राजाने देवी लक्ष्मीला बंदिस्त केले होते म्हणून त्याच्या कैदेतून देवीची सुटका करणेही महत्वाचे होते. बली राजाला रोखने क्रमप्राप्त असल्यानेच श्री विष्णूने मुंजा मुलाचे रूप धारण करून बली राजाला पातालात धाडले आणि त्याचा सार्वत्रिक उद्धार केला. राक्षस कुळात जन्माला येऊनही आज बली राजाची सर्वत्र पूजा केली जाते कारण दैत्यासुर असूनही बली राजामध्ये राक्षसाचे कोणतेच अवगुण नव्हते. त्याची वृत्ती अत्यंत सात्विक होती. म्हणूनच त्याने आपल्या प्रजेचा चांगला सांभाळ केला. आपल्या दानी आणि शौर्यामुळे त्याने तिन्ही लोकी लौकिक मिळवला. ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा केली त्यामुळेच त्याचा उद्धार करण्यासाठी श्री विष्णूंना अवतार घ्यावा लागला. श्री विष्णूंची त्याने कृपा संपादन केली. बली राजाला पाताळात धाडून श्री विष्णूंनी भोगविलासात मग्न झालेल्या जनतेला वास्तवात आणले. त्यांच्याकडून पापकर्म होण्यापासून त्यांना वाचवले. त्यामुळे वामनावतार घेऊन श्री विष्णूने बली राजावर अन्याय केला नसून त्याचा उद्धारच केला आहे.


बलीप्रतिपदेच्या दिवशी जमिनीवर पंचरंगी रांगोळीने बली आणि त्याची पत्नी विंध्यावली यांची चित्रे काढून त्यांची पूजा करतात. यानंतर बलीप्रीत्यर्थ दीप अन् वस्त्रे यांचे दान करतात. श्री विष्णूंनी बलीला दिलेल्या वचनानुसार दिवाळीतील या तीन दिवसांत यमदीपदान केल्याने अपमृत्यूचे संकट टळते. धर्माने वागणाऱ्याकडे श्री लक्ष्मी वास करते. आपण कोणत्या कुळात आणि कोणत्या परिस्थितीमध्ये जन्माला आलो आहोत या गोष्टी गौण आहेत. आपल्या कर्तृत्वाने आणि दातृत्वाने भगवंताची कृपा संपादन करता येते. जीवनाचा उद्धार करता येतो हीच शिकवण बलिप्रतिपदेची कथा आपल्याला देते.

**जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
९६६४५५९७८०

# भाऊबीजच्या निमित्ताने वृक्षारोपण

**ज्या**प्रमाणे बहीणीला भावाची गरज आहे. त्याचप्रमाणे आज पृथ्वी मातेला आपल्या सर्वांची गरज आहे. त्यामुळे भाऊबीज च्या निमित्ताने पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रत्येकांनी वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.बंधुत्व टिकून राहण्यासाठी भाऊबीज ओवाळणीचा कार्यक्रम कार्तिक पौर्णिमेपर्यंत चालतो. भारतीय संस्कृतीत संपूर्ण सणांना आगळे-वेगळे महत्व आहे.आठवीच्या सनापासुन दिवाळीची चाहूल सर्वत्र लागते आणि आठवड्याभरातच दिवाळीला प्रारंभ होतो व लक्ष्मीपूजन येते व संपूर्ण भारतात दिवाळीचा आनंद मोठ्या प्रमाणात दिव्याप्रमाणे प्रज्वलित होतो.लक्ष्मी पुजनानंतर कार्तिकला सुरूवात होते.कार्तिकच्या प्रथमेला बलिप्रतिपदा येते.आपण त्याला दिवाळीचा पाडवा म्हणतो, गाईगोधन,गोवर्धन पुजा अश्या अनेक नावांनी या सणाला महत्त्व देवुन पुजाअर्चना करतो.या दिवशी शेतकरी बांधव गाई-मशीची आंघोळ करून पुजाअर्चना करतात.कारण यामुळे मुक्या जनावरांमध्ये सुध्दा उत्साहाचे वातावरण निर्माण व्हावे हा सर्वांचा उद्देश असतो.कारण मानव कीतीही हुशार आणि बुद्धीजीवी प्राणी असला तरीही त्याला अनेक कठीण प्रसंगी मुक्या प्राण्याचा सहारा घ्यावाच लागतो.त्यांना मानव परिवारापासुन कदापी वेगळे करता येत नाही.कारण मानवांच्या आहारामध्ये सर्वात मोठा वाटा गाय,म्हैस इत्यादी सह अनेक प्राण्यांचा आहे. दही,दुध,तुप,लोनी आणि यापासून अनेक व्यंजन युक्त पदार्थ ही गाई-मशींच्याच दुधापासून बनत असतात.त्याचप्रमाणे गाई-मशीच्या शेणापासून खत तयार होते व यांचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होतो.म्हणजेच गाय,म्हैस किंवा अन्य पाळीव प्राणी हे आपल्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून व सुरक्षिततेच्या दृष्टीने ढालच आहे.मुक्या प्राण्यां मुळेच शेतीची मशागत होते व यातुनच अन्नधान्य निर्माण होते आणि आपल्या पोटाची खळगी भरते.कार्तिक व्दितीया म्हणजे भाऊबीज या सणाला भारतात आगळेवेगळे महत्व आहे.कारण भाऊ बहिणीपासुन कितीही दुर असला तरी या सणाचा कधीच विसर पडत नाही. भाऊबीजेला सर्वत्र अक्षवाणाचा कार्यक्रम होतो.परंतु भाऊ-बहिण जर काही कारणास्तव भाऊबीज या दिवशी जरी अक्षीद लावु शकली नाही तरी यांचे मीलन हे कार्तिक पौर्णिमेपर्यंत किंवा नागदिवाळीपर्यंत अक्षीद लावता येते.कारण बहिण-भाऊ यांचं नाते अतुट रहावे हाच यामागचा मुख्य उद्देश आहे व देवाने ओवाळणीचा कालावधी वाढविला असावा असे मला वाटते.

म्हणजेच भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणाला आगळीवेगळे महत्व अवश्य दिसून येते.कारण या संपूर्ण सणांवरून लक्षात येते की भारतीय संस्कृतीची एकच परीभाषा आणि उद्देश आहे तो म्हणजे बंधुत्व टिकून ठेवने.दिवाळी हा सण आला म्हणजे आपल्या बहिणीला किंवा सासरी गेलेल्या मुलीला आपल्या घरी दिवाळीला



आणण्याची प्रथा असते. म्हणून बहीण भाऊ यांचा सण म्हणजेच भाऊबीज असेही माणल्या जाते. आपण भाऊबीज हा सण मोठ्या प्रेमाने आणि उत्साहाने साजरा करतो यात दुमत नाही.परंतु बदलते हवामान व ग्लोबल वॉर्मिगमुळे वाढते प्रदुषण पहाता भाऊबीज या सणाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होने गरजेचे आहे. त्याचप्रमाणे भारतासह संपूर्ण जगात प्रदूषणाचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे व प्रदुषणाच्या बाबतीत भारत सध्या रेडझोनमध्ये आहे. परंतु मानव बुद्धीजीवी प्राणी आहे त्यामुळे यावर आपण च आवर घालू शकतो.याकरीता भाऊबीज या सणाचे औचित्य साधून बहीणीने भावाला व भावाने बहिणीला एकतरी झाड भेट दिले पाहिजे.यामुळे भाऊबीज हा सण साजरा होईलच परंतु बहीण-भावाच्या आगळ्यावेगळ्या नात्यांमध्ये झाडांसोबत सुध्दा प्रेम वाढेल आणि ही आठवण अनंत काळपर्यंत अबाध्य राहिल व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड झाल्याचे आपल्याला दिसुन येईल.यामुळे आपण अनेक जीव जंतू,पशु-पक्षी व मानव यांचे प्राण वाचवीसाठी मोठी मदत मिळेल.त्याचप्रमाणे पृथ्वीचे संतुलन टिकवण्यासाठी बहीण-भावाचा मोठा वाटा आपल्याला दिसुन येईल.भाऊ बहिणीचे पवित्र नातेसंबंध अतुट रहावे आणि रहाले पाहिजे.

कारण बहिण भावाला जेव्हा ओवाळते तेव्हा ईश्वराजवळ त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते व बीजेच्या कोरीप्रमाणे बंधुत्व टीकावे अशी अपेक्षा करते.भाऊबीजेच्या निमित्ताने बहिण भावाला व भाऊ बहिणीला वस्तूंच्या रूपात काहीतरी भेटवस्तू देत असते ती दिलीच पाहिजे सोबतच एक वृक्ष सुध्दा दिले पाहिजेत.कारण बहीण-भावाच्या पवित्र प्रेमाचा हा सण आहे.त्यामुळे सर्वांनीच वृक्षलागवडीकडे जातीने लक्ष द्यायला हवे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण प्राणीमात्रांना शुद्ध हवा,ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.निसर्ग सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित, पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवजंतू-पशु-पक्षी व आपण सुरक्षित हा मुलमंत्र भाऊबीज या निमित्ताने सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.या निमित्ताने निसर्गाचे संगोपन होईल हीच भाऊबीजेच्या निमित्ताने आग्रहाची विनंती. भाऊबीज निमित्त हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
९९२१६९०७७९

# एका प्रतिभासंपन्न अभिनय युगाचा अंत

आपल्या सहज सुंदर अभिनयाच्या जोरावर गेली अनेक वर्षे सिनेरसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे, 'असरानी' नावाने सिनेसृष्टीत विख्यात असलेले दिग्गज अभिनेते गोवर्धन असरानी यांच्या निधनाने एका प्रतिभासंपन्न अभिनय युगाचा अंत झाला. १ जानेवारी १९४१ रोजी राजस्थानच्या जयपूर येथे सिंधी कुटुंबात जन्मलेल्या असरानी यांनी १९६७ मध्ये गुजराती भाषेतल्या एका चित्रपटानंतर 'हरे कांच की चुडियाँ' या चित्रपटाद्वारे हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. मात्र त्यानंतरही त्यांना संघर्ष चुकला नाही. मात्र १९७० चे दशक त्यांना चांगलेच लाभदायी ठरले. 'कोशीश' (१९७२), 'बावर्ची' (१९७२), 'परिचय' (१९७२), 'नमक हराम' (१९७३) 'अभिमान' (१९७३), 'शोले' (१९७५), 'चुपके चुपके' (१९७५), 'मेहबुबा' (१९७६), 'पलकों की छाव में' (१९७७), बंदीश (१९८०) यासारख्या दर्जेदार कथानक असलेल्या चित्रपटांनी असरानी यांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्या काळात जवळ जवळ सर्वच चित्रपटात असरानी यांची लहानमोठी भूमिका असायचीच इतकी लोकप्रियता त्यांना लाभली होती. मात्र असे असूनही १९७४ मध्ये 'आज की ताजा खबर' आणि १९७७ मध्ये 'बालिका बधू' या चित्रपटातील त्यांच्या अभिनयासाठी त्यांना मिळालेले सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकाराचे दोन फिल्मफेअर पुरस्कार सोडले तर राष्ट्रीय पुरस्कारांच्या बाबतीत त्याची पाटी कोरीच राहिली.

**प्रदीप अनुसया शंकर मोरे**

■ गुरुवार, २३ ऑक्टोंबर २०२५
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखच

अकोला
जिल्हा विशेष

# आमदार मिटकरी यांच्या घराला शुक्रवारी घेराव : किसान ब्रिगेडचा इशारा

## सरकारने शेतक-यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप; मिटकरी म्हणाले - 'शेतक-यांचे स्वागत करीन'

■ प्रतिनिधी | अकोला ■

सरकारने जाहीर करूनदेखील दिवाळीपूर्वी शासकीय खरेदी केंद्र सुरू न केल्यामुळे सोयाबीन व कापसाचे भाव कोसळले असून व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट होत असल्याचा आरोप करत किसान ब्रिगेडने तीव्र भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता विधान परिषदेचे आमदार तथा सप्ताह रोड पक्षाचे नेते अमोल मिटकरी यांच्या आरोग्य नगर येथील निवासस्थानाला घेराव घालण्यात येणार आहे, अशी माहिती किसान ब्रिगेडच्या वतीने देण्यात आली आहे.



किसान ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे यांनी सांगितले की, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळणार असल्याचे सरकारने सांगितले होते. मात्र तसे झाले नाही. परिणामी शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात गेली असून, घरात असलेले थोडेफार सोयाबीनही व्यापाऱ्यांनी कमी भावात विकत घेतले आहे. 'सरकारने त्वरित हस्तक्षेप करून शेतकऱ्यांचे नुकसान थांबवावे, अन्यथा सत्तारूढ पक्षातील आमदारांना शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल,' असा सूचक इशारा त्यांनी दिला.

हिंगणा फाटा येथील चौकात सकाळी १० ते ११ या वेळेत शेतकऱ्यांनी जमावे, त्यानंतर आमदार अमोल मिटकरी यांच्या निवासस्थानाकडे मोर्चा नेण्यात येईल, अशी माहिती किसान ब्रिगेडचे अध्यक्ष दिवाकर गावंडे व कार्याध्यक्ष शरद वानखडे यांनी दिली. या आंदोलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रदीप पाटील गावंडे, भगवंतराव गवळी, राजेश मावळे, धनंजय मिश्रा, रामधन दामोदर, सिद्धार्थ तायडे, रवींद्र जंजाळ, दादाभाऊ पाथरीकर, दादा पाटील, प्रकाश काकड यांनी केले आहे.

जर आमदार अमोल मिटकरी यांच्या माध्यमातून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही, तर सत्तारूढ पक्षाच्या इतर आमदारांच्या घरावरही अशाच प्रकारे घेराव घालण्याचा कार्यक्रम अखंडपणे सुरू राहील, असा इशाराही किसान ब्रिगेडने दिला आहे.ष्दरम्यान, या आंदोलनाबाबत आमदार अमोल मिटकरी यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, 'शेतकरी माझ्या घरापर्यंत आपली मागणी घेऊन येत असतील, तर मी त्यांचे स्वागतच करीन.' तसेच शासकीय खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यासाठी सरकारी पातळीवर हालचाली सुरू असून, याबाबत आपले पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याशी बोलणे झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# केंद्रीय होमिओपॅथी अनुसंधान परिषदच्या सदस्यपदी डॉ. प्रवीण चौव्हाण

■ प्रतिनिधी | अकोला ■



केंद्रीय आयुष मंत्रालय अंतर्गत भारत भरातील होमिओपॅथी रुग्णालये, वैद्यकीय तज्ञ व महाविद्यालयांचे सुयोग्य संचालन करणाऱ्या केंद्रीय होमिओपॅथीक अनुसंधान परिषद नवी दिल्लीच्या सदस्यपदी महानगरातील होमिओपॅथिक तज्ञ डॉ प्रवीण जयाबेन बाबुभाई चौव्हाण यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. हा नियुक्ती आदेश केंद्रीय आयुष्य राजमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते व ज्येष्ठ उद्योजक व समाजसेवी रामप्रकाश मिश्रा यांच्या उपस्थितीत डॉ प्रवीण चौव्हाण यांना बहाल करण्यात आला. या अनुसंधान परिषदेत अध्यक्ष म्हणून केंद्रीय आयुष मंत्री, उपाध्यक्ष आयुष राजमंत्री, सचिव आयुष मंत्रालयाचे सचिव असून आयुष मंत्रालय व राष्ट्रीय होमिओपॅथी व्यवस्थाचे कार्यालयीन सदस्य व भारत भरातून होमिओपॅथी तज्ञ हे अशासकीय सदस्य म्हणून समाविष्ट करण्यात आले आहेत. यात राज्यातून होमिओपॅथीक तज्ञ डॉ प्रवीण चौव्हाण यांची नियुक्त या परिषदेत करण्यात आली आहे. एमडी होमिओपॅथी तज्ञ असणारे डॉ चौव्हाण हे १९९५ पासून होमिओपॅथी क्षेत्रात आपली सेवा देत असून गत तीस वर्षापासून जनता होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल येथे प्राध्यापक म्हणून ते सेवारत आहेत. त्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून २००९ साली एमडी होमिओपॅथीक ही पदवी प्राप्त केली आहे. डॉ चौव्हाण वंध्यत्व (इनफर्टिलिटी) केअर सेंटर व स्पेशल होमिओपॅथीक मेडिसिन या विषयाचे तज्ञ म्हणून परिचित असून ते श्री जनता एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी सदस्य म्हणून सेवारत आहेत.त्यांनी राज्य शासन अंतर्गत होमिओपॅथी महाविद्यालयाची तपासणी, परीक्षा आदी विषयात सेवा दिली आहे.यांनी राष्ट्रीय स्तरावरील विविध जिल्ह्यात वंधत्व निवारणावर व्याख्यान द्वारे जनजागरण करून होमिओपॅथीचे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व वैद्यकीय वर्गाला पावर पॉइंट सादरीकरण करून होमिओपॅथीच्या संदर्भात वंध्यत्वावर अविष्कार सादर केले आहेत.

# पाडव्याच्या निमित्ताने सामूहिक गोमाता पूजन सोहळा उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्ह्यातील शिवर येथील अतिशय प्राचीन व जागृत श्री हनुमान मंदिर संस्थान यांच्या विद्यमाने तसेच श्री दुर्गादेवी संस्थान, शिवर व्दारा संचालित श्री दुर्गादेवी गौरक्षण संस्थान, शिवर येथे पाडव्याच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सामूहिक गोमाता पूजनाचा धार्मिक सोहळा भक्तिभावात व उत्साहात श्री दुर्गादेवी गौरक्षण संस्थान शिवर येथे २२ ऑक्टोंबर २०२५ रोजी पार पडला.

या कार्यक्रमाला हभप श्रीकृष्ण महाराज मुरुमकार व हभप बळीराम महाराज दोड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच श्री दुर्गादेवी संस्थानचे अध्यक्ष जगदीश मुरुमकार, मनोहर तोंडे, रामदास खोबरखेडे, सदानंद मुरुमकार, आदी उपस्थित होते.

# पठान मराठी कोचिंग क्लासमध्ये बक्षीस व निरोप समारंभ उत्साहात संपन्न!



■ प्रतिनिधी | अकोला ■

येथील पठान सर मराठी कोचिंग क्लासमध्ये भव्य बक्षीस वितरण व मराठी भाषा प्रचार कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आमदार साजिद खान पठाण साहेब होते. त्यांच्या सोबत मोहम्मद इरफान साहेब प्रसिद्ध शाहीर नईम फराज मोहम्मद कमाल सिद्दिकी उर्फ पाशु भाऊ शेख अब्दुल्ला साहेब फैयाज खान साहेब आणि जमीर काझी सर उपस्थित होते.पठाण सर,कोचिंग क्लासचे संचालक मोहसिन पठाण सर विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत मेहनत घेत असून त्यांचा यशस्वी निकाल दिसून येतोय. विद्यार्थ्यांना मराठी लिहिणे, वाचणे व बोलणे आत्मविश्वासाने येत आहे.कार्यक्रमात मान्यवरांनी मराठी भाषा ही सर्वांसाठी अत्यंत गरजेची असून, मुस्लिम समाजाला मराठी भाषेचे ज्ञान घेणे आवश्यक आहे असे ठळकपणे सांगितले. त्यांनी मुस्लिम विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाच्या जनजागृतीचे महत्त्व अधोरेखित केले.विद्यार्थ्यांचा सत्कार व निरोप समारंभ देखील यावेळी पार पडला.

# भाजपात सुशांत बोर्डे यांचा प्रवेश; विजयाचा शंखनाद

## आमदार रणधीर सावरकर यांचे प्रतिपादन

■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत व नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष महायुती विजय मिळवणारच असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ट्रिपल इंजिन सरकार आणण्यासाठीची सुरुवात आज झाली आहे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर यांनी केले.

दिवाळीच्या गोवर्धन पूजेच्या शुभदिनी माजी जिल्हा परिषद सदस्य सुशांत साहेबराव बोर्डे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भाजपात प्रवेश करून विजयाचा नांदीचा शंखनाद केल्याचे सावरकर म्हणाले. भाजप कार्यालयात झालेल्या या प्रवेश सोहळ्याला आ. रणधीर सावरकर, खा. अनुप धोत्रे, जयंत मसने, संतोष शिवरकर, डॉ. शंकरराव



वाकोडे, राजेश बेले, प्रवीण हगवणे, संजय कोरडे, वैभव माहोरे, अनिल गावंडे, प्रशांत पांडे, मनीष गावंडे, माधव मानकर, देवाशिष काकड, प्रशांत ठाकरे, जयकुमार ठोकळ, विठ्ठल चतरकर, देवेंद्र देवर आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी सुशांत बोर्डे म्हणाले की, 'भाजप हा कार्यकर्त्यांचा आणि सामूहिक निर्णय घेणारा पक्ष आहे. विचारांसोबत विकासाचा संकल्प जोपासून कार्य करणाऱ्या या पक्षात प्रवेश करून आम्ही जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू.'

भाजप बहुजन महासंघातून माजी जि. प. सदस्य सुशांत बोर्डे यांच्यासह सदानंद बोर्डे, विजय देशमुख, सचिन बडोदे, बाळासाहेब बडे, मंगेश मोरे, दयाराम बोर्डे, विलास गावंडे, अनंत बोर्डे, बाबाराव गावंडे, प्रशांत काकडे आदी असंख्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या स्वागताचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

खा. अनुप धोत्रे यांनी या प्रसंगी सांगितले की, भारतीय जनता पक्ष आज सर्वसामान्यांचा पक्ष बनला असून आगामी निवडणुकांमध्ये भाजपा महायुतीला बहुमत मिळणार आहे. अनेक पक्षातील कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश घेण्यास इच्छुक असून कोर कमिटीच्या निर्णयानंतर आणखी मोठ्या प्रमाणावर प्रवेश होणार आहेत. कार्यक्रमाचे संचालन गिरीश जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन जयकुमार ठोकळ यांनी मानले.



'जिल्ह्यातील आगामी निवडणुकांच्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे सर्जिकल स्ट्राईकप्रमाणे प्रवेश घेत, विजय मिळवण्यासाठी व्यापक आखणी सुरू करण्यात आली आहे. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर सुरू झालेला हा प्रवास निश्चितच विजयाचा शंखनाद ठरेल.'

**आ. रणधीर सावरकर,**
अकोला पूर्व विधानसभा

# अथर्व मल्टिपर्पज फाऊंडेशनतर्फे वंचितांची सामाजिक दिपावली उत्साहात साजरी




■ प्रतिनिधी | अकोला ■

संपूर्ण भारतात सणांचा राजा असलेल्या दिपावली सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो अशा वेळी समाजातील वंचित, दुर्बल, पोटाची खळगी भरण्यासाठी भटकंती करणारे कुटुंब परीस्थिती हलाखीची असल्याने दिवाळी साजरी शकत नाहीत. त्याचे ही जीवनात दिवाळीचा आनंद भरण्यासाठी शहरातील अथर्व मल्टिपर्पज सेवा संस्था मागील चार वर्षापासून पुढाकार घेत असते. याचाच भाग म्हणून या वर्षी दिपावलीच्या पुर्व संध्येला स्व.अथर्व सीमा अनिल मुळे याचे पाचव्या स्मृती पित्यर्थ शहराच्या विविध भागात रस्त्याच्या कडेला पाल/राहुटी टाकुन राहणारे कुटुंबाचा शोध घेऊन त्यांचे झोपडीत जाऊन फराळांच्या थैल्याचे वाटप करुन त्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न केला आहे तसेच दिवाळीत चौकाचौकात फडे / झाडु / पणत्या ची विक्री करून पोटाची खळगी भरणाऱ्या कुटुंबालाही फराळाच्या थैल्याचे वाटप करून त्यांची ही दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न केला तसेच शहरातील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणारी कस्तुरी चॅरीटेबल संस्थेच्या वंचिताची दिवाळी या उपक्रमात सहभागी होऊन धनतेरसच्या पुर्व संध्येला दि. १७/१०/२५ रोजी चिखलदरा तालुक्यातील आदिवासीबहुल दुर्गम गांव रुईफाटा येथे जाऊन तेथील ९५ आदिवासी कुटुंबाचे झोपडीत जाऊन फराळांच्या थैल्याचे वाटप करून तसेच महीलाना साडीचे वाटप करून त्यांचेही जीवनात दिवाळीचा आनंद भरण्याचा अल्पसा प्रयत्न केला. प्रा. अनिल मुळे कुटुंबियांनी त्यांचा मुलगा स्व. अथर्वच्या संशास्यपद आकस्मिक मृत्युच्या दुखातुन सावरत अथर्वच्या स्मृतीप्रित्यर्थ समाजातील वंचितांच्या सेवेकरिता त्यांचे नातेवाईक व स्व. अथर्वच्या मित्रमंडळींच्या सहकार्याने स्व. अथर्व अनिल मुळे मल्टीपर्पज फाऊंडेशन ही सेवाभावी संस्था चार वर्षांपुर्वी स्थापन करण्यात आलेली आहे. या संस्थेद्वारे सतत वंचित पिडीतांची सेवा करण्याचा अल्पसा प्रयत्न करण्यात येत आहे.

# मुरुमकार परिवाराचा दिवाळी स्नेहमिलन सोहळा

**अकोला :** आपुलकी, ऐक्य आणि परंपरेचा सुंदर संगम घडवणारा मुरुमकार परिवाराचा दिवाळी स्नेहमिलन सोहळा २०२५ १९ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री दुर्गादेवी संस्थान, शिवर येथे अतिशय उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला. या सोहळ्याची सुरुवात परिवारातील ज्येष्ठ व पितृतुल्य व्यक्तिमत्व स्व. प्रल्हादराव काशिरामजी मुरुमकार यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. या क्षणी संपूर्ण सभागृहात भावनिक वातावरण निर्माण झाले. यानंतर परिवारातील सुप्रसिद्ध गायक सदानंद मुरुमकार यांच्या भक्तीगीतांच्या सुरेल बहारदार कार्यक्रमाने सोहळ्याची रंगत अधिक खुलली. त्यांच्या गोड आवाजातील झाला. गौरवाचा क्षण परिवारातील डॉक्टर, इंजिनिअर, चार्टर्ड अकाउंटंट, वकील, शासकीय सेवक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, तसेच १०वी, १२वी, पदवीधर, इंजिनिअरिंग, नीट परीक्षेतील खेळाडू व विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवणारे गुणवंतांचा गौरवचिन्ह, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

# कोणताही शेतकरी मदतीवाचून वंचित राहणार नाही; आ. रणधीर सावरकर यांचे प्रतिपादन



**अकोला :** ऑगस्ट महिन्यातील नुकसानीसाठी ४१,०७० शेतकऱ्यांच्या ४१,७१२.४९ हेक्टर क्षेत्रावर ३५.५३ कोटी रुपये तर सप्टेंबर महिन्यातील १६,२२१ शेतकऱ्यांच्या १९,७९५.९१ हेक्टर क्षेत्राकरिता १६.८२ कोटी रुपयांची मदत देण्यात येत आहे.

**अकोट :** ऑगस्ट महिन्यातील १८,५४८ हेक्टर बाधित क्षेत्राकरिता १५.७८ कोटी रुपये तर सप्टेंबर महिन्यातील २७,२९६ शेतकऱ्यांच्या २७,११९.६७ हेक्टर क्षेत्राकरिता ३१.७९ कोटी रुपयांची मदत देण्यात येत आहे.

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला (पूर्व) मतदारसंघातील कोणताही शेतकरी मदतीवाचून वंचित राहणार नाही. जून, जुलै, ऑगस्ट ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या आपत्तीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेतकऱ्यांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात येत असल्याची माहिती आ. रणधीर सावरकर यांनी दिली.

अकोला जिल्ह्यात या कालावधीत अतिवृष्टी, पुर व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे शेतीपिक, शेतजमीन, विहिरी, घर, जनावरे तसेच वैयक्तिक आणि सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या आपत्तीग्रस्त कुटुंबांना तातडीने मदत पुरविण्याची मागणी आमदार सावरकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. अकोला पूर्व मतदारसंघातील अकोला व अकोट तालुक्यातील नुकसानीबाबत आ. सावरकर यांनी स्थानिक प्रशासनासोबत सातत्याने बैठका घेऊन सर्वेक्षण, पंचनामे व नुकसान अहवाल शासनाकडे सादर होण्यासाठी विशेष पाठपुरावा केला. या कार्यात सहभागी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आमदार सावरकर यांनी आभार मानले. राज्य शासनाने दि. १० ऑक्टोबर २०२५ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार बाधित शेतकऱ्यांना विशेष मदत पॅकेज देण्याचा निर्णय घेतला आहे.

पूर्वीच्या शासन निर्णयात अकोला व मुर्तीजापूर तालुके वगळण्यात आले होते. ही बाब आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून देत चौकशीसह सुधारित आदेश निर्गमित करण्याची मागणी केली होती. त्यानुसार राज्यातील ९४ नवीन तालुके समाविष्ट करून ३४७ तालुक्यांतील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सुधारित शासन निर्णय घेण्यात आला आहे. शेवटी आ. सावरकर यांनी सांगितले की, ३ हेक्टरपर्यंत बाधित झालेल्या शेतकऱ्यांनाही आर्थिक मदतीचा लाभ मिळावा, यासाठी त्यांची आग्रही मागणी शासनाकडे प्रलंबित असून, कोणताही शेतकरी मदतीवाचून वंचित राहणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# संत तुकाराम महाराज कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

## तनिषा सरदार हिची विभागीय स्तरावर निवड

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील श्री संत तुकाराम महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, किंखेड पूर्णा येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत शिक्षण संकुलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत बारावी वर्गातील विद्यार्थिनी तनिषा संतोष सरदार हिने ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्तरावर आपला सहभाग निश्चित केला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गोकुळरावजी गावंडे यांनी अभिनंदन करताना सांगितले की, 'संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सातत्याने दाखवलेली ही प्रगती आमच्यासाठी अभिमानास्पद आहे.'

तसेच ४ बाय ४०० मीटर रिले स्पर्धेमध्ये कु. ज्ञानेश्वरी मोण्डे, कु. गौरी शिरस्कार, कु. मयुरी सपकाळ आणि कु. श्रुतिका लोखंडे या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक मिळवून शाळेचा गौरव वाढविला आहे. या यशस्वी



स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर आयोजित सत्कार समारंभास संस्थेचे अध्यक्ष गोकुळराव गावंडे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य देवानंद गावंडे, पर्यवेक्षक संतोष वाघ, प्रा. सचिन बाळापुर, प्रा. सचिन देवर, प्रा. गजानन तराळे, प्रा. प्रकाश जांभळे, प्रा. राहुल खंडारे, प्रा. मोहन देऊळकर, प्रा. राधिका इंगोले व प्रा. संध्या खोले आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संघपाल खंडेराव यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रकाश जांभळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी जय गावंडे व पहूरकर सर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. तनिषा सरदारच्या यशामुळे संत तुकाराम महाराज विद्यालयाचा क्रीडा क्षेत्रातील लौकिक अधिक उजळला आहे.

# दिवाळीच्या पूर्वसंध्येला सिलेंडरचा भडका

## नागरिकांच्या सतर्कतेने मोठी दुर्घटना टळली



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

शहरातील प्रजापती ले-आऊट परिसरात दिवाळीच्या पूर्वसंध्येला सिलेंडरच्या नळीला आग लागल्याची घटना घडली. मात्र, परिसरातील नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली.

प्राप्त माहितीनुसार, २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजताच्या सुमारास प्रजापती ले-आऊट येथील खडतरकर यांच्या घरात सिलेंडरच्या नळीला अचानक आग लागली. घरातील सदस्यांनी आरडाओरडा करताच शेजारील नागरिकांनी तत्परतेने मदतीला धाव घेतली. नागरिकांनी प्रसंगावधान राखत रेग्युलेटर काढण्याचा प्रयत्न केला, परंतु तो निघत नसल्याने त्यांनी तो सिलेंडर शेजारील मोठ्या नाल्यात फेकून दिला. त्यावर पाणी व वाळू टाकून आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.दरम्यान, नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाचे मोठे अग्निशमन वाहन (क्रमांक एमएच-



३० बीडी-१२७६) घटनास्थळी दाखल झाले होते. तथापि, अशा छोट्या घटनांसाठी फर्स्ट रिस्पॉन्डर बुलेट किंवा फोम व्हॅन आवश्यक असताना मोठे वाहन पाठवण्यात आले, अशी स्थानिक नागरिकांची नाराजी व्यक्त झाली आहे. नगरपरिषदेकडे २०० लिटर क्षमतेची 'योद्धा' व्हॅन जी कोरोना काळात सॅनिटायझेशनसाठी वापरण्यात आली होती तसेच २८ एप्रिल २०२५ रोजी आलेली ३०० लिटर क्षमतेची फोम व्हॅन असूनही, ही दोन्ही वाहने सध्या तळातून गायब असल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे अग्निशमन विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नगरपरिषदेच्या कार्यालयात या विषयावर दबक्या आवाजात खमंग चर्चा सुरू आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३२४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# बळीचे राज्य म्हणजे संविधानाचे राज्य होय- आ.डॉ.जितेंद्र आव्हाड

## किसान अधिकार अभियानाचा १७ वा बळी महोत्सव

**वर्धा/जनमाध्यम**

इडा पिडा टळो, बळीचं राज्य येवो म्हणजे आजच्या संदर्भात संविधानाचं राज्य सक्षम होवो, असा याचा अर्थ आहे, असे विचार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केले. किसान अधिकार अभियान वर्धा यांच्या वतीने आयोजित १७ व्या बळी महोत्सवात ते मुख्य वक्ते म्हणून बोलत होते.

डॉ. आव्हाड म्हणाले की, सध्याच्या सत्ताधाऱ्यांकडून सामाजिक समतेच्या आणि न्यायाच्या मूल्यांवर आघात होत असून, शेतकरी, कामगार आणि महिलांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. बळीराजाचं राज्य म्हणजे समतेवर आणि श्रमाच्या सन्मानावर आधारित समाज आहे. ते म्हणाले, महात्मा फुले यांनी शिक्षण आणि सामाजिक न्यायासाठी लढा दिला. त्या काळात त्यांना थोपवण्याचा प्रयत्न झाला, पण त्यांनी हार मानली नाही. आजही संविधान आणि लोकशाही मूल्यांवर हल्ले होत आहेत. त्यामुळे जनतेने जागृत होणं अत्यावश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेलं संविधान हेच बळीराजाचं शास्त्र आहे, ते वाचविण्याची जबाबदारी आपली सामूहिक आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि किसान अधिकार अभियानचे मुख्य प्रेरक ॲड. अविनाश काकडे म्हणाले की, बळी महोत्सव ही दिवाळीच्या काळात श्रमिक आणि शेतकरी प्रश्नांवर चिंतन करुन नव्याने लढ्याचं नियोजन करण्याची संधी आहे. त्यांनी मागील १७ वर्षांत या व्यासपीठाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य केल्याचे सांगितले. या वेळी खा.अमर काळे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, सामाजिक कार्यकर्ते हरीष इथापे, प्रा. प्रवीण भोयर, यशवंत झाडे, महेंद्र मुनेश्वर, नरेंद्र मसराम आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात आत्महत्याग्रस्त शेतकरी आणि समाजातील पिडीत घटकांना श्रद्धांजली अर्पण करून झाली.




सभागृहात इडा पिडा टळो, बळीचं राज्य येवो, जय जवान, जय किसान, अशा घोषणांनी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानासाठी सुदाम पवार, हरीष इथापे, राजीव वानखेडे, संदीप शेंद्रे, भूषण कडू आणि डॉ. विनय मून यांना बळी महोत्सव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुदाम पवार यांनी केले, संचालन सचिव प्रफुल कुकडे यांनी तर आभारप्रदर्शन गोपाल दुधाने यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशासाठी संघटक विठ्ठल झाडे, प्रा. प्रवीण भोयर, अमर काकडे, सचिन ढगे, मनीष मगर आदींचा सक्रिय सहभाग होता.

# होमगार्ड पथकातर्फे वृक्षारोपण उपक्रम

## ३५० झाडाचे रोपण आणि १५० झाडाचे वाटप

**हिंगणघाट/जनमाध्यम**

येथे हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानाअंतर्गत होमगार्ड पथकाने वृक्षारोपण उपक्रम राबवला. साई मंदिर इंदिरा गांधी वार्ड, खंडोबा वार्ड, महाकाली नगरी, संत तुकडोजी वार्ड आणि बिडकर वार्ड या परिसरांत एकूण ३५० झाडे रोपण्यात आली.



तसेच प्रत्येक होमगार्ड जवानाला १५० झाडांचे वाटप झाले.उपक्रमाचे मार्गदर्शन जिल्हा समादेशक सदाशिव वाघमारे यांनी केले. या प्रसंगी पथकातील अधिकारी कैलास रोकडे (तालुका समादेशक), वरिष्ठ पलटन नायक फिरोज पठाण, पलटन नायक आकाश वाकेकर, पलटन नायक गणेश नौकरकार, पलटन नायक वसंत नाईक, पलटन नायक राजेंद्र लाजूरकर, आणी अन्य अधिकारी, होमगार्ड जवान आणि महिला होमगार्ड मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रकारे उपक्रमामुळे पर्यावरणाबाबत जागृती वाढली असून हरित महाराष्ट्राच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले गेले, असे आयोजकांनी सांगितले.

## शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागले नाही तर

# नागपूर येथे अभिनव आंदोलन करू

## बच्चू कडू यांचा नंदोरी येथे भव्य शेतकरी एल्गार

**समुद्रपूर/जनमाध्यम**

बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करण्याकरिता महाराष्ट्र मध्ये शेतकरी हक्क यात्रा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडावरून सुरू केली होती त्या नंतर गुरुकुंज मोजरी येथे ७ दिवस अन्नत्याग आंदोलन त्या नंतर पायदळ वारी संपूर्ण अश्या प्रकारे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकरिता संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला असून येत्या २८ ऑक्टोबर ले बुटीबोरी ते जामठा पायदळ वारी असून २८ ऑक्टोबर पासून ३ दिवसीय मुक्कामी आंदोलन होणार त्या नंतर जरी हे सरकारनी शेतकऱ्यांचे प्रश्न निकाली काढले नाही तर नागपूर येथे भव्य अस अभिनव आंदोलन उभे करण्यात येईल असे बच्चू कडू यांनी सभेला बोलतांना संबोधित केले.

त्यानंतर जर कापूस केंद्र सोयाबीन केंद्र जिल्यात सुरू झाले नाही तर जिल्हाधिकारी यांच्या दालनात घुसून स्वतः ल कार्यालयात बंद करून घेऊ असे सुद्धा सांगण्यात आले ,या आंदोलनातील प्रमुख मागण्या शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज माफी, प्रकाश टाकण्याचे काम या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांनी केले असून सर्व शेतकरी बांधवांना २८ तारखे संधर्भात आव्हान करण्यात आले.या कार्यक्रमात संचालन



नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्याची कर्ज माफी सोबत त्यांना बोनस, पॉली हाऊस,शेड नेट,बागायती शेती करीता विन व्याजी कर्ज ,दिव्यांगाना ६ हजार मानधन, ग्राम पंचायत कर्मचारी,ग्राम रोजगार सेवक कर्मचारी,अंगणवाडी सेविका, मदतनीस याच्या सह इतर अन्य मागण्या संदर्भात या सभे दरम्यान प्रा.अमोल नगराळे यांनी प्रमुख उपस्थिती शेतकरी नेते माजी राज्य मंत्री बच्चू कडू, बल्लू जवंजाळ (कार्याध्यक्ष प्रहार जनशक्ती पक्ष महाराष्ट्र राज्य) प्रवीण हेंडवे (निरीक्षक चंद्रपूर गडचिरोली जिल्हा) ऋग्नमित्र गजू कुबडे (माजी विदर्भ प्रमुख प्रहार जनशक्ती पक्ष).देवा धोटे (माजी जिल्हाप्रमुख वर्धा) सुरज दा. कुबडे (जिल्हाप्रमुख प्रहार पक्ष वर्धा जिल्हा) महेश झोटिंग पाटील (राष्ट्रवादी पक्ष तालुका प्रमुख श.प.ग) प्रवीण महाजन (माजी तालुका प्रमुख तथा उपसरपंच परडा) प्रशांत गहुकर (किसन मोर्चा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष वर्धा जिल्हा) प्रवीण बोरुटकर,सचिन कुटे, राहुल भाऊ नांदुरकर,वैभव मानकर, गजु कुटे,अमित शुभम डहाके अमित धुमाळ,किशोर पुसदेकर, खोमलाल जगराह, बंटी पंचटबरिया, श्रीकांत सुमटकर, शुभम डहाके,सुधाकर सातोने, इत्यादी प्रहार सेवक,व सार्वजनिक क्रीडा मंडळ पुरुष,सार्वजनिक क्रीडा मंडळ महिला यांचे खूप खूप सहकार्य लाभले तसेच पोलीस प्रशासनाने सुद्धा खूप खूप सहकार्य केले त देवा धोटे यांनी आभार मानले.

# गरीबांच्या घरात उजळली दिवाळी


## अंबिका सोशल फाउंडेशनकडून १५ हजार कुटुंबांना रवा-साखर वाटप



**वर्धा/जनमाध्यम**

महागाईच्या झळांनी त्रस्त झालेल्या गरीबांच्या घरात यंदा दिवाळीचा खरा प्रकाश पसरविण्याचे काम अंबिका सोशल फाउंडेशनने केले आहे. अध्यक्ष अंबिका हिंगमिरे यांच्या पुढाकाराने वर्धा शहरासह बोरगाव मेघे, सिंदी मेघे, सेवाग्राम, पिपरी मेघे आदी भागांतील तब्बल १५ हजार कुटुंबांना रवा-साखर वाटप करून समाजातील वंचित घटकांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

राजकीय पाठबळाविना सामाजिक दायित्व जपणाऱ्या हिंगमिरे यांनी गेल्या सात वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने चालवला आहे. दुष्काळ, महागाई आणि संकटांच्या काळातही त्यांनी कष्टकरी, मजूर, शेतमजूर, महिलांपर्यंत थेट मदत पोहोचवून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.समता नगर, टेकली, वर्ध्याच्या वस्त्यांत झालेल्या वाटपावेळी महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन हीच खरी दिवाळी, अशी भावना व्यक्त केली. विद्यार्थ्यांना साहित्य, रुग्णांना मदत, साड्या व कपडे वाटप असे अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवणाऱ्या अंबिका हिंगमिरे यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.दिवाळी सण हा सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा केल्या जातो. मात्र महागाईच्या परिस्थितीत शेतकरी शेतमजूर कष्टकरी कामगार वर्ग या परिस्थित त्यांना सामाजिक दायित्व समजून मी दरवर्षी रवा साखर देऊन त्यांच्या उत्साहात सहभागी होण्याचा प्रयत्न करत आहे.गेल्या तीन दिवसापासून वर्धा शहरासह इतरही गावात रवा साखर वाटप करीत आहे.



# शेतकऱ्याच्या प्रामाणिकपणाचा दाखला

## हरवलेला मोबाईल परत करून दिला

**वर्धा/जनमाध्यम**

प्रामाणिकपणा आणि माणुसकी आजही समाजात जिवंत असल्याचे उदाहरण पवनूर येथील शेतकरी माधव कारणकर यांनी घालून दिले आहे. सुकळी (उबार) येथील विनोद कालोकर हे शेतात कामासाठी गेले असता त्यांचा अंदाजे २५ हजार रुपयांचा मोबाईल हरवला होता. दरम्यान, पवनूर येथील माधव कारणकर यांना हा मोबाईल सापडला. त्यांनी कोणताही मोह ठेवता न त्वरित कालोकर यांना मोबाईल परत करून दिला. कारणकर यांच्या या प्रामाणिक कृतीबद्दल परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. अशा कृतींमुळे समाजात माणुसकी आणि विश्वास आजही टिकून असल्याचे चित्र उमटले आहे.

# महाराष्ट्र शासनाचा श्री गुरू तेग बहादूर साहबजी शताब्दी

## समितीवर पत्रकार गुरुमुख सिंह बावरा यांची निवड

**समुद्रपूर/जनमाध्यम**

महाराष्ट्र शासनातर्फे हिंद की चादर गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दीनिमित्त कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. त्याच अनुषंगाने विदर्भात समिती तयार करण्यात आलेली आहे नागपूर मध्ये हा कार्यक्रम ६ डिसेंबरला होणार आहे.



यामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील सदस्य या बैठकीसाठी उपस्थित होते या बैठकीसाठी मुख्य मार्गदर्शक मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली विदर्भ प्रदेश समिती अध्यक्ष व सदस्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर येथील पत्रकार गुरुमुख सिंह बावरा यांची विदर्भ प्रदेश सहसचिव म्हणून निवड करण्यात आली आहे. श्री गुरु तेग बहादुर यांना 'हिंदची चादर' असेही म्हणतात. धर्म वाचवण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.या कार्यक्रमांमध्ये गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या देश आणि धर्मासाठी शहादत व बलिदान ची गाथा घराघरात पर्यंत पोहोचण्याचा उद्देश आहे.हा कार्यक्रम सिख, सिकलगर, बंजारा, लबांना, मोहियल, सिंधी समाज बांधव एकत्रित पणे कार्यक्रम घेत आहे. यामुळेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील अशासकीय सदस्यांची निवड करण्यात आली यातुन वर्धा जिल्ह्यातुन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार गुरुमुख सिंह बावरा यांची निवड करण्यात आली आहेत. त्यांचा निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# मजुरावर कुऱ्हाडीने हल्ला; गुन्हा दाखल

**वर्धा** - तू गावातील आणि गावाबाहेरील मजुरीचे काम घेत असल्याने मला काम मिळत नाही, असे म्हणत कुऱ्हाडीने मारहाण करून एकास जखमी करण्यात आले. देवळी येथील इंदिरानगर भागात शनिवारी (ता. १८) ही घटना घडली. अनिल लक्ष्मण वानखेडे रा. इंदिरानगर देवळी असे जखमीचे नाव आहे. अनिल वानखेडे हे त्यांच्या घरासमोर उभे असताना देवळीच्या इंदिरानगर भागातीलच रहिवासी किशोर उर्फ बापुराव तुळशीराम मरगडे हा तेथे आला.त्याने अनिल यांना तु गावातील आणि गावाबाहेरील मजुरीचे काम घेतो, त्यामुळे मला काम मिळत नाही असे म्हणत अनिलशी वाद केला. याच वादादरम्यान अनिल व किशोर यांच्या चांगलीच झटापट होत अनिल यांना किशोर याने कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी केले. या प्रकरणी अनिल वानखेडे यांच्या तक्रारीवरून किशोर मरगडे याच्याविरुद्ध देवळी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३२३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# संक्षिप्त

## तडीपार आरोपीला अटक; दारूसाठा जप्त

**वर्धा** - तडीपार असलेला मनोज सुरेश जयस्वाल (४८) रा. पोद्दार बागीचा, रामनगर, वर्धा याच्यावर रामनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक राय यांनी दारूबंदी कायद्यांतर्गत छापा घातला. तेव्हा तो घरीच हजर असल्याचे आढळून आले. त्याच्या घरातून अंदाजे ७ हजार रुपयांचा विदेशी दारूसाठा जप्त करण्यात आला.

या कारवाईत तडीपार मनोज जयस्वाल, त्याची पत्नी राणी जयस्वाल व त्यांचा नोकर या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मनोज जयस्वाल हा तडीपार असताना देशी-विदेशी दारूचा अवैध व्यवसाय करत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कायद्याला आव्हान देणाऱ्या या प्रकारामुळे पोलीस दलात संतापाचे वातावरण आहे. मनोज जयस्वाल प्रकरणामुळे रामनगर पोलीस स्टेशनचे २१ कर्मचारी यांच्यावर गेल्या काही दिवसापूर्वी पोलीस अधीक्षकांनी कारवाई केली व त्यांना पोलीस मुख्यालयात पाठविण्यात आले. या कारवाईमुळे संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांच्या मानसिक व शारीरिक स्थितीवर गंभीर परिणाम झाल्याची चर्चा सुरू आहे. या घडामोडीला जबाबदार कोण, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आता ते रामनगर पोलीस ठाण्यातील आणखी किती कर्मचाऱ्यांना मुख्यालयाशी संलग्न करतील आणि ठाणेदारांवर काय कारवाई केली जाईल.

## हद्दपार गुंडाचा कारला चौकात वावर

**वर्धा** - आर्वीनाका परिसरातील इंदिरानगर झोपडपट्टी भागातील रहिवासी असलेल्या काही गुंड प्रवृत्तीच्या तरुणांना जिल्हाधिकारी यांनी हद्दपार केले आहे. दोन वर्षाच्या काळाकरिता हद्दपार असलेले गुंड राजरोसपणे घरी येऊन राहतात. मित्रांच्या भेटीकरिता आर्वीनाका व कारला चौकात येऊन चहाटपरीवर बसतात. येथेच त्यांचे इतर हस्तक भेटण्याकरिता येत असल्याने आर्वीनाका चौकातील काही चहा विक्रीचे केंद्र तडीपार गुंडांच्या मिलनाचे केंद्र बनल्याचे दिसते. हल्ली उत्सवाचे दिवस असल्याने या दोन्ही चौकात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. येथे रामनगर पोलिसांचा बंदोबस्त असतो तरीदेखील तडीपार गुंड तोंडावर स्कार्फ बांधून प्रवास करताना दिसतात.

## शेतकऱ्याला धमकी देणाऱ्या व्यापाऱ्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**वर्धा-** शेतकऱ्याला शेतमालाचा मोबदला न देता थेट त्यालाच जिवे मारण्याची धमकी देत खंडणी मागणाऱ्या धान्य व्यापारी कैलास अजाब काकडे याची पोलीस कोठडी संपत असल्याने त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याची न्यालयीन कोठडीत रवानगी केली आहे. रवींद्र डायगव्हाणे रा. वाहितपूर ता. सेलू यांनी धान्य व्यापारी कैलास अजाब काकडे यांना तूर व सोयाबीन विकलेव्यापाऱ्याने डायगव्हाणे यांना तूर व सोयाबीन या शेतमालाचे पैसे नगदी दिले नाही. वारंवार पैशाची मागणी करूनही पैसे न दिल्याने आणि पैशाची मागणी केल्यास जिवानिशी ठार करण्याची धमकी देत खंडणी मागण्यात आल्याने डायगव्हाणे यांनी वर्धा शहर पोलीस स्टेशन गाठून तक्रार नोंदविली.

तक्रारीवरून पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कैलास काकडे याला हुडकून काढत अटक केली. न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयाने ३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. तर शुक्रवार, ३ रोजी त्याची पोलीस कोठडी संपत असल्याने त्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद लक्षात घेत न्यायालयाने काकडे याची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.

## एसटी बसला कारची धडक, प्रवासी थोडक्यात बचावले

**वर्धा-** पुलगावकडे प्रवासी घेऊन जाणाऱ्या एसटी बसला मागून आलेल्या कारने जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात दोन्ही वाहने नुकसानग्रस्त झाली असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. नागपूर येथील साजिद सत्तार कुरेशी (३८) हे एमएच ४० एक्यू ६४२५ क्रमांकाची नागपूर-पुलगाव एसटी बस घेऊन प्रवास करत होते. बसमध्ये वाहक म्हणून राजेंद्र सहारे (नागपूर) हे होते.

वर्धा येथे काही प्रवाशांना उतरविल्यानंतर बस सालोड बायपासमार्गे पुलगावकडे निघाली. रेल्वे क्रॉसिंग पार करून पुलगाव शहरात प्रवेश करत असताना टी-पॉइंट चौकात एमएच ०२ जेपी ६३८१ क्रमांकाची कार वेगात आली व बसला मागून धडकली. या धडकेत कारचा टायर फुटून मोठा आवाज झाला. त्यामुळे परिसरात गोंधळ निर्माण झाला होता. अपघातानंतर कार चालकाने वाहन तेथेच सोडून पळ काढला. सुदैवाने बसमधील प्रवाशांना कोणतीही दुखापत झाली नाही. एसटी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## फलक नसलेल्या गाड्यांमुळे प्रवाशांची अडचण

**वर्धा-** स्थानिक बसस्थानकामधून ग्रामीण भागात रोज अनेक गाड्या जातात. यापैकी काही गाड्यांना संबंधित गावाचा फलकच राहत नसल्याने प्रवाशांची मोठी अडचण होत असल्याची दिसते. कानगाव परिसरात जाणाऱ्या गाड्यांवर अनेकदा फलकच राहत नसल्याची विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आले आहे.

## मानोरा येथील वीट व्यावसायिकाची ऑनलाइन फसवणूक

**हिंगणघाट** - बांधकामाकरिता विटांचा पुरवठा करण्याच्या नावाखाली हिंगणघाट तालुक्याच्या मानोरा येथील एका व्यावसायिकाची तब्बल १ लाख ८९ हजार रुपयांनी ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. या प्रकरणात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. मानोरा येथील लक्ष्मीकांत दादाजी सेनाड (४७) यांचा विटभट्टीचा व्यवसाय आहे. त्यांना एका अज्ञात क्रमांकावरून फोन आला. संबंधित व्यक्तीने नागरी रेल्वेस्थानकावर काम सुरू आहे, त्यासाठी विटांची गरज आहे, असे सांगून ऑर्डर देण्याचे आश्वासन दिले. यानंतर त्या व्यक्तीने सेनाड यांना व्हॉट्सॲपवर क्यूआर कोड पाठवून 'हे स्कॅन करा' असे सांगितले. सेनाड यांनी तो कोड स्कॅन केल्यानंतर त्यांच्या फोन पे ॲपद्वारे बँक खात्यातून १ लाख ८९ हजार रुपये गहाळ झाल्याचे निदर्शनास आले. फसवणुकीचा प्रकार लक्षात येताच त्यांनी तत्काळ पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध वर्धा सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# शासकीय सेवेमध्ये रुजू झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

## -वाचनालयाच्या प्रस्तावित जागेवर वृक्षारोपण



**तिवसा /प्रतिनिधीः-** येथे मागील १४ वर्षापासून सुरु असलेले विनाअनुदानित वाचनालयातून आता पर्यंत ५० पेक्षा जास्त विद्यार्थी-विद्यार्थिनी शासकीय सेवेत रुजू झालेले आहेत.त्यातील आता नुकत्याच नियुक्ती झालेल्या विद्यार्थ्यांचा आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यामध्ये अक्षय देशमुख,शुभम वानखडे, नकुल कुऱ्हाडे, आकाश नान्हे, आकाश भलावी, अंकुश केवदे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच विनोद पटेल सर यांना बी. द. चेंज फॉउंडेशन मार्फत राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सुद्धा आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणातून आमदार राजेश वानखडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्यात. शाहु महाराज वाचनालयाला इमारत बांधकाम करण्याकरिता रु. ८० लाख भक्कम असा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ची माहिती दिली व सदर वाचनालय पूर्णपणे डिजिटल करून येथील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा पुरविण्याचा प्रयत्न करू असे सांगितले तसेच सत्काराचा कार्यक्रम आटोपल्यानंतर शाहु महाराज सा. वाचनालयाला इमारत बांधकामाकरिता मिळालेल्या जागेवर आरती राजेश वानखडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.तसेच कार्यक्रमांची सांगता करत असतांना वाचनालयाची इमारत बांधकाम करण्याकरिता निधी मिळून दिल्याबद्दल वाचनालयातर्फे त्यांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला नितीन गुडढे,प्रवीण अडसपुरे, प्रदीप गौरखेडे, अनिल थुल, छाया दंडाळे, अण्णा पडोळे,अजय गुल्हाने, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे,मधुकर पिंगळे, सतीश नंदनवार, संजय वाट, सुनील कुऱ्हाडे, सुनील देशमूख, सुमित अनासाने , मंगेश जगताप, पप्पू देशमूख, सुनील बहाद्दरपुरे, अंकुश देशमूख, आकाश बावरी, रोशन राठी, भूषण मुंदाणे, सुरज भगत,मयूर गंधे, सुरज कपले, दिपक धानोरकर,सौरभ इंगळे,हरिष फरकाडे, स्वप्नील कुऱ्हेकर, राहुल धडांगे,किशोर टावरी व इतर वाचक वर्ग व गावातील मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय गडलिंग तसेच आभार प्रदर्शन भूषण मुंदाणे यांनी केले.

# सर्वधर्मीय भाऊबीज-सामाजिक सलोखा वाढवणारा सोहळा आज




**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी जिल्हापरिषद सदस्य, सामाजिक कार्यकर्ते,शेतकरी नेते आणि आरोग्यमित्र प्रकाश साबळे यांच्या संकल्पनेतुन साकारला जाणारा सर्वधर्मीय भाऊबीज - सामाजिक सलोखा वाढवणारा सोहळा यावर्षी सुद्धा मोठ्या थाटामाटात सिकची रिसॉर्ट वलगाव येथे बुधवार दिनांक २३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२. ०० वाजता पार पडणार आहे.



लाडकी बहीण योजनेचा जन्मच या वलगाव येथे होणाऱ्या भाऊबीज सोहळा संकल्पनेतून झाला असं म्हटलं तर वावग ठरणार नाही.

कारण हा उपक्रम मागील सात वर्षापासून अविरत -अखंड विनासायास आजही यशस्वी होत आहे,यातील सात्यत्य आणि विविधता वर्षागणिक वाढत आहे.

यातील सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे एकीकडे जातीय-धार्मिक कट्टरता वाढत असतांना समाजातील मतभेद वाढवणाऱ्या भिंती पाडायचे काम ह्या सोहळ्यात होते. समाजातील विविध क्षेत्रातील ( आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, महिला भजनी मंडळ, आरोग्य सेविका इत्यादी ) महिलांचा हा सन्मान सोहळा असल्याने या महिलांना प्रकाश साबळे त्यांना सख्या भावापेक्षाही अधिक जवळचे वाटतात. येथेच या सोहळ्याचे महत्वत लक्षात येते.

या सोहळ्यात सर्वधर्मीय धर्मगरू उपस्थित राहून उपस्थितांना मार्गदर्शन रुपी आशीर्वचन देतात, विविध धर्मातील भगिनी आपल्या भावांना ओवाळताना त्यांच्याकडून राष्ट्र -महिला सुरक्षेबद्दल अभिवचन घेतात. अत्यंत भावनिक वातावरणात हा सोहळा पार पडतांना जो मनाला आनंद होतो, त्या क्षणाला आपसूकच डोळ्याच्या कडा पाणावतात.या सोहळ्याला भरभक्कम साथ सिकची चॅरिटेबल ट्रस्टची लाभत असल्याने या कार्यक्रमाला चंदेरी किनार नेहमीच लागते.

तरी या सामाजिक - भारतीय संस्कृती जपणाऱ्या उपक्रमाचे आपण भागदार होऊन राष्ट्रीय एकात्मता वाढीस चालना द्यावी,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# निराधार बालकांना दिवाळी फराळाचे वाटप


## -ॲड.संतोष कोल्हे परिवाराचा उपक्रम



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथील प्रख्यात विधिज्ञ तथा नागरिक हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष ॲड.संतोष कोल्हे हे दरवर्षी दिवाळी सणाचे निमित्त साधून विविध उपक्रमांचे आयोजन करीत असतात. त्या पैकी प्रामुख्याने वंचित, अनाथ, समाजातील निराधार मुलांना ते दरवर्षी स्थानिक गाडगेबाबा निराधार आश्रमातील मुलांना दिवाळीच्या फराळाची मेजवानी देतात.

ह्या वर्षी सुद्धा लक्ष्मी पुजनाचे निमित्त साधून फराळाचे वाटप त्यांनी केले. ह्यामधे त्यांच्या सहचारिणी व प्रसिद्ध समाज सेविका अंबिका कोल्हे व मुले कबीर,व अमरजीत कोल्हे सहकार्य करतात.ॲड .संतोष कोल्हे यांच्या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमा पासुन आजच्या तथाकथित समाज सेवकांनी बोध घेतला पाहिजे अशी प्रतिक्रिया नागरिक हक्क संरक्षण समिती चे सचिव शरद रोहणकर यांनी प्रसिद्धी माध्यमासमोर बोलतांना व्यक्त केली.

# अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात दिवाळी साजरी



**अचलपूर/प्रतिनिधीः-** २१ ऑक्टोबर रोजी अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरात दिवाळी साजरी करण्यात आली .यावेळी संध्याकाळी ७ चा दरम्यान रिमझिम पावसाला ही सुरवात झाली होती. काही वेळेनंतर पाऊस थांबला. पण या रिमझिम पावसात ही नागरिकांनी उत्साहात दिवाळी साजरी केली .कुठेही आनंद कमी दिसला नाही. फटाक्याची आतीषबाजी करण्यात आली .आज २१ ऑक्टोबर रोजी जुळ्या शहरात विविध ठिकाणी अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाकडून साफसफाई अभियान राबविण्यात आले .दुसरीकडे जुळ्या शहरात आज अनेक ठिकाणी अनकोट चे ही आयोजन करण्यात आले होते. दिवाळी मध्ये नागरिकांनी आपल्या घराला नवीन दिलेले कलर ,लायटिंग चा उजेड आणि फटाक्याची आतषबाजी ने जुळ्या शहरात मोठ्या उत्साहात दिवाळी साजरी करण्यात आली.

# शिवसेनेतर्फे वयोवृद्धांना ब्लँकेट व फराळ वाटप

## -सेवाभावी उपक्रमातून दिवाळीचा आनंद द्विगुणित

**नांदगाव पेठ/प्रतिनिधी -** दिवाळीच्या शुभ पर्वावर अमरावती तालुका शिवसेनेच्या (उ.बा.ठा) वतीने संगमेश्वर महादेव मंदिर परिसरात वयोवृद्धांना ब्लँकेट तसेच फराळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. नितीन हटवार व मित्रमंडळींच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सेवाभावी उपक्रमातून वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी डॉ. चंद्रशेखर गिरी व वामनराव गिरी हे होते. यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तथा माजी जिल्हा परिषद सदस्य नितीन हटवार म्हणाले की, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या '८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण' या ब्रीदवाक्यानुसार शिवसेना समाजकार्यासाठी सदैव तत्पर आहे,' असे त्यांनी सांगितले.



कार्यक्रमात नुकताच एस.आर.पी.एफ. अमरावती येथे निवड झालेल्या विवेक बाबुराव साकोरे व कृणाल बबनराव साकोरे यांचा शाल, श्रीफळ व गुलदस्ता देऊन सत्कार करण्यात आला. तसेच १०१ वर्षीय वयोवृद्ध शामराव पोकळे व मंदिर सेवेत तीन दशकांपासून कार्यरत असलेल्या शामराव महाराज गभणे यांचाही गौरव करण्यात आला. या प्रसंगी विनोद गभणे, मनोज मोरे, विनोद मंडळकर, संतोष मालधुरे, मोरेश्वर मानेकर सर, श्रीकृष्ण साकोरे, विजय कापडे, अविनाश यावले, विनोद सुने, मोरेश्वर इंगोले, पंकज वंजारी, गजानन हटवार, निकु मोहोळ, पवार सर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाला महिला, पुरुष व वयोवृद्ध नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दरवर्षी दिवाळीच्या निमित्ताने असा सेवाभावी उपक्रम आयोजित करण्याचा निर्धार या वेळी नितीन हटवार यांनी व्यक्त केला.

## कोजागरी स्नेह मिलन व संगीत रजनी कार्यक्रम उत्साहात

# अमरावती जिल्हा निवृत्त अभियंता बहुउद्देशीय संस्थे तर्फे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा निवृत्त अभियंता बहुउद्देशीय संस्थे तर्फे कोजागरी स्नेह मिलन व संगीत रजनी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

संस्थेचे सभासद आणि त्यांचे कुटुंबीय यांनी खेळ, गायन, सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा तथा मिश्रीत भाग घेत सर्वांनी मनापासून सहभाग घेत अगदी खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला. अभियंता दिलीप पाटील व अभि. हेमंत लोखंडे यांनी गायन कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन व स्वतः गाणे प्रसुत करून ठराविक अभियंत्यांनी आपापली मनपसंत गीते गायिली. ज्या मध्ये प्रामुख्याने अभि. दिपक उमाळकर, अभि. संजय गोटे, अभि. दिपक जावरकर, अभि. जे. बी. शेळके, अभि. गजानन चऱ्हाटे या सोबतच महिला भगिनी मध्ये निमजे, पळणीटकर, ठाकरे , ज्योती पवार यांनीही गाणे प्रसुत केलीत. अभि. अविनाश राजगुरे यांनी १५ प्रश्न, १५ गुण आणि १५ मिनीटे असा मापदंड ठेवीत सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे ही आयोजन छान पार पाडले. ज्या मध्ये प्रथम क्रमांक अभि. अविनाश आनंदराव काळे, दोघांना सारखे गुण प्राप्त झाल्याने द्वितीय क्रमांक संस्थेचे अध्यक्ष अभि. मुरलीधराव गावंडे व संचालक बाळासाहेब



पतिंगे तथा चौघांना सारखे गुण प्राप्त झाल्याने तृतीय क्रमांक ज्योती भिलपवार, अभि. सतेज मधुकरराव केचे, अभि. विठ्ठल सांगे आणि ललीता ईचे यांनी पटकावला. अध्यक्षांच्या शुभ हस्ते फुलांची कुंडी तथा पुष्पगुच्छ प्रदान करुन त्यांना सन्मानित करण्यात आले. अभि. हरिदास उल्लेख यांनी त्यांचे कांचन रिसॉर्ट सुंदर लॉन उपलब्ध करून दिल्याने त्यांचा स्वपत्निक संस्थेचे अध्यक्ष अभि. मुरलीधराव गावंडे यांचे शुभ हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

एकंदरीत कार्यक्रमाचे आयोजन अमरावती जिल्हा निवृत्त अभियंता बहुउद्देशीय संस्थे तर्फे सभासदांचा कोजागरी स्नेह मिलन व संगीत रजनी कार्यक्रम सुंदर व व्यवस्थित पणे पार पडला. शेवटी, कार्यकारीनी मधील उपस्थित सर्व संचालकांचे अभि. जयंत डेहनकर यांचे शुभ हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. पांडे कॅटरिंग यांनी उत्कृष्ट नाश्ता जेवन व कोजागरी चे केशर युक्त दुध उपलब्ध करून सर्व अभियंता तथा त्यांच्या कुटुंबियांनी त्याचा आस्वाद घेतला. यावेळी अमरावती जिल्हा निवृत्त अभियंता बहुउद्देशीय संस्थे तील बहुसंख्य अभियंते तथा महिला भगिनी आवर्जुन उपस्थित होते.

# श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारताचे मिसाइलमॅन व माजी राष्ट्रपती' डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने वाचन प्रेरणादिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञानाचे महत्त्व पटवून देणे हा होता. या प्रसंगी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनी आयोजित करण्यात आलेली होती. सदर प्रदर्शनीत ग्रंथालयातील दुर्मिळ, विद्यार्थ्यांकरीता वाचनीय पण त्यांना कमी परिचित ग्रंथ ठेवण्यात आलेली होती.

या प्रसंगी प्रथम भारताचे माजी राष्ट्रपती' भारतरत्न डॉ. ए पी जे अब्दुल कलाम, ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ एस आर रंगनाथन व संस्थेचे संस्थापक अंबादासपंत वैद्य यांच्या प्रतिमेचे पाहुण्याच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीला महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ मिलिंद अनासाने यांनी प्रास्ताविक सादर केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी सांगितले कि ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि वाचन संस्कृती रुजवणे या उद्देशाने १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमा मध्ये विभाग प्रमुख डॉ. सारंग खोंड यांनी विद्यार्थ्यांना डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांबद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ अंजली राऊत यांनी वाचन साहित्य वाचकांचा मानसिक व शैक्षणिक विकास कसा घडतो यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, डॉ. कलाम यांचे शिक्षक विविध धर्माचे असल्याने ते धर्मनिरपेक्ष वातावरणात वाढले. दुर्दम्य इच्छाशक्ती, ठाम आत्मविश्वास, नितळ मन आणि दिलदार स्वभाव हे डॉ. कलमांचे वैशिष्ट्य होते. लेखन-भाषणातून व्यक्त होणारे सकारात्मक, प्रगल्भ विचार सर्वांच्याच मुख्यतः युवापिढीच्या मुलांमध्ये चैतन्य, आशावाद आणि प्रेरणा निर्माण करीत होते. मुलांमध्ये राष्ट्रभक्तीचे बीज पेरत होते हे सर्व विचार त्यांना त्याच्या वाचनातूनच मिळाले.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. मिलिंद अनासाने यांनी विद्यार्थीसाठीं ग्रंथ प्रदर्शनी मध्ये ठेवलेल्या ग्रंथापैकी कोणत्याही एका ग्रंथाचे पुनरावलोकन करून सादर करावे, सर्वात चालल्या पुनरावलोकन केलेल्या विद्यार्थ्याला योग्य बक्षीस जाहीर केले. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाने वाचन प्रेरणादिन मोठ्या उत्साहात साजरा केल्याबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ मिलिंद अनासाने सर्व उपस्थित प्राध्यापक वृंद डॉ. वर्तक, डॉ. सोनटक्के मॅडम, प्रा. संतोष बंदे, प्रा. आशिष खराते, प्रा. स्वप्नील नेहार व इतर सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकत्तेर कर्मचारी निलेश झाडे, कीर्ती चिमोटे यांचे आभार मानले. या कार्यक्रमाचो आयोजन करण्याकरीता ग्रंथालयाचे सहकारी निलेश काळे, मोहन राजगुरे विनोद आकोडे यांनी प्रयत्न केले.

# शुक्रवारी ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी शिबिर

**अमरावती/प्रतिनिधीः-** ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत मिळाली नसलेल्या आर्थिक मालमत्तांच्या निकालीकरणासाठी शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी दुपारी २ वाजता विशेष जिल्हास्तरीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावती येथील अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मुख्य इमारतीत हे शिबिर होणार आहे.

शिबिरात खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवींचे निराकरण करणे तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व बँका या शिबिरात सहभागी होणार आहेत. ठेवीदार शिक्षण व जनजागृती निधी अंतर्गत सर्व नामनिर्देशित, पात्र लाभार्थ्यांनी या शिबिरास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

वित्तीय सेवा विभाग आणि राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्या निर्देशानुसार हे शिबिर होत आहे. या उपक्रमामुळे खातेदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी परत मिळवण्याची संधी मिळणार आहे. १० वर्षांहून अधिक काळ ज्या ठेवींवर दावा केलेला नाही, अशा ठेवी 'ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी'मध्ये हस्तांतरित करण्यात येतात. खातेदारांना त्या परत मिळवण्याचा पूर्ण अधिकार असल्यामुळे नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी जिल्हा बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी केले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ४६
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज क्र.२२३६/२०२५
**भागवत -वि- निरंक**
पुढील ता.२६.११.२०२५

**अर्जदार :**
१. **भागवत चंद्रभान गवई,** वय ७३ वर्षे, व्यवसाय - निवृत्त
रा.सालोरा खुर्द, ता.जि.अमरावती
२. **गुणवंत चंद्रभानजी गवई,** वय ६७ वर्षे, व्यवसाय - निवृत्त
एन-१२, एफ-१७, स्वामी विवेकानंद नगर, हडको औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद
३. **इंदिरा रामभाऊ पांडे,** वय ७० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.अनंत मंगल कार्यालय, केडिया नगर, राजापेठ, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत चंद्रभान डोमाजी गवई आणि गोदुबाई डोमाजी गवई हे अनुक्रमे दि.०४.०९.२०१८ व ०६.१२.२०१० रोजी अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार भागवत चंद्रभान गवई व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भागवत चंद्रभान गवई व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०४.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**मा.सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२७७/२०२५ ने.ता.१८.११.२०२५

**विमल विक्रम पोवते + ३ वि.निरंक**
१. **विमल विक्रम पोवते**
२. **आकाश विक्रम पोवते**
३. **प्रतिक्षा विक्रम पोवते**
अर्जदार क्र.१ ते ३ राहणार वेणी गणेशपुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. **विकास विक्रम पोवते**
रा.साईकृपा कॉलनी, वार्ड नं.३, कक्कड लेआउट साई नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

// वि // निरंक

ज्याअर्थी **मयत विक्रम राजाराम पोवते यांचा मृत्यू दि.०५.०९.२०२५ रोजी रेडियंट हॉस्पिटल, अमरावती येथे झाला.** मयतांचे अर्जदार क्र.१ पत्नी, अर्जदार क्र.२ व ४ मुले व अर्जदार क्र.०३ मुलगी आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुद्ध काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १६ ऑक्टोबर मे २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज - २१४५/२०२५**
**श्रीमती माया अधिक एक विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०१.११.२०२५**

अर्जदार :
1) **Maya Ravindra Dangare,** Age 56 yrs., Occu.- Household
2) **Pratiksha Ravindra Dangare** , Age 26 yrs., Occu.- Private Job,
Both R/o. New Prabhat Colony, Chkradhar Nagar, Sai Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द -

**गैरअर्जदार : -** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रविंद्र हनुमंतराव डांगरे हे दि.१९/०४/२०२५ रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे मयत झाले.** अर्जदार माया अधिक एक विरुध्द निरंक **यांनी** वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती माया अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २५.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बडनेऱ्यात उदया भव्य 'नरकासुर दहन' सोहळा

## ८६ वर्षांची परंपरा कायम



**बडनेरा/वार्ताहर**

तब्बल ८६ वर्षांची परंपरा कायम राखत, यंदाही बडनेरा जुनी वस्तीतील सावता मैदानावर नरकासुर दहनाचा भव्य दिव्य सोहळा २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पार पडणार आहे. बडनेरा शहरच नव्हे तर पंचक्रोशीतील सर्वसामान्यांच्या 'दिवाळीचा सोहळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाची जय्यत तयारी आयोजकांच्या वतीने पूर्ण करण्यात आली आहे.

श्री संत सावता युवक मंडळ संचालित श्रीराम विजय उत्सव समिती या पारंपरिक सोहळ्याचे आयोजन दरवर्षी करते. दिवाळीतील लक्ष्मीपूजनानंतरच्या दुसऱ्या दिवशी पार पडणाऱ्या या सोहळ्यात आकर्षक फटाक्यांची आतषबाजी करून अन्याय आणि वाईट प्रवृत्तीवर विजय मिळविण्याचे प्रतीक म्हणून नरकासुराचे दहन केले जाते.या सोहळ्याला दरवर्षी परिसरातील अनेक गावांतून हजारो भाविक व नागरिक उपस्थित राहतात. भव्य फटाक्यांची आतषबाजी हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण असतो. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्यापूर्वी दरवर्षीप्रमाणे यंदाही सलग दहा दिवस रामलीला कार्यक्रम सावता मैदानावर रंगला. मध्यप्रदेशातील रामकुमार पांडे हे गेल्या अनेक वर्षांपासून ही रामलीला सादर करत आहेत आणि यंदाही त्यांनी तीच परंपरा कायम ठेवली.

गतवर्षांपर्यंत या सोहळ्याचे प्रमुख सूत्रधार माजी नगरसेवक विजय नागपुरे होते. त्यांचे काही महिन्यांपूर्वी निधन झाल्याने यंदा कार्यक्रमात थोडा भावनिक रंग आहे; तरीही भाजप नेते जयंत डेहनकर यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी व ग्रामस्थांनी तयारीत कोणतीही कसर ठेवलेली नाही. यंदा समितीचे अध्यक्ष निखिल लडके, तर सचिव गौरव बांते आहेत. तसेच जयंत डेहनकर, रवींद्र तर्हेकर, रवींद्र बोडके, प्रशांत मलपे, सुजय पवार, महेश येते, सागर पवार, शरद ठोसरे, मनीष कुठे, शुभम मोरे, दीपक महाजन, ईश्वरराव हाडोळे, नितीन नागपुरे, योगेश पाथोडे, आशिष आकोटकर, आकाश वाट, उकरराव श्रीखंडे, वामनराव पवार, विनोद डहाके, अभिजीत लांडे आणि विजय दरेकर आदी पदाधिकारी मंडळाच्या आयोजनात कार्यरत आहेत.नागरिकांनी सायंकाळी सावता मैदानावर होणाऱ्या या पारंपरिक नरकासुर दहन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हा स्त्री रुग्णालयातील

# नव्या इमारतीच्या सुविधांनी दिला महिलांना दिलासा

## ९ महिन्यांत ४७५० बालकांचा जन्म !

**अमरावती/का.प्र.**

येथील जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) च्या नव्या इमारतीमधील सोयीसुविधांमुळे गरीब गरजू गर्भवती महिलांचे आयुष्य बदलले आहे. या रुग्णालयात मागील नऊ महिन्यांमध्ये ४ हजार ८६५ महिलांची प्रसूती झाली असून एकूण ४ हजार ७५० नवजात शिशूचा जन्म झाला आहे. यामध्ये २ हजार ४७० मुले तर २ हजार २८० मुलींचा जन्म झाल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या जुन्या इमारतीमधील अपुऱ्या सोयीसुविधांमुळे येथे उपचारासाठी दाखल होणाऱ्या महिलांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत होते. ती समस्या निकाली निघाली आहे.



**एसएनसीयूमध्ये १३५२ बालके भरत**

जे बालक कमी दिवसाचे, कमी वजनाचे किंवा प्रसूतीनंतर गंभीर असते, अशा बालकांचे प्राण वाचविण्यासाठी त्यांना तातडीने एसएनसीयू विभागात भरती केले जाते.

अनेक बालके त्यांच्या शरीराची पूर्ण वाढ होईपर्यंत दीड ते दोन महिने याठिकाणी भरती असतात. जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीमध्ये याठिकाणी तब्बल १३५२ बालके उपचारासाठी भरती ठेवण्यात आली होती, अशी माहितीदेखील रूग्णालय प्रशासनाने दिली.

**नव्या इमारतीमध्ये या सुविधा वाढल्या**

जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या नव्या इमारतीमध्ये स्तन कर्करोगाचे निदान करण्यासाठी मॅमोग्राफी सुविधा सुरू झाली आहे. तसेच आधुनिक सुविधा असलेले एसएनसीयूबरोबरच आता एमएनसीयू म्हणजेच मदर न्यूबर्न केअर युनिट देखील कार्यान्वित करण्यात आले.

# काली माता मंदिरात आशीर्वादासाठी भाविकांची गर्दी

## राजकारणी, अधिकारी व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



**अमरावती/का.प्र.**

दिवाळीच्या रात्री लक्ष्मीपूजना नंतर शहरातील प्रसिद्ध काली माता मंदिरात, ज्याला शक्तीपीठ म्हणून ओळखले जाते, भाविकांनी शक्ती महाराजांकडून आशीर्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. मंदिर परिसर रात्री उशिरापर्यंत भक्तांनी गजबजलेला होता.

उच्चशिक्षित, राजकारणी, अधिकारी व पत्रकारांची उपस्थिती मंदिरात फक्त सर्वसामान्य नव्हे तर उच्चशिक्षित नागरिक, पत्रकार, राजकारणी आणि विविध खात्यांचे अधिकारीही शक्ती महाराजांचे आशीर्वाद घेण्यासाठी रांगेत उभे होते. महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली. मंदिराच्या परिसरातील हिंदू स्मशानभूमीच्या मागे हा धार्मिक कार्यक्रम पार पडला. रात्री ८ वाजता भव्य आरती व आशीर्वाद वाटप लक्ष्मी पूजन व चोपडा पूजनानंतर रात्री ८ वाजता शक्ती महाराजांनी भव्य आरती केली. आरतीनंतर महाराजांनी प्रसादासोबत मुठीभर कलदार व नोटा वाटून आशीर्वाद दिले. उपस्थित भाविकांनी त्यांना नमस्कार करून आशीर्वाद कपाळावर लावला. मंदिरात कालीमातेच्या जयघोषाने आणि मंत्रोच्चारांनी वातावरण भक्तिमय झाले होते. पोलिस बंदोबस्त व सुरक्षितता शेकडो भक्तांच्या गर्दीची पूर्वकल्पना घेता, ङङराजापेठ पोलिस स्टेशनचे विशेष कर्मचारी बंदोबस्तासाठी तैनातङङ करण्यात आले होते. दोन वर्षांपूर्वी मंदिराजवळ स्थापन करण्यात आलेल्या पोलिस चौकीचा उपयोग गर्दी नियंत्रणासाठी झाला.रात्री उशिरापर्यंत चैतन्यमय वातावरण भाविकांची रांग



रात्री उशिरापर्यंत सुरू होती. भक्तिमय वातावरण, आशीर्वाद व प्रसाद वाटप, आणि कालीमातेच्या जयघोषात संपूर्ण मंदिर परिसर एक धार्मिक महोत्सवाचा अनुभव देत होता.

# पोषण आहार; चार हजारांवर स्वयंपाकींसाठी १ कोटी

**अमरावती/का.प्र.**

प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना पोषण आहार देणाऱ्या राज्यातील स्वयंपाकी आणि मदतनीसांच्या मानधनासाठीचा एकूण ३८ कोटी ४१ लाख आणि ८२ हजार रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे. यात अमरावती जिल्ह्यामधील स्वयंपाकी आणि मदतनीस अशा ४ हजार १३४ स्वयंपाकी आणि मदतनिसांकरिता १ कोटी ३ लाख ६० हजार रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.

या योजनेंतर्गत शाळास्तरावर आहार शिजवून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जातो. हे काम करणाऱ्या प्रत्येक स्वयंपाकी दरमहा २५०० रुपये मानधन देण्यात येते. त्यापैकी ६०० रुपये हे केंद्राकडून तर १९०० रुपये हे राज्याकडून देण्यात येतात. वर्षातील १० महिन्यांकरिता हे मानधन दिले जाते. दिवाळीच्या तोंडावर राज्य शासनाने या मानधनापोटी जिल्ह्याला १ कोटी ३ लाख ६० हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

# तिवसा तालुक्यात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना दिलासा;

## काँग्रेस कमिटी व मित्र मंडळाचा सृजनशील उपक्रम

**तिवसा/वार्ताहर**

राज्य शासनाच्या मदतीचे आश्वासन केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना यंदा 'काळी दिवाळी' साजरी करण्याची वेळ आली आहे. ही स्थिती लक्षात घेऊन तिवसा तालुका काँग्रेस कमिटी व यशोमतीताई ठाकूर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना किराणा किट व साड्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामागचा उद्देश विदारक परिस्थितीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना थोडासा दिलासा देण्याचा होता. यावेळी शासनाच्या निष्क्रियतेचा निषेधही करण्यात आला.तिवसा तालुक्यात यावर्षी अतिवृष्टीमुळे खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले असून, जिरायती पिकेही पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक चक्र कोलमडले आहे. शासनाची मदत अद्याप पोहोचलेली नसल्याने शेतकरी कुटुंबांची दिवाळी अंधारात जात आहे.वहा, ममदापूर, शिरजगाव मोझरी, निंभोरा, सालोरा या गावांमध्ये गेल्या वर्षभरात नापिकी, कर्जबाजारीपणा आणि मानसिक तणावामुळे दहा पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, काहींचा मृत्यू हृदयविकाराने झाला आहे. अशा कठीण काळात या कुटुंबांना सामाजिक आधार देण्याचे महत्त्व या उपक्रमातून अधोरेखित झाले.या उपक्रमावेळी ङङमुकुंद पुनसे, निलेश खुळे, पंकज देशमुख, डॉ. निरंजन गणोरकर, रावसाहेब देवघरे, गजानन चर्जन, संदीप हगवणे, निरंजन कडू, विजय डोंगरे, सुरज चौधरी, प्रतीक खुळे, किशोर समरित, निलेश हगवणे, दिलीप केचे, प्रशांत साबळे, सरपंच मंदाताई राठोड, विजय जाधव, राजकुमार इंगळे, गिरीधर राठोड, विनायक तसरे, हिरा राठोड, गौरव चौधरी, आकाश मकेश्वरङङ यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# खाद्यतेलाच्या व्यवसायाच्या आमिषाने ४९ लाखांचा गंडा

**अमरावती/का.प्र.**

खाद्यतेलाच्या व्यवसायात गुंतवणूक केल्यास भरघोस कमिशन देण्याचे आमिष दाखवून अमरावती जिल्ह्यातील एका महिलेसह तिच्या दहा नातेवाईकांची मिळून तब्बल ४९ लाख २० हजार २०० रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.





साजिद इकबाल शेख इमाम टेलर (४२), जावेद इकबाल शेख इमाम, मोहम्मद वाजिद शेख इमाम (४३), मोहम्मद रियाज शेख रमजान (४२), मोहम्मद रिजवान शेख रमजान (४६) आणि एका महिलेचा (सर्व रा. चांदूरबाजार) समावेश असलेल्या सहा जणांविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींनी तक्रारदार महिलेला खाद्यतेलाच्या व्यवहारात रक्कम गुंतवल्यास मोठ्या प्रमाणात कमिशन मिळेल, असे सांगून विश्वासात घेतले. एप्रिल २०२३ पासून हा व्यवहार सुरू झाला आणि सुरुवातीला महिलेला कमिशनही देण्यात आले. यामुळे महिलेने तिच्या अन्य नातेवाईकांनाही या योजनेबद्दल सांगितले. त्यामुळे तक्रारदार महिला आणि तिच्या दहा नातेवाईकांनी मिळून सुमारे दोन वर्षांत टप्प्याटप्प्याने आरोपींकडे एकूण ९४ लाख ३८ हजार २०० रुपये गुंतवले.

आरोपींनी गुंतवलेल्या रकमेपैकी ४५ लाख १८ हजार रुपये कमिशन म्हणून तक्रारदार आणि त्यांच्या नातेवाईकांना परत केले. मात्र, उर्वरित ४९ लाख २० हजार २०० रुपयांची रक्कम परत केली नाही. उलट, खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली, असे तक्रारदार महिलेने पोलिसांना सांगितले.

# प्रशांत देशपांडे यांचे अभिनंदन

**अमरावती/का.प्र.**

पाच वर्षांकरिता महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या निवडणुका जाहीर झाल्या असून नामांकन परत घेण्याच्या शेवटच्या दिवशी फक्त प्रशांत देशपांडे यांची उपाध्यक्ष पदाकरिता निर्विरोध निवड झाली आहे. अध्यक्ष पदांसाहित इतर संपूर्ण कार्यकारिणीची निवडणूक २ नोव्हेंबर रोजी होणार आहे.



अमरावती क्रीडा क्षेत्रातीलच नव्हे तर सामाजिक, राजकीय, कला क्षेत्रातील दबदबा असणारे, जगप्रसिद्ध श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष, अमरावती जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष प्रशांत देशपांडे सध्या ऑलिम्पिक संघटनेच्या मावळत्या कार्यकारिणीत सहसचिव म्हणून कार्यरत असून आपल्या अभ्यासू स्वभावामुळे ते संपूर्ण राज्यभरातील क्रीडा क्षेत्रात सुपरिचित आहेत. क्रीडाक्षेत्रातील या सर्वोच्च संघटनेत महत्वाच्या पदाची जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी प्रशांत देशपांडे यांच्यावर महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटनेच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी मागील अनेक वर्षां पासून आहे. नुकतेच देशपांडे राज्य व्हॉलिबॉल संघटनेचे सुद्धा बिनविरोध उपाध्यक्ष म्हणून निर्वाचित झालेले आहेत. अमरावती जिल्ह्यातील अनेक क्रीडा संघटनांची महत्त्वाची पदे देशपांडे हे सांभाळत असून खेळाडूंना सर्वप्रकारची मदत आणि मार्गदर्शन करण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. याबद्दल श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे महासचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांचे सह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रशांत देशपांडे यांचे अभिनंदन केलें आहे.

# वन संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनावरील तीन दिवसीय कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनीच्या वतीने विदर्भातील वन आणि वन्यजीव संवर्धनासाठी स्वयंसेवी संस्था व वनविभाग यांच्यातील सक्रीय सहकार्य प्रतिनिधींची तीन दिवसीय निवासी कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. विदर्भातील विविध जिल्ह्यातील २५ प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये वर्धा येथून महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेचे प्रतिनिधी म्हणून सदर संस्थेचे नागपूर विभागाचे विदर्भ समन्वयक राहुल वकारे यांनी कार्यशाळेत सहभाग नोंदविला.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी पहाटे मा. नरेंद्र चेतुले यांनी प्रबोधिनीच्या परिसरा विषयी माहिती दिली. सोबतच पक्षी निरीक्षण करण्यात आले. यात तेवीस पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली. तिन दिवसात विविध विषय जसे कि वन, वन्यजीवांचे संरक्षण करणारे कायदे आणि त्यांची अंमलबजावणी यावर मा. नरेंद्र चांदेवार, विभागीय वन अधिकारी, वन्यजीव कॉरिडॉर संकल्पना, गरज आणि व्यवस्थापन यावर मा. आनंद रेड्डी, उपसंचालक (कोर), ताडोबा-अंधेरी व्याघ्र



प्रकल्प, चंद्रपूर, मानव-वन्यजीव संघर्ष - निसर्ग, परिमाण आणि शमन धोरणे यावर मा. प्रभू नाथ शुक्ला, एफडी वन संरक्षक आणि क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधेरी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर, जैवविविधता संवर्धन - संकल्पना, कायदेशीर चौकट आणि सराव यावर मा. उमेश वर्मा, अपर संचालक प्रशिक्षण, जैवविविधता संवर्धन यावर मा. शेषराव पाटील, निवृत्त पीसीसीएफ तसेच वन विभागासोबत एनजीओच्या सहकार्यावर चर्चा याविषयी मा. रामानुजन, सीसीएफ, चंद्रपूर मंडळ यांनी मार्गदर्शन केले. यात मा. अश्विनी जाधव, उपसंचालक, मा. मनीषा भिंगे, अपर संचालक (मुख्यालय) तथा सत्र संचालक यांचा सहभाग होता. मानवी वन्यजीव संघर्ष व्यवस्थापनात महत्वाची भूमिका असलेल्या सायबर सेल, चंद्रपूर विभागाला भेट दिली. त्याविषयी तेथील अधिकाऱ्यांनी याविभागाची सविस्तर माहिती दिली. तसेच ताडोबा अंधारी प्रकल्पासही भेट देण्यात आली.

वन, वन्यजीव, माळरान व्यवस्थापन, दुर्मिळ होत असलेल्या रानभाजी यांचे व्यवस्थापन अनुभवता आले. मोहर्ली येथे ताडोबा-अंधेरी व्याघ्र प्रकल्पावर मा. प्रफुल सावरकर यांनी सादरीकरण केले. तसेच रतन टाटा निसर्ग निर्वचन केंद्राला भेट दिली. तसेच प्रबोधिनीतील प्रथम कौशल्य विकास केंद्राला भेट दिली असता तेथील सविस्तर माहिती प्रतिनिधींना देण्यात आली.

या कार्यशाळेत विविध संस्थेच्या प्रतिनिधींनी त्यांच्या संस्थेविषयी माहिती विषद केली. यात महाराष्ट्र पक्षिमित्र संस्थेची माहिती राहुल वकारे यांनी दिली. अखेरच्या दिवशी समारोप सत्रात सहभागींना प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

## संक्षिप्त

### स्वच्छता कर्मचाऱ्यांचा मिठाई देऊन सन्मान





**अमरावती** -दिवाळी साजरी करण्यासाठी आम्ही चार दिवस स्वच्छता करतो आणि लायन्स क्लब ऑफ अमरावती प्राईडने ३६५ दिवस स्वच्छता करणाऱ्या, आमचे आरोग्य आणि सण साजरे करण्याचे स्वातंत्र्य सुनिश्चित करणाऱ्या स्वच्छता योद्ध्यांना मिठाई देऊन सन्मानित केले आणि त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

वार्षिक परंपरेला पुढे नेत, लायन्स क्लब ऑफ अमरावती प्राईड आणि युवा स्वाभिमान पक्षाचे सदस्य अजय जयस्वाल यांनी संयुक्तपणे अमरावती महानगरपालिकेच्या बडनेरा झोनमधील ५५ तात्पुरत्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप केली. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी, आमच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबियांना दिवाळी चांगल्या प्रकारे साजरी करण्याची संधी देण्यासाठी आपला जीव धोक्यात घालणाऱ्यांबद्दल कृतज्ञता आणि सन्मान व्यक्त करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. क्लबचे अध्यक्ष प्रमोद सिंग ठाकूर, एमजेएफ व्हीडीजी-१ विलास साखरे, मनीष टाले, अजय जयस्वाल, डॉ. राजेश भाटकर, मोहन जाखर, बंटी वहाणे आणि माजी अध्यक्ष रवी उगले आणि महानगरपालिकेचे कर्मचारी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परतवाडा येथून दुचाकी लांबवली

**परतवाडा** -येथील आठवडी बाजार परिसरातून ३० हजार रुपये किमतीची दुचाकी लांबवण्यात आली. याप्रकरणी परतवाडा पोलिसांनी कृपाशंकर खाडे (२२, राहणार गौलखेडा बाजार) याच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### सुदर्शन टोपरे यांना 'जीवन गौरव' पुरस्कार

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी येथील सीताबाई संगई विद्यालयाचे सेवानिवृत्त बहुआयामी राष्ट्रीय व राज्य सरकार पुरस्कार प्राप्त प्राचार्य सुदर्शन टोपरे यांना संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आपेगावच्यावतीने जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार त्यांना बुधवार ५ नोव्हेंबर रोजी संत ज्ञानेश्वर संस्थान आपेगाव येथे देण्यात येणार आहे.

टोपरे हे विदर्भ साहित्य संघाचे अंजनगाव शाखेचे सचित पदावर कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी विदर्भ महिला लेखिका संमेलन आयोजित करण्यात पुढाकार घेतला होता. सध्या ते महाराष्ट्र राज्य कवी विचार मंचचे ज्येष्ठ कवी असून त्यांचे अनेक साहित्य व कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. वेदना संवेदना ३ घात हे दोन काव्य संग्रह प्रकाशित झाले असून वेदना संवेदना काव्य संग्रहाचे प्रकाशन कवी व गीतकार स्व. जगदीश खेबूडकर यांच्याहस्ते झाले. तसेच हे सारे काही विलक्षणच, घडामोडी आत्मपरीक्षण ही सामाजिक व धार्मिक आशयाची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. विश्वशांती अंजनगावच्या सामाजिक सांस्कृतिक संस्थेच्यावतीने अंजनगाव येथे विदर्भ साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात सिंहाचा वाटा होता आजपर्यंत हजारांच्या वर सामाजिक व धार्मिक आशयाच्या कविता लेखन केले आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून युवतीवर अत्याचार

**शेंदूरजनाघाट** - सोशल मीडियावरून ओळख झाल्यानंतर अत्याचार करून युवतीला गर्भधारणा झाल्याची घटना शेंदूरजनाघाट पोलिसस्टेशन हद्दीत घडली. आशिष रामूजी धुर्वे (२२) रा. रोशनखेडा असे आरोपीचे नाव आहे. त्याची एका २१ वर्षीय युवतीशी फेसबुकच्या माध्यमातून ओळख झाली व नंतर त्याने लग्नाचे आमिष देऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्तापित केले. त्यामुळे तिला गर्भधारणा झाली.

तिला उपचारार्थ रुग्णालयात भरती केले तेव्हा पोलिसांना तिने बयाण दिले. त्या बयाणावरून पोलिसांनी आरोपी आशिष धुर्वेविरूध्द भारतीय न्याय संहिता कलम ६९, २०३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास शेंदूरजनाघाट पोलिस करीत आहे.

# क्षुल्लक कारणावरून युवकाची हत्या

## -फटाका अंगावर फेकल्याचा राग -गुलिस्ता नगर येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** सर्वत्र दीपावली साजरी होत असताना गुलिस्ता नगर परिसरात अलबदर हॉल समोर क्षुल्लक कारणावरून एका युवकाची हत्या करण्यात आल्याची घटना



मंगळवारीं (दि.२१) रात्री समोर आली आहे. मृतकाचे नाव अब्दुल सोहेल अब्दुल शाकीब (वय २०, गुलिस्ता नगर ) व आरोपीचे नाव मो.मस्तकीम मो.मुमताज (वय २०, पॅराडाईज कॉलनी )आहे.

माहितीनुसार मंगळवारच्या रात्री आरोपी मो. मुस्तकीम पॅराडाईज कॉलनी येथून गुलिस्ता नगर मध्ये फिरायला गेला होता. त्याचवेळी अब्दुल सोहेल याने एक फटाका रस्त्यावर फेकला. (पान २ वर)



































